७५९२
म. ग्रं. सं. ठाणें
विषय कादंबरी
सं. क्र. ७५९२

म. ग्रं. सं. ठाणें

विषय
कादं
य क्रमांक
७२९

लेखक केशव रघोंचे सईलवडेकर

सन १८७०

पुस्तकाचें नांव मराठ्यांचा आणि मोंगलांचा संबंध गोष्टी.

७२९
कादं

न २२०

महाराष्ट्र भाषेंत मनोरंजक गोष्टी

हा ग्रंथ

केशव रघुनाथ शेट चौंचे सईतवडेकर

यानीं रचून प्रसिद्ध केला.

भाग पहिला

आवृत्ति १ ली

मुंबईंत

ष्णाजी यांच्या छापखान्यांत एग्झिक्युटरस्
ांच्या हुकुमावरून ना० रु० दुमाळे
यांणीं छापिला.

७ च्या २५ व्या आक्टा प्रमाणें रजिस्टर केलाअसे

सन १८७०—शके १७९२

किमत १॥ रुपया .

पुस्तकासंबंधी सर्व हक्क मालकाने राखिले आहेत.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं. 147

सूचना

आमच्या प्रियवाचकांस [illegible] तयार करून कळवितां कीं, हा प्रथम भाग फार जलदीनें [illegible] ला आहे. आणि काहीं दुसऱ्या कामामुळें विशेष लक्ष जरी याजवर नवतें, तरी ह्यांत काहीं न्यूनता राहिली आहे असें नाहीं. वास्तवीक रीतीनें हा भाग तयार केला आहे. कोण्या पर्वताचें वर्णन किंवा एकाद्या स्त्रीचें वर्णन, नदीचें अथवा अरण्याचें वर्णन करून, ग्रंथ वाढविण्याचा आमचा हेतु नाहीं; व तसें केल्यानें आमच्या किरयेक वाचकांस त्याचा त्रास होऊन, वाचतेवेळीं त्या वर्णनाकडेस त्यांचें अगदींच दुर्लक्ष असतें. गोष्टीकडेस मात्र रोंख ठेवून, एकवेळ पूर्ण वाचला म्हणजे; त्या ग्रंथाकडेस पुनः अवलोकनही करीत नाहींत. आणि स्वभाषेंतील ग्रंथ वाचण्याची गोडी न लागण्यास हेंच मुख्य कारण आहे. असें समजून यथामति हा प्रथम भाग तयार करून, आमच्या सूज्ञवाचकां पुढें हजर केला आहे. ह्या भागांत ज्या गोष्टी आहेत, तेणें करून सर्वांचें मनरंजन होईलच होईल; अशी आमची पूर्ण खात्री आहे. आणि द्वितीय भाग जो हाल्लीं तयार करण्यांत आला आहे, तो अवकाशानुसार तयार केल्यामुळें त्याची विशेष गोडी लागेलच. तर सर्वांस ह्या क्रमाणें त्यासही आपला उदार आश्रय द्यावा अशी विनंती आहे. सदर्हू बुकें ज्यांस पाहिजेत त्यांस अमरचंद वाडींत मालकाचे ऑफीसांत विकत मिळतील.

केशव रघुनाथ शेट चोंचे
ठिकाण अमरचंद वाडी.

आमच्या देशांत, इंग्रेजी राज्य झाल्यापासून अनेक उपयुक्त विषयांवर; ग्रंथ मराठींत होऊं लागले व लोकांत विद्येचा प्रसारही होत चालला. ह्या सत्कृत्यांची, सरकारानें आपला उदार हस्त वर केल्यामुळें; उत्तरोत्तर वृद्धि होत चालली आहे.

हल्लीं मराठी भाषेंत जरी बरींच पुस्तकें आहेत तरी, त्यांत केवळ मनोरंजक गोष्टी नसल्यानें आमच्या लोकांस वाचण्याची जितकी गोडी लागावी तितकी अद्यापि लागली नाहीं. असें मला वाटतें, तर ती लागावी या हेतूनें यथामति हा ग्रंथ रचून तयार केला आहे. ह्यांतील विषय, नीतिपर व उपदेशपर असून; चित्तास आनंद देण्यासारखा आहे. तर सकळ विद्वज्जनांस अशी प्रार्थना आहे कीं, त्यांनीं ह्या ग्रंथांत ज्या चुका पडल्या असतील त्यांची माफी करून; आपला उदार आश्रय द्यावा.

के. रघु.

Asiatic Parsonet Papers 85

मनोरंजक गोष्टी.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

भाग पहिला.

पूर्वी दक्षिण हिंदुस्थानांत, विरामपूर नामें नगरीचा विदूरथ नामें करून राजा होता; तो मोठा शूर व महा पराक्रमी असून, धनुर्विद्येंतहि निपुण होता त्याचें राज्य विस्तीर्ण असून, आसपासचे राजेरजवाड्यांस; त्याचा मोठा दरारा असे त्याच्या दरबारांत पंडित, शास्त्री, वैद्य असे महा विद्वान् लोक होते? तसेच पठाण, सरदार, असे मोठमोठे, शूरलोक. त्याच्या पदरीं होते अ..ण त्याचें राज्य मोठ्या भरभराटीप्रत पावलें होतें त्याचे अष्ट प्रधान होते, त्यांत सुमंतनामें मुख्य प्रधान होता. तो मोठा धूर्त आणि चतुर असल्या कारणानें, त्या शहरांत योग्य रितीनें बंदोबस्त ठेविला होता विदूरथ राजाच्या पोटीं पुत्र नव्हता, परंतु एक कन्या रूपानें फारच सुंदर होती आणि तिचें नाव भानुमती असें होतें तिजवर विदूरथ राजा आणि राणी वसुमती, ह्या उभयतांची अत्यंत प्रीति असे. कारण ती एकुलतीएकच कन्या होती.

प्रधान सुमंत यासहि पुत्र नव्हता; परंतु त्यासहि एक कन्या होती ती अत्यंत सुरूप असून, भानुमतीपेक्षां लहान होती तिचें नाव सुमती असें होतें भानुमतीचें आणि सुमतीचें सौंदर्य कांहींसें सारखेंच होतें, तथापि सुमतीच्या शरिराचा बांधा नाजूक असल्या

कारणानें; ती भानुमतीपेक्षां फार रमणीय दिसे.

भानुमतीची आणि सुमतीची बाळपणापासून, मोठी मैत्री असे. आणि त्या दोघीहि मोठ्या चतुर होत्या भानुमती वयानें दाहा वर्षांची होती आणि सुमती सुमारें नऊ वर्षांची होती. त्यांची मैत्री सदोदित राहावी अशा इच्छेनें, दोघींचा संकेत झाला; कीं उभयतांनीं एक भ्रतार करावा म्हणजे आपली मैत्री जन्मभर राहील. असें भानुमतीनें सुमतीस म्हटलें, तेव्हां तीहि त्या संकेतास कबूल झाली. भानुमती सुमतीपेक्षां वडील असे, आणि ती राजकन्या असल्या कारणानें; सुमती तिच्या आज्ञेंत सदा सर्वकाळ असे. भानुमती आणि सुमती दोघी जेव्हां तारुण्यांत आल्या, तेव्हां भानुमतीपेक्षां सुमती, फारच रूपवान दिसे असें तिचें रूप पाहून, तिच्या पित्यास फार आनंद वाटे कीं माझी कन्या कोणत्या तरी राजपुत्रास देण्यालायक आहे भानुमती जेव्हां तारुण्यांत आली तेव्हां, विदूरथ राजा तिच्या अनुरूप वर पाहूं लागला. तेव्हां कोणी चित्रसेन म्हणून राजा होता. त्याचा पुत्र चंद्रसेन नामेंकरून फारच रूपवान होता. त्याच्या बापानें त्याच्या योग्य नवरी मिळावी म्हणून, त्याच्या तस्बीरी शहरो शहरीं पाठविल्या होत्या. त्यांतील एक तसबीर, एकेदिवशीं विदूरथ राजाच्या गांवीं आली. दरबारांत विदूरथ बसला होता इतक्यांत चित्रसेन राजाचा सरदार, ती तसबीर घेऊन दरबारास आला. आणि विदूरथास सलाम करून ती पुढें ठेविली. विदूरथानें ती पाहतांच मोठा आनंद भरित होऊन, ती मुलीच्या महालांत, म

धान सुमंत याजबरोबर पाठविली. प्रधानजी ती तसबीर पाहून मनांत म्हणतो अहाहा काय रूपवान मुलगा आहे, ह्या तसबिरीस, माझी मुलगीच योग्य आहे. भानुमती जरी सुरूप आहे, तरी माझ्या कन्येची बरोबरी करणार नाहीं असें मनांत म्हणत, ती तसबीर घेऊन भानुमतीच्या महालीं गेला. आणि आपण आलों आहें व कांहीं राजाचा निरोप आहे असें दासीकडून कळविलें. तों भानुमतीनें पडदा लावून, प्रधानजीस येण्यास परवानगी दिली. प्रधानानें ती तसबीर दासीकडून भानुमतीच्या हातीं दिली, तेव्हां सुमंत प्रधानाची कन्याहि तेथेंच होती. भानुमती ती तसबीर पाहून खुषझाली. आणि मला हाच भ्रतार पाहिजे असें प्रधानास दर्शविलें. प्रधानानें येऊन राजास निवेदन केलें. प्रधानकन्या सुमतीहि ती तसबीर पाहून, मनांत म्हणत्ये कीं ही तसबीर माझ्या योग्य आहे. आणि मी ह्या पुरुषावांचून दुसरा पति करणार नाहीं. इतर सर्व पुरुष मला बापासमान आहेत. असें तिनें मनांत म्हणून, शपथ वाहिली. भानुमती मोठ्या आनंदांत आहे असेंपाहून; सुमती म्हणाली. बाई, आतां लग्न झालें म्हणजे पतिसमागमें जाणें होईल, तेव्हां मला टाकून जाल काय ? असा सुमतीचा प्रश्न ऐकून भानुमती म्हणाली, सुमती. तूंहि आतां लग्न करून, आपल्या सासरीं जाशील नाहीं काय ? असें ऐकून सुमती म्हणाली. बाई, आपण दोघी लहानपणापासून एक चित्तानें वागत आलों. आणि कोणती हि गोष्ट करणें ती एकमेकींच्या विचारानें केली. आणि पूर्वीपासून आ-

पला संकेत आहे, तो आपणांस माहितच आहे. त्याप्रमाणें केलें. तरच, आपली मैत्री जन्मभर सारखी राहील आतां ती सदोदित चालून, एकमेकींचा वियोग न व्हावा, या करितांच आपला जो संकेत आहे, तो ध्यानांत ठेवून जें करणें तें करा. असें सुमतीचें बोलणें ऐकून, भानुमती म्हणाली. सुमती मी खचित सांगत्यें कीं त्या संकेताची मला कांहींच आठवण नाहीं. म्हणून मला उघड सांग, म्हणजे मी त्या संकेताप्रमाणें चालण्यास सिद्ध होईन सुमती म्हणाली, तुम्ही मजपेक्षां वडील आहां, त्यापेक्षां त्या संकेताची स्मृति, मजहून तुम्हांसच विशेष असावी; अशी कल्पना करीत होत्यें तों तुम्ही मलाच विचारितां, तर आतां मी उघड सांगण्यास सिद्ध आहें. आणि तो संकेत आपणच मला कळविला आहे, तो हाच कीं आपण उभयतांनीं एक अतार करावा. आणि मी खचित सांगत्यें, कीं, ह्या तसबिरी शिवाय इतर पुरुष मला माझ्या पित्यासमान होत. ही शपथ,बाईसाहेब, मीं आपणा देखत घेतली आहे ह्याची काळजी आपणासच असली पाहिजे.

असें ऐकून भानुमती म्हणाली. सुमती आपण असा संकेत केला, ही गोष्ट खचित मला आठवते. बाळपणीं, इतकें ज्ञान नसल्या कारणानें; हा संकेत झाला आहे. तस्मात् ह्यास कांहीं उपाय नाहीं. माझ्या रूपाहून तुझें रूप चांगलें आहे. जर तूं राजकन्या असतीस, तर ही तसबीर मला पसंत न करती. आणि ते आतां लग्नास आले म्हणजे, त्यांच्या नजरेस तूं पडशील तेव्हांहि मला मोठी धास्ती आहे. कदाचित् ते मजबरोबर

लग्न करण्यास हरकत करतील; ही शंका मला उत्पन्न झाली आहे. बरें जर आपण आपल्या संकेताप्रमाणें, दोघी त्याच्या स्त्रिया होतों; असें पित्यास सांगावें, तर त्यास ही गोष्ट मानवेल; असें मला वाटत नाहीं हें विघ्न, कसें निवारण होईल; ही काळजी ईश्वरास असावी. सुमती तूं विचार न करितां, लागलीच शपथ घेतली; तेणेंकरून मला फार खेद वाटतो. मी बापाच्या आधीन आहें. आणि त्यापुढें माझें कांहीं चालणार नाहीं. हें मला पूर्ण माहित आहे. आणि तूंतर मजवर सर्व भार टाकून, शपथ घेतली. आतां, मी ह्याचा कोणता तरी विचार करावा? माझ्या मनांत तुझ्या विषयीं कांहीं कपट नाहीं तूं माझ्या भ्रताराजवळ असलीस, तर मला फार संतोष आहे. परंतु तें घडणेंच मात्र, माझ्या स्वाधीन नाहीं. सुमती यास काय बरें युक्ति काढावी.

सुमती म्हणाली. मजवर तुमचा पूर्ण लोभ आहे. आणि मी तुम्हा उभयतांची दासी, असें समजून माझा अंगीकार केला पाहिजे. मी शपथ वाहिली तीस कधींच टळणार नाहीं. मी दुसरा भ्रतार करणार नाहीं. आतां जर आपण मला निष्कपटानें विचारितां, तर यास एक युक्ति आहे; पण तुम्हांस कांहीं अवघड दिसल्यास, खोटें मात्र मला नसांगाल तर तुमच्या हिताची गोष्ट करण्यास जितकी मेहनत माझ्यानें घेववेल तितकी घेऊन; आपल्या संकेताप्रमाणें करून घेईन असें सुमतीचें बोलणें ऐकून भानुमती हास्यवदन करून म्हणाली, सुमती तुझ्या जवळ मी

कधीं तरी कपटानें बोललें असें तुला आठवतें काय ? नाहीं बाईसाहेब, पण ही गोष्ट मोठी खोल आहे म्हणून; कदाचित् आपल्या मनांत कांहीं विरुद्ध कल्पना आली तर कोण जाणे. म्हणून मी असें बोललें भानुमती म्हणाली, अशी खोल गोष्ट कोणती आहे ती मला सांग. तेव्हां सुमती म्हणाली. तुमचें मरण कशांत आहे एवढें मला सांगाल तर, मी कांहीं युक्ति काढून, आपला संकेत सिद्धीस जाईल, अशी, तजवीज करीन. हें ऐकून भानुमती म्हणाली. सुमती माझें मरण फार दुर्गम आहे. येथून उत्तरेस, सात पर्वतांच्या पलीकडे, एक मोठें सरोवर आहे. त्या सरोवराच्या मध्यभागीं एक विहीर आहे. ती कोणास दिसत नाहीं. त्या विहिरींत उतरून एक पिंपळाचा वृक्ष आहे. त्याच्या खांदीस एकशें नऊ रत्नांचा हार आहे. त्यास कोणी स्पर्श केला असतां, तात्काल माझें मरण आहे. तर ह्यांत काय युक्ति काढशील? ती मला सांग. हें ऐकून सुमती ह्मणाली. बाई, मी ती युक्ति आपणांस सांगूं शकत नाहीं. परंतु जी तजवीज मी करीन. त्यास आपला रुकार असावा. म्हणजे कांहीं दिवसांनीं आपला हेतु पूर्ण होईल.

असें भानुमतीचें आणि सुमतीचें बोलणें होतआहे तों, भानुमतीच्या आईकडून दासी येऊन दाखल झाली. आणि म्हणाली भानुमतीबाई, आपणांस आईसाहेबांनीं पाचारण केलें आहे. असें ऐकतांच भानुमती सुमतीस घेऊन आईच्या महालास गेली.

व सुमती, भानुमतीस जवळ बसवून; विचारूं लागली. भानुमती, तुझ्या लग्नाचा समारंभ चालला आहे.

आतां, मी तुला इतकेंच विचारितें कीं; तुझ्या योग्य भ्रतार जसा असावा त्याहून रूपवान् दैवयोगानें तुला मिळाला त्यास तूं खुष आहेसना ? मला तर वाटतें खचित आहेस. प्रधानजी बरोबर तसबीर तुजकडे पाठविली होती ती पाहिलीसना, बरें ती मला पाहूंदे. तों भानुमती म्हणाली, ती मी बरोबर आणिली नाहीं. तेव्हां सुमतीस सांगितलें, तूं जा आणि माझ्या पलंगावर तस्बीर आहे; ती घेऊन ये. तेव्हां सुमती परत भानुमतीच्या महालांत येऊन, ती तस्बीर घेऊन पूर्ण पणें तिणें अवलोकन केली तेव्हां तिचें चित्त, अगदींच वेधल्यासारखें झालें. आणि ती भानुमतीकडे नेण्यास विसरून, तेथें पाहण्याच्या नादांतच राहिली, तिला कांहीं देहभान नाहीं. अशी तिची अवस्था झाली; तों सुमतीस वेळ लागला म्हणून, आईस न कळतां भानुमती आपल्या महालांत आली. तों सुमती हातांत तस्बीर घेऊन; आपल्या पलंगावर पडली आहे. असें भानुमतीनें पाहातांच, धांवत येऊन तीस आलिंगन दिलें. तेव्हां सुमती लाजल्या सारखी होऊन, तिचा कंठ भरून आला. आणि भानुमतीस मिठी मारून रडूं लागली आणि म्हणाली, भानुमती बाई माझा हेतु पूर्ण करण्यास तुम्हांवांचून मला दुसरें कोणी नाहीं, आणि माझा अंगीकार जर न कराल, तर मी हा प्राण ठेवणार नाहीं. तेव्हां भानुमतीनें सुमतीस सांगितलें कीं तुझ्यानें जो उपाय करवेल तो कर आणि आतां अशी चिंतेंत राहूं नको. कदाचित् माझी आई संशय घेईल तर एखादें विपरीत होईल; याजकरितां ही गोष्ट तूं मनां-

त अंगदींच ठेवून राहूं नको. काय असेल तो इलाज कर आणि मीहि करितें. असें म्हणून ती तस्बीर घेऊन दोघी वसुमतीच्या महालांत आल्या. भानुमतीनें आईच्या हातांत ती तस्बीर नेऊन दिली. तीं पाहून वसुमती भानुमतीस म्हणते, माझ्या मना सारिखा जांवयी दैवयोगानें मिळाला; येणेंकरून मी फार आनंदित झालें. असें म्हणून तस्बीर भानुमतीच्या स्वाधीन केली. आणि आतां तुला माझ्या महालांत येऊन राहावें लागेल असें तीस दर्शविलें. नंतर कांहीं दिवसांनीं, भानुमती, आईच्या महालांत जाऊन राहिली.

पुढें कांहीं दिवसांनीं भानुमतीची, तस्बीर चित्रसेन राजास त्याच्या सरदारानें नेऊन दाखविली. ती पाहून त्यास फार आनंद झाला. नंतर ती तस्बीर प्रधानाबरोबर चंद्रसेनाच्या महालांत पाठविली, प्रधानजी चंद्रसेनापुढें तस्बीर ठेवून मुजरा करून म्हणाला. आतां, लग्नास जाण्याची तयारी आहे; हें आपणांस श्रुत व्हावें. असें ऐकून चंद्रसेनानें ती तस्बीर अवलोकन केली आणि मनांत हर्षयुक्त होत्साता प्रधानजीस म्हणतो. तुमच्या सर्वांच्या पसंतीस उतरत असल्यास माझेंहि मत तुम्हांविरुद्ध नाहीं असें म्हणून ती त्यानें ठेवून घेतली. प्रधानजीनें आज्ञा घेऊन चित्रसेनराजास जाऊन कळविलें. तेव्हां सर्वत्र राजांस पत्रिका पाठविल्या आणि सर्व सिद्धता करून मोठ्या समारंभानें विदूरथ राजाचे पुरीस दाखल झाले.

विदूरथ राजाच्या शहरांत तमाम सर्व राजे आले होते. त्यांत चित्रसेन राजाबरोबरहि पुष्कळ सैन्य आ-

णि राजे असे मिळून सर्व शहरांत भारी गर्दी उडाली. दोहोंकडे मंडपाची सिद्धता झाली आणि मोठ्या आनंदानें भानुमतीचें आणि चंद्रसेन राजपुत्राचें लग्न झाल. ज्यावेळीं अंतरपाट सुटून, भानुमतीची आणि चंद्रसेनाची दृष्टादृष्ट झाली ! तेव्हां भानुमती आनंदयुक्त होऊन मनांत म्हणत्ये, माझें लग्न तर झालें. आणि माझ्या अनुरूप भ्रतारहि मिळाला. परंतु माझ्या सुमतीविषयीं मी फार दिलगीर आहें.

सुमती, भानुमतीजवळ होती. तिजवर चंद्रसेनाची अकस्मात् दृष्टी गेली. तिला पाहून मनांत म्हणतो, ही स्त्री कोण असावी, न जाणो कोणी लग्नास आलेली असेल. आहाहा ! हिचें रूप तर भानुमतीहूनहि विशेष सुंदर आहे. कोणाच्या दैवांत हिचा लाभ असेल तो भाग्यवानच म्हटला पाहिजे. असें मनांत म्हणून, घडिघडी तिजकडे पाहात असे सुमतीनें. भानुमती जेथें बसेल तेथें तिजबरोबर नेहमीं प्रमाणें असावें. चंद्रसेन तिजकडे पाहूं लागला म्हणजे, तिनें भानुमतीकडे पाहावें. यामप्रमाणें सुमारें महिना पंधरा दिवस, लग्नसोहळा आनंदानें होऊन; सर्व राजे आपापल्या गांवीं गेले. चित्रसेन राजाहि आपल्या शहरास जाण्याच्या तयारींत आहे. तों चंद्रसेनास फार वाईट वाटून, तो मनांत म्हणूंलागला, आमची जाण्याची तर तयारी झाली. आणि आपण भानुमतीस घेऊन गांवीं गेल्यावर, सुमतीविषयींचा माझा मनोरथ कसा सिद्ध होईल. यास कांहीं तरी युक्ति काढली पाहिजे. असें म्हणून भानुमतीच्या महालांत गेला. तों भानुमती आणि सुमती कांहीं

बोलत आहेत असें पाहिलें. चंद्रसेन आले असें पाहून, सुमतीसहित भानुमतीने, त्यास खडी ताजीम देऊन जवळ गेली.. आणि पतीचें चिंतायस्त मुख पाहून म्हणाली. प्राणनाथ, आज आपण कोणत्या तरी चिंतेंत आहां. असें मी अपला मुखचंद्रमा पाहून खचीत अनुमान करित्यें. तर अशी आपल्या मनांत कोणती चिंता प्राप्त झाली आहे, ती मला निवेदन केली पाहिजे. असें भानुमतीचें बोलणें ऐकून, चंद्रसेन आपला खरा हेतु तिला दर्शविण्यास, लज्जायमान होऊन म्हणाला. मला कांहीं अगत्याच्या कार्याकरितां एथें कांहीं दिवस राहावयाचें होतें. परंतु आमची जाण्याची तर तयारी झाली. हेंच चिंतेचें कारण. दुसरें कांहीं नाहीं. हें ऐकतांच भानुमतीनें अनुमान केलें कीं हें सर्व सुमतीकरितां आहे दुसरें कांहीं काम नाहीं. सुमती मजबरोबर येणार नाहीं हें स्पष्ट आहे; कारण ती आतांउपवर झाली आहे आणि तिचा बाप तिच्या लग्नाच्या तजविजींत असेल,म्हणून तिचें येणें मजबरोबर घडणार नाहीं. बरें आतां कांहीं दिवस एथें राहावें असें जें ह्यांचें म्हणणें,तें माझ्या हिताचेंच झालें असें मी खचित समजत्यें. कारण सुमतीवांचून मला एक क्षण देखील जाणार नाहीं. आणि चंद्रसेनहि तिजविषयीं फार उत्सुक आहेत, तस्मात् आम्हां दोघांसहि तिजवांचून राहवणार नाहीं. तर आपलें राहणें ह्यांच्याच नावानें होईल, असें म्हणून ती चंद्रसेनास म्हणाली. मला आज्ञा द्याल तर आपला राहण्याचा उद्देश, आईस जाऊन कळवित्यें. ती माझ्या बापास सांगून मामाजी-

स कळवील म्हणजे तुमचें काम होईपर्यंत राहणें होईल असें मला वाटतें. हें ऐकून, चंद्रसेन म्हणाला ठीक आहे पण मामी विचारितील कीं असें कोणतें काम आहे तर तूं काय सांगशील ? भानुमती म्हणाली. त्याची चौकशी ती मजजवळ करणार नाहीं. कदाचित् केली तर तें मला ठाऊक नाहीं असें सांगेन. असें म्हणून भानुमती आईच्या महालांत गेली. सुमतीहि तिजबरोबर गेली. नंतर चंद्रसेन मनांत म्हणतो ही भानुमतीच्या जवळ सर्वदां असत्ये. तिला सोडून कोठेंच जात नाहीं. मला तर सुमतीवांचून चैन पडत नाहीं. माझ्या मनांत आईच्या महालांत जाईल तेव्हां तरी सवड सांपडेल, पण तें नव्होतां दोघीहि गेल्या. आतां कसेंहि असो पण माझा हेतु पूर्ण झाल्याशिवाय मी गांवास जाणार नाहीं. असें म्हणोन महालांत बसला. भानुमती आईजवळ येऊन म्हणाली. माझ्या पतीची इच्छा, कांहीं दिवस ह्या शहरांत राहावें अशी आहे; तर तूं माझ्या पित्याकडून त्याच्या बापास कळवावें अशी माझी विनंती आहे. वसुमतीनें आपल्या जामाताची इच्छा एथें राहाण्याची आहे असें ऐकतांच, तीस आनंद होऊन; रात्रौ विदूरथ राजास विनंती करून म्हणाली. प्राणनाथ, भानुमती आज दोनप्रहरीं मजकडे येऊन, आपल्या पतीची इच्छा कांहीं दिवस या शहरांत राहाण्याची आहे; असें सांगत होती. तर आपण त्यांस ठेवून घ्यावें. हें वर्तमान ऐकतांच विदूरथास मोठा आनंद होऊन, मी त्यांस यथेंच ठेवून घेतों असें वसुमतीस म्हणाला. दुसऱ्या दिवशीं चित्रसेन रा-

जाची सर्व सेना सिद्ध होऊन राहिली आहे. तों दरबारांत जाऊन विदूरथ राजा चित्रसेनास म्हणाला. आपणापाशीं एक विनंती करावयाची आहे आणि ती मनःपूर्वक आपण मान्य करावी असा हेतु आहे. ती हीच कीं माझ्या पोटीं काय ती ही एकच कन्या ! ती आपल्या पदरांत घातली आहे. तीच सर्व माझ्या राज्याची मालक आहे. तस्मात् हें सर्व राज्य आपलेंच असें समजलें पाहिजे; तर माझा हेतु आहे कीं, कांहीं दिवस आमचे जामात आमच्या घरीं असावे. हें ऐकून, चित्रसेन राजास फार आनंद होऊन म्हणाला. आपण त्यांस विचारावें आणि ते खुषीनें राहातील तर मी त्यांस ठेवून जाईन. हें ऐकून, त्या दरबारांत बसलेल्या चंद्रसेनास; विदूरथ राजा म्हणाला. आपण एव्हांच जाण्याची उतावळी करूंनये; अशी माझी इच्छा आहे. तें ऐकून, चंद्रसेन आपल्या पित्याकडे अवलोकनकरून म्हणाला. फार उत्तम आहे,आपल्या आज्ञेप्रमाणें राहाण्यास मी नकारकरणार नाहीं. असें ऐकतांच, चित्रसेन राजाहि त्यागोष्टीस कबूल झाला. कारण विदूरथ राजास एकच कन्या आणि दुसरें कांहीं संतान नव्हतें. तेव्हां त्यास मुलीच्या वियोगेंकरून अतिशय दुःख होईल असा विचार करून, चंद्रसेनास राहण्यास आज्ञा देऊन; आपण जाताझाला.

चित्रसेन राजा गेल्यानंतर, चंद्रसेन भानुमतीसह विरामपूर नगरांत राहिला. सुमतीहि मोठी आनंद युक्त झाली भानुमती एकेदिवशीं सुमतीस म्हणाली सुमती तुझें लग्न केव्हां होईल ही काळजी मला आहे ई-

श्वरातें ती वेळ जवळ आणावी कारण चंद्रसेन येथें कितीदिवस राहतील याचा नेम नाहीं. असें बोलत असतां सुमती ह्मणाली, भानुमती बाई मला आज सकाळीं आईकडून निरोप आला आहे, जर आपण मला आज्ञा द्याल तर मी उभ्याउभ्यानीं जाऊन येत्यें. भानुमती ह्मणाली बरें तर लौकर येहो ! असें ह्मणून तीस आज्ञा देती झाली. सुमती मेण्यांत बसून घरीं गेली आणि सर्व अंगावरचे दागिने काढून आई पुढें टाकिले; आणि मोठ्यानें आक्रोश मांडिला ! तें पाहून आई भयभीत होऊन तीस पोटाशीं धरून, बहुत रीतीनें तिचें समाधान करूंलागली, परंतु ती कांहीं केल्यानें ऐकेना; तेव्हां निरुपाय होऊन तिनें दरबारांत (नवऱ्यास) प्रधानास सांगून पाठविलें. इतक्यांत प्रधानही दरबारांतून घरीं येतच होता, त्यास तें मार्गांत समजलें. तो घरीं येऊन, आईच्या मांडीवर निस्तेज व निश्चेष्ट पडलेली मूल पाहून गंहिवरला, आणि तिला पोटाशीं धरून असें होण्याचें कारण स्त्रियेस विचारूंलागला; तेव्हां तिनें सविस्तर हकिकत सांगीतली. आणि ह्मणाली, मी केव्हांची तीस समजाविल्यें, परंतु ती कांहीं केल्यास उगीच राहत नाहीं. तेव्हां प्रधान ह्मणाला सुमतीबाई, तुला काय पाहिजे तें मला, सांग ह्मणजे मी तुला देतों. तुझें लग्न करावयाच्या बेतांत आहें, तुझ्या अनुरूप वर मिळाला ह्मणजे झालें; तूं काळजी करूंनको. असें पुष्कळ रीतीनें त्यानें तिचें शांतवन केलें, तथापि ती उगीच राहेना; असें पाहून प्रधान सुमतीस

ह्मणाला. मुली तुला कोणतें दुःख आज आठवलें आहे तें मला निर्भयपणें सांग. तेव्हां सुमती ह्मणाली, मला एक वस्तु पाहिजे आहे, आणि ती जर आणून द्याल तरच हा माण ठेवीन. हें ऐकून प्रधान ह्मणाला, अशी अपूर्व कोणती वस्तु तिचें नाव सांग, ह्मणजे तुला आणून देतों; जरी मोठ्या किमतीची असली तरी घेण्यास अनमान करणार नाहीं, आणि आपल्या शहरांत न मिळेल तर मिळेल तेथून आणून देईन. असें बापाचें बोलणें ऐकून सुमती ह्मणाली. येथून उत्तरेस सात पर्वत आहेत आणि त्यांच्यापलीकडे मोठें एक सरोवर आहे; त्यांत सुवर्णाचीं कमळें आहेत आणि त्यांच्या मध्यभागीं एक विहीर आहे, परतु तिचें तोंड त्या सरोवराच्या पाण्याबरोबर असल्यामुळें; ती कोणाच्या दृष्टिगोचर नाहीं. तर त्याच्या मध्यभागीं जाऊन, बुडी मारणारा चांगला हुशार असला तर तो शोधून काढील, आणि त्या विहिरींतून तळीं गेला म्हणजे त्यास खालीं दुसरी पृथ्वी लागेल. तेथें एक सुवर्णाचा अश्वत्थ वृक्ष आहे. त्याच्या डाहाळीस एकशें नऊ रत्नांचा हार आहे तो मला पाहिजे; आणखी कांहीं नको. असें कन्येचें भाषण ऐकून थोड्या दिवसांत हार आणून देतों, अशा रीतीनें तिचें समाधान करून व टाकलेले पूर्वीचे अलंकार घेववून, प्रधान आपल्या कामास गेला.

इकडे भानुमती आपल्या महालांत दासी सह बसली आहे, तों चंद्रसेन भानुमतीच्या महालांत आले आणि इकडून पाहतात, तों सुमती भानुमतीजवळ नाहीं.

तेव्हां त्यास वाटलें कीं तीस कांहीं कामाकरितां भानुमतीनें पाठविलें असावें, म्हणून तो फिरून तिची एकांतीं गांठ व्यावी अशा इच्छेनें पाहात आहे; परंतु ती कोठें महालांत नाहीं. असें जेव्हां त्यास खचित समजलें तेव्हां तो भानुमती जेथें होती तेथें आला. चंद्रसेन आले असें दासीनें कळवितांच, भानुमती उठून त्याच्याशीं हर्षयुक्त भाषणें करूंलागली. चंद्रसेन म्हणाला, तें सर्व खरें पण आज सूर्य पूर्वेचा पश्चिमेस उगवला असें मला वाटतें. तें ऐकून भानुमती संशय युक्त होत्साती म्हणाली, असें कसें होईल ! पश्चिमेस सूर्य कधींच उगवत नाहीं. चंद्रसेन म्हणाला हें जर खरें तर आज तुमची मैत्रीण तुम्हांस सोडून कशी गेली ! ह्याचें मला नवल वाटतें. असें ऐकून भानुमती किंचित् हास्यवदन करून म्हणाली. प्राणनाथ, आज तिच्या आई कडून कांहीं निरोप आला होता, असें तिणें मला सांगून माझी आज्ञा घेऊन नुकतीच गेली. आणि इतक्यांतच परत येईल. असें म्हणून चंद्रसेनासह आनंदांत बोलत बसली आहे.

इकडे सुमंत प्रधानानें गावांत हेराकडून चौकशी करवून, पानबुड्यांच्या कामांत मोठे कसबी असे बारा असामी आणविले, आणि त्या प्रत्येकास दाहा हजार रुपये बक्षीस देण्याचें करून, त्या कृत्यास पाठविले. असें पाहून सुमती आनंद युक्त होत्साती, पुन्हा मेण्यांत बसून, भानुमतीच्या महालांत उभयतां बसलीं होतीं तेथें आली. तेव्हां भानुमती हर्षयुक्त होऊन सुमतीस ह्मणत्ये, आज आईच्या घरीं गेली होतीस, तिकडची

कशीकाय खबर आहे. सुमती म्हणाली, भानुमती बाई समजल्यें मीं कधी ही, आपल्यास सोडून नजाणारी, ती आज तुम्हांस सोडून गेल्यें म्हणून असें बोलतां; तर पुन्हा तुम्हीं जा म्हटलें तरीं मी जाणार नाहीं. भानुमती म्हणाली सुमती तुला राग आला काय ? तसें नाहीं गे, तुला खरेंच सांगत्यें मला प्राणनाथ म्हणाले, आज पूर्वेचा सूर्य पश्चिमेस उगवला. हें ऐकून सुमती म्हणत्ये. मी आज आईच्या घरीं गेल्यें, म्हणून पूर्वेचा सूर्य पश्चिमेस उगवेल असें कधीं तरीं घडेल काय ? आज उभयतां माझे अपरोक्ष माझ्या मस्करीचा बेत केला आहां, असें मला वाटतें. हें ऐकून थोडी बोलण्याची संधी सांपडली आहे असें पाहून चंद्रसेन म्हणाला. सुमती ती खरी गोष्ट आहे, असा प्रसंग आजपावेतों आला नव्हता म्हणूनच भानुमतीनें विनोद केला; परंतु त्यास तुझ्या इतकी लवकर समजणारी दुसरी स्त्री विरळाच. तेव्हां सुमती जरा लाजल्यासारखी होऊन म्हणाली. भानुमतीबाई, तुम्ही माझी मस्करी केली तथापि मला कांहीं राग नाहीं. मी तुमची दासी आहें. त्या दिवसा पासून चंद्रसेन तिशीं कांहीं निमित्तानें, भानुमती जवळ असतांही बोलत असे. आणि सुमतीही त्यानें कांहीं काम सांगितलेलें करीत असे. प्रधानजीनें दाहा हजार रुपये एकेकास इनाम द्यावयाचें करून बारा असामी पाठविले; ते उत्तरदिशेकडे चालले. तों दोनमहिन्यांनी त्यांस घोर जंगल लागलें, त्यांत भयंकर जनावरें असल्या कारणानें त्यांतून जाणें त्यांच्या जिवावर आलें; परंतु ते बारा असा-

मी असून त्यांजवळ हत्यारें वगैरे सर्व सरंजाम असल्याकारणानें, त्या जंगलांतून निर्भयपणें पसार झाले; तों पुढें पर्वत लागला. तो पाहून त्यांस कांहींसें बरें वाटलें. तो उल्लंघन करून जातांच दुसरा लागला. तेव्हां त्यांस प्रधानानें सांगितलेली खूण पटत चालली. त्याचदिवशीं इकडे भानुमतीस, कांहीं दुश्चिन्हें होऊन पहिल्यानें ज्वर आला, आणि सातहि पर्वत उल्लंघन करतांच भानुमतीस सातदिवस ज्वरानें व्याकूळ केलें. विदूरथ राजानें तीस हजारो वैद्यांकडून औषध उपचार केले, परंतु ज्वर निघेना ! आणि जस जसे ते त्या सरोवरा नजीक चालले, तसतशा तिच्या नाडी व्याकुळ होत चालल्या. असें सुमतीनें पाहतांच मनांत मोठी दुःखित होऊन, भानुमतीस म्हणत्ये. बाई, आतां तुम्ही तर खचित मरणार आणि मी तर पुन्हा जिवंत करणार. तेव्हां चंद्रसेनास सांगावें कीं जर मी मेल्यें तर माझ्या भोजनादि सर्व पदार्थांची तयारी करून, मला कोठें तरी दुसऱ्या ठिकाणीं नेऊन ठेवावें; जाळूंनये. असें सुमतीचें वाक्य ऐकतांच भानुमतीस परम आनंद झाला, आणि आपला संकेत सिद्धीस न्यावयास तिनें हें केलें असें ती समजली. इतक्यांत चंद्रसेनही मोठा दुःखित होत्साता भानुमतीस अवलोकन करीत आहे तों, तिणें मानेनें त्यास जवळ येण्याची खूण केली आणि त्यास सांगूं लागली. प्राणनाथ, जर मी मेल्यें तर सुपतीस तुम्ही स्त्री करा, आणि माझें शरीर आपला लालबाग गांवांबाहेर आहे, तेथें नेऊन ठेवा. मला जाळूं नका आणि ही गोष्ट माझ्या बापास अथवा आ-

ईस अगदीं कळवूं नका. आणि तुम्हीं कांहीं दुःख न-करितां नित्य लालबागांत येऊन मला पाहात जा. आणि तेथें स्वयंपाक, पाणी, माझीं वस्त्रें व अलंकार सर्व तयार करून नित्य ठेवीत जा. हें सर्व स्वतः तुम्ही कलें पाहिजे; दुसऱ्या कोणास कळवूं नये.

चंद्रसेन राजाची भानुमतीवर फार प्रीति असे; कारण तिचा स्वभाव व स्वरूप दोन्ही फारच सर्वोत्कृष्ट होतीं. आणि सुमती देखत भानुमतीनें सुमती स्त्री करावी असें सांगतांच, त्यास फार दुःख झालें आणि सुमती मला नको असें, तिच्या देखतां म्हणून; त्यानें नेत्रांवाटे पाणि ढाळिलें; तें पाहून सुमतीही रडूं लागली.

इकडे ते बारा असामी त्या सरोवरावर येऊन त्यांनीं एकदम त्यांत उड्या घातल्या; आणि प्रथमतः त्यांत सुवर्णाचीं कमळें होतीं तीं घ्यावयास पाहूं लागले. तों ते त्या कमळांजवळ गेले म्हणजे तीं दिसेनासीं होत ! असें कांहीं वेळ त्या कमळांकरितां हैराण झाले; शेवटीं तीं मिळवयाचीं नाहींत अशी त्यांची खात्री झाली. नंतर ते त्या तलावाच्या मध्यभागास येऊन दाखल झाले, आणि पाहतात, तों विहिरीचा घेर त्यांस दिसूं लागला. तेव्हां एकानें त्यांत बुडी मारिली; परंतु विहीर फार खोल असल्या कारणानें त्यास दम छाटेनासा होऊन तोवर आला. आणि बाकीच्यांस तेथें जाण्यास सांगूं लागला.

(इकडे भानुमतीस सन्निपात होऊन मोठा आकांत झाला; तो वर्णन करितां येत नाहीं.) शेवटीं त्या

बोरा असामींत एक हनमंत म्हणून होता; तो सर्वांत सर्वोत्कृष्ट पोहोणारा होता. त्यानें बुडी मारिली आणि तळीं गेला. तों त्यानें खालीं दुसरी पृथ्वी पाहिली आणि सुवर्णाचा पिंपळाचें झाड ही त्याच्या दृष्टीस पडलें. नंतर तो त्या झाडावर चढून, एकशें नऊ रत्नांचा हार एका ढाळीस होता; तो घेऊन खालीं उतरला, आणि त्या विहिरींतून पुनः वर आला. त्या हारास हात लागतांच भानुमतीनें प्राण सोडला. तेव्हां विदूरथ राजानें व तिची आई व सुमती ह्यानीं फारच शोककेला. तसेंच प्रधान कन्या सुमती व चंद्रसेन ह्यानींही विलाप केला. गांवांतील सर्व लोकांसही अतिशय दुःख झालें. राजा दुःखानें अगदीं व्याकुळ होऊन घाबरा झाला. प्रधानानें पुष्कळ रीतीनें त्याचें समाधान केलें परंतु कांहीं केल्यानें त्याचा शोक कमी होईना ! तसेंच प्रधानाच्या स्त्रीनें व सुमतीस समजाविलें परंतु कांहीं केल्यानें त्यांचा शोक कमी नहोतां आकांत मांडिला. कारण त्यांस एकुलतें एक कन्यारत्न होतें तेंही नाहिसें झालें. आणि तिचें नुक्तेंच लग्न होऊन वरात गेली नाहीं, तोंच असें झालें. आतां तिच्या नवऱ्यास कोणत्या रितीनें परत पाठवावें ! असा प्रधानाशीं शोक करीत बेशुद्ध पडला; तें पाहून प्रधान ही फार शोक करूं लागला. कांहीं वेळानें सावध होऊन, विदूरथास हुशारी यावी, अशा करितां म्हणाला. महाराज आपण शोक करीत आहां येणें करून भानुमती जिवंत होईल काय ? ईश्वर इच्छे पुढें कोणाचा इलाज आहे !

आतां चित्रसेन राजास जाऊन सुमारें साहा महिने झाले नाहींत ! तों अशी गोष्ट कळविणें हें आपणावर ईश्वरानें मोठेंच संकट आणिलें आहे. खरें, परंतू ह्यास युक्ति सांगेन. आतां भानुमतीस स्वर्गवासी करणें हें योग्य आहे; तर आतां शोक करूनका. असें म्हणून प्रधानानें सर्व तयारी करून, भानुमतीचें प्रेत बाहेर काढलें. तेव्हां तिच्या आईचा आणि सुमतीचा शोक काय विचारावा ! आणि तें पाहून तर विदूरथ आणि चंद्रसेन अगदींच व्याकुळ होऊन गेले. त्यांचें समाधान करितांना प्रधान आणि सर्व मंडळी थकून गेली. शेवटीं भानुमतीचें प्रेत श्मशानांत नेलें, आणि चितारचून तीस आंत घालणार; तों अकस्मात चंद्रसेनास, तिणें सांगितलें, त्याची आठवण होऊन, तें प्रेत चितेंत न घालतां, त्याबदल एक पिठाचा पुतळा करून तो चितेंत ठेवून अग्नी दिला. हें पाहून प्रधानानें चंद्रसेनास विनंती केली आणि म्हणाला. महाराज, आपण हें काय केलें ? तेव्हां चंद्रसेन म्हणाला. आमच्या राज कुटुंबांतील मृत मनुष्यास आम्ही अग्नि देत नसतों. आतां हीस मी आपल्या गांवीं नेऊन आमच्या कुटुंबांतील मरण पावलेल्या मनुष्यांत नेऊन ठेवणार: असें ऐकून प्रधान उगाच राहिला. पुढें तें प्रेत उचलून गांवा बाहेर जेथें लालबाग होता, तेथें नेऊन तिचें पोटचिरून आंत सुवासिक वनस्पती घालून पलंगावर निजविलें. हें प्रधानावांचून इतरांस कळों दिलें नाहीं. आणि ही गोष्ट विदूरथ राजाजवळ बोलूंनये, म्हणून चंद्रसेनाने

प्रधानास ताकीद करून तेथील सर्व कर्म आटपून घरीं आले. पुढें बारा दिवस तिचें क्रिया कर्मांतर झालें. विदूरथ मोठा दिलगोर होऊन त्यास कांहीं सुचेना व गोड लागेना ! आणि जामाताकडे पाहून, वारंवार त्यास दुःख होई. चंद्रसेन नित्य लालबागेंत जात असे आणि भानुमतीचें मुखकमळ पाहून नित्य शोक करी. विदूरथ राजानें प्रधानास विचारिलें कीं, आतां चंद्रसेनास कोणती बायको द्यावी ? माझ्या पोटीं दुसरी जरी कन्या असती, तरी बरें होतें. ह्या काळजीने मी फारच व्याप्त झालों आहें . हें ऐकून प्रधान म्हणाला. महाराज, माझी कन्या आहे ती आपलीच असें समजून ती चंद्रसेनास स्त्री करावी. ह्यांत मला फार संतोष आहे. असें प्रधानाचें वाक्य ऐकून विदूरथास बरें वाटलें, आणि ही गोष्ट त्यानें चंद्रसेनास विचारून त्याचें लग्न करावें, असें त्यानें सांगितलें. तेव्हां सुमती ही भानूमतीच्या महालांत तिजकरितां फार दुःखित होऊन राहिली होती. चंद्रसेनही तेथेंच रात्रीस असे. दिवसास लाल बागेंत जावें आणि सर्व प्रकारें तेथें दीप वगैरे लावून नंतर संध्याकाळीं घरीं येत असे. परंतु सुमतीवर जी त्याची इच्छा होती, ती अगदीं नाहिशी झाली. आणि भानुमतीच्या दुःखें करून त्यास कांहीं चैन पडत नसे. सासूसासरा फार काळजीनें त्याची बरदास्त ठेवीत आणि त्यास कांहीं कमी न पडावें म्हणून सर्वांस सक्त ताकीद असे. मोठमोठे सरदार आणि प्रधान यांनीं नित्य त्याज बरोबर, इकडल्या तिकडल्या गोष्टी सांगू-

न; त्याचें मन फिरविण्यास प्रयत्न करावा. एके दिवशीं प्रधानानें आपली कन्या सुमती ही स्त्री करावी, असें चंद्रसेनास दर्शविलें. तेव्हां त्यास असें [illegible] तीनेंही सांगितलें होतें; त्याचें स्मरण होऊन तो अगदीं शोकार्णवीं बुडाला ! असें पाहून प्रधानानें त्याचें समाधान करून, सुमती त्याच्या योग्यस्त्री आहे आणि ह्या गोष्टीस विदूरथ राजाचेंही मत आहे असें सांगीतलें; परंतु तो त्यास कांहींच उत्तर न देतां उगाच राहिला. प्रधानानें हें वर्तमान जाऊन विदूरथ राजास कळविलें आणि म्हणाला. महाराज जर ही गोष्ट बाइसाहेबांकडून, चंद्रसेनास कळविली तर खचित होणारी आहे. असें मला वाटतें. तेव्हां विदूरथ राजानें वसुमतीस हें वर्तमान सांगितलें; तेव्हां वसुमती परम दुःखित होऊन, भानुमतीचें दुःख करूं लागली आणि म्हणाली. असा जांवई माझ्या भारब्धीं नाहीं त्यास काय उपाय आहे. बरें, सुमतीहि बाळपणापासून भानुमतीबराबर वाढली; तस्मात् तीच आपली भानुमती, असें समजून तीस तोच भ्रतार करून द्यावा. असें विदूरथ वसुमती ह्यानीं विचार करून, चंद्रसेनाजवळ वसुमतीनें ही गोष्ट ठरवावी व चित्रसेन राजास समजूं नये अशी योजना व्हावी, असें सांगितलें.

एके दिवशीं, चंद्रसेन भानुमतीच्या महालांत आहे अशी सवड पाहून; वसुमती मोठी दुःखीत होत्साती तेथें आली. तों सुमतीही तेथें होती. तिनें वसुमती आली असें पाहून भानुमतीकरितां दुःख करून

मोठ्यानें रडूं लागली. तेव्हां वसुमती तीस आलिंगन देऊन म्हणाली. सुमती, तूं माझी भानुमतीच आहेस; असें मी समजत्यें. तर आतां त्वा भानुमतीच्या जागी राहावें आणि तेणेंकरून आम्हांस भानुमतीचा विसर पडेल. कारण बाळपणापासून तूं भानुमती जवळून एक क्षणभर देखील दूर राहिली नाहींस आणि ईश्वरानें तुझ्याशीं तिचा वियोग केला, तस्मात् त्यास काय उपाय ! माझी एकुलती एक कन्या असून तिचें असें झालें ! तर मी तुलाच माझी कन्या असें समजून चंद्रसेनाबराबर लग्न करून देत्यें. असें म्हणून जामातृकडे पाहत्ये. तों भानुमतीच्या वियोगानें अगदीं व्याकुळ झाल्या सारखा त्यास पाहून वसुमतीस फार दुःख वाटलें. आणि जवळ जाऊन, चंद्रसेनास कांहीं ममतेच्या गोष्टी सांगून; झाल्या गोष्टीस कांहीं उपाय नाहीं असें त्यास समजावून, सुमती स्त्री करून घ्यावी म्हणजे आम्हास परम सुख होईल असें म्हणाली. तेव्हां चंद्रसेन म्हणाला. मामी तुम्ही जें सांगाल त्यास मी खुषी आहें. परंतु मला भानुमतीची वारंवार आठवण होत्ये; तेणेंकरून मला कांहींच सुचत नाहीं. तस्मात् जें तुम्ही कराल त्यास माझें मत आहे. असें ऐकतांच वसुमती त्याचें शांतवन करून जाती झाली.

रात्रौ विदूरथ राजास सर्व हकीकत सांगितली. प्रातःकाळ होतांच विदूरथ नित्य कर्म साधून दर्बारास गेला. तेथें चंद्रसेन नित्याप्रमाणें बसला होता. तेव्हां विदूरथानें आपले पंडितांस सांगितलें कीं सुमती

माझी कन्या, ही चंद्रसेनास देऊन लग्न करणें आहे; तर मुहूर्त केव्हां आहे तें कळवावें. पंडितांनीं उदयिक मुहूर्त आहे असें सांगितलें; तेव्हां दुसऱ्या दिवशीं सुमुहूर्तावर लग्न करण्याचें ठरलें. नंतर सर्व सिद्धता करण्यास प्रधानास हुकूम दिला. प्रधानास मोठा आनंद होऊन मनांत म्हणतो, माझ्या कन्येस अनुरूप भ्रतार कसा मिळेल याची काळजी करीत होतों, ती अनायासें काळजी निवारण झाली. असें म्हणत आनंदानें सर्व सिद्धता करून, सुमतीचें आणि चंद्रसेनाचें लग्न लावून दिलें. पुढें तीं उभयतां भानुमतीच्याच महालांत राहिलीं. चंद्रसेन सुमतीशीं कांहींच भाषण करीत नसे.

इकडे कांहीं दिवसांनी ते बारा असामी येऊन शहरास दाखल झाले आणि प्रधानाची भेट घेऊन तो हार त्याच्या स्वाधीन केला. तेव्हां प्रधानानें त्यांच्या कबुलायती प्रमाणें दाहा दाहा हजार रुपये व शेलापागोटें देऊन खुषी केले. आणि तो हार नेऊन सुमतीस देता झाला.

सुमती तो हार पाहून मोठी खुषी झाली, आणि आपल्या बापास सांगून तो हार ठेवण्यास एक हिरेजडीत पेटी मागितली. त्या पेटींत तो हार ठेविला आणि पेटी बंद केली. त्यावेळीं चंद्रसेन लालबागेंत होता. तों तिकडे अकस्मात् भानुमती उठून बसली. तेव्हां चंद्रसेनास जो आनंद झाला त्यास पारावार नाहीं. त्यानें तिला उष्णोदकानें स्नान घातलें आणि स्वयंपाककरून जेवावयास घातलें. आठच्यार दिव-

सांनीं भानुमती पूर्ववत् हुशार झाली. ज्यावेळीं सुमती, तो हार त्या पेटींतून काढून आपल्या गळ्यांत घाली त्यावेळीं भानुमती पुनः प्रेतवत् होऊन तेथल्या तेथें पडत असे.

अशांत भानुमतीस गर्भ राहिला. नऊ मास पूर्ण होऊन तीस पुत्र झाला. तिचें बाळंतपण करून सर्व काम ही चंद्रसेनानें स्वतःच करावें. सुमतीबराबर त्याचें मुळींच भाषण नव्हतें. मुलगा मोठा झाला; त्यास चांगलें समजूं लागलें. तो रूपानें फार सुंदर आणि त्याचे नेत्र कमलाप्रमाणें असल्या कारणानें; चंद्रसेनानें त्याचें नाव कमलाक्ष ठेविलें होतें. चंद्रसेन फार करून दिवसभर भानुमतीजवळ लालबागेंत असे. व रात्रौ घरीं असे. ज्या वेळीं भानुमती प्रेतवत् होऊन पडे आणि चंद्रसेन कदाचित् त्यावेळीं तेथेंनसे; तेव्हां कमलाक्षानें चंद्रसेन आला ह्मणजे त्यास ह्मणावें. बाबा आज आई जिन्यावरून उतरताना खालीं पडली. मी तिला पुष्कळ हांका मारिल्या पण कांहींच बोलली नाहीं. तेव्हां मी घाबरून रडूं लागलों आणि तुला पाहावयास हांका मारीत रस्त्यावर गेलों. पण तूंहि नाहींस ! तेव्हां परत येऊन आई जवळ बसलों, आणि पुष्कळ हाका मारल्या, तरी कांहीं बोलली नाहीं. नंतर मग फार वेळानें ती उठली आणि मला जवळ घेऊन गोष्टी सांगूं लागली. असें मी कधीं कधीं पाहात असतों.

चंद्रसेन केव्हां केव्हां कमलाक्षास बरोबर घेऊन

घरीं येत असे. त्याजवर सर्वजण फार प्रीति करीत असत. तो आपल्या आईस म्हणे आई मी जेथें जातों, तेथें तुझ्या सारखी दुसरी कोण आहे? ती बाबाच्या पुढें पुढें येत असत्ये, पण बाबा तिशीं कांहींच बोलत नाहीं. तिच्या गळ्यांत एक मोठा चमत्कारिक हार आहे तो एकादे दिवशीं पाहातों; पण कीती गे आई चांगला आहे! मला तो पाहिजे. तेव्हां भानुमती म्हणाली. बाबा तूं जेव्हां आपल्या बापा बराबर तेथें जाशील, तेव्हां त्याजवळ माग; म्हणजे तुला मिळेल. हें ऐकून तो उगाच राहिला. दुसऱ्या दिवशीं चंद्रसेन नित्यप्रमाणें घरीं जाण्यास निघाला, तेव्हां त्याजबराबर कमळाक्षहि घरीं आला. वसुमती त्याजवर फार प्रीति करीत असे आणि त्यास पाहून हा भानुमतीच्या उदरीं चंद्रसेनापासून झाला असावा, असें विदूरथास वाटे म्हणून तोहि त्याजवर प्रीति करीत असे आणि सुमती तर त्याजवर अत्यंतच प्रीति करी, कारण तो भानुमतीचा पुत्र आहे असें ती खचित समजत होती. त्या दिवशीं तिच्या गळ्यांत हार पाहून, कमलाक्ष चंद्रसेनास म्हणाला. बाबा माझ्या गळ्यांत हा हार घाला? असें म्हणतांच चंद्रसेनानें सुमतीस तो हार कमलाक्षाच्या गळ्यांत घालावा म्हणून सांगीतलें. तेव्हां तिणें आपल्या गळ्यांतून काढून त्याच्या गळ्यांत घातला.तों कमलाक्षानें सुमतीची व चंद्रसेनाची नजर चुकवून, तेथून निघून भानुमती जवळ आला. तो हार भानुमतीनें पाहातांच तीस मोठा आनंद झाला. कारण ज्या वस्तूंत तिचें मरण होतें,

ती वस्तूच तिच्या स्वाधीन झाली. असें पाहून ती सुमतीचे मोठे आभार मानूं लागली. आणि तो हार कमळाक्षाच्या गळ्यांतून काढून तिनें अक्षयी आपल्या गळ्यांत घालून ठेविला.

इकडे चंद्रसेन, कमलाक्ष कोठें नाहीं असें पाहून परत लालबागेंत आला. तों कमलाक्ष भानुमतीजवळ बसला आहे; असें पाहून त्यास ह्मणतो. अरे तूं मोठा धीट आहेस! एकटाच निघून तूं इतक्या लांबवरा आलास; तुला रस्ता तरी कसा माहीत झाला. तेव्हां कमलाक्ष ह्मणाला. बाबा मला रस्ता माहीत आहे, भानुमतीनें कमलाक्षाच्या मुखावरून हात फिरवून त्याचें मुखचुंबन केलें आणि म्हणाली. कमलाक्षा, चला आपण आतां आपल्या घरीं जाऊं? असें चंद्रसेनानें ऐकतांच त्याणें तत्क्षणीं पालखी आणवून, कमलाक्षास व भानुमतीस बसवून घरीं घेऊन गेला.

विदूरथ आणि वसुमती या उभयतांनीं जेव्हां भानुमतीस पाहिलें; तेव्हां त्यांस जो आनंद झाला त्यास पारावार नाहीं. सर्व शहरांत बातमी कळतांच घरोघरीं लोक आनंद करूंलागले आणि विदूरथ राजानें मोठा उत्साह केला, कमलाक्षास पाहून तर त्यास मोठाच आनंद झाला. परंतु हें वर्तमान कसें घडलें ह्याची बारकाईनें चौकशी करितां हें विघ्न सुमतीनें केलें असें समजलें. तेव्हां विदूरथ मोठा संतप्त होत्साता मधानासमवेत भानुमतीच्या माहालांत आला, आणि सुमतीस पाहून तिचा तत्क्षणीं शिरश्च्छेद करावा, ह्मणून हातांत तरवार घेऊन सरसावला. तों

भानुमतीनें पुढें येऊन त्याचा हात धरिला आणि त्यास सिंहासनावर बसवून म्हणाली. बाबा स्त्रीवध करणें ह्यांत मोठें पातक आहे. हें मी तुम्हास सांगावें असे नाहीं तुम्ही सुज्ञच आहां. याशिवाय जें कांहीं करणें तें आपण करण्यास समर्थ अहां; तत्रापि त्याचा क्रोधशांत होईना ! आणि रात्रींचा समय असल्या कारणानें त्यास कांहीं दुसरा इलाज सुचेना ! तेव्हां त्यानें सुमतीच्या हातापायांत बिड्या घालून कैदें करून त्या महालांतच तिला ठेविलें. आणि उदईक तिचा वध करावा म्हणून प्रधानास हुकूम केला. तेव्हां सुमती भयकंपित होऊन हात जोडून विदूरथ राजास म्हणाली. महाराज, ईश्वरी संकेता पुढें कोणाचा इलाज नाहीं. व त्याच्या इच्छे विरुध्ध कोणतेंहि कृत्य घडत नाहीं. हें जर खचित आहे तर हें कृत्य मी केलें असें म्हणवत नाहीं. आम्हां उभयतांस एकच अनुरूप भ्रतार आसावा एतदर्थ हें कृत्य ईश्वर संकेतानें झालें. स्वरूपाभिमानाकरितां स्त्रीपुरुषांस अशीं संकटें पडतच असतात; म्हणून या गोष्टीचा आपणांस क्रोध न यावा. पिरोजशाहानें गुलछबू करितां व तिनें त्याच्या करितां कसकशीं दुःखें व संकटें भोगिलीं. ह्या विषयीं आज्ञा असल्यास सांगत्यें. असें ऐकून विदूरथ संतप्त होत्साता सुमतीस म्हणतो. तें मी ऐकण्यास खुषी नाहीं. माझ्या मुलीची अशी दशा करून, मला व माझ्या शहरच्या लोकांस; जें दुःख दिलेंस त्याचा सूड घेतल्या शिवाय मी राहणार नाहीं.

असें भानुमती बापाचें वाक्य श्रवण करून म्हणाली. बाबा, सुमती माझी बाळपणीची मैत्रीण आहे. यास्तव तिची गोष्ट मला ऐकूं द्या; मग जें तुम्हांस करणें तें करा. असें ऐकून, भानुमतीच्या आग्रहास्तव; त्यानें सुमतीस गोष्ट सांगण्यास आज्ञा दिली. तेव्हां सुमती सांगत्ये.

मराठी ग्रंथ संग्रहालय पुणे.

पिरोजशाहा

आणि

गुलछबू

आलकाँफ शहरचा बादशहा; अँफ्जूलखान नामकहोता. ह्याच्या कारकिर्दीत, त्या शहरचे लोक फार सुखी व राजनिष्ठ होते. आणि तो लेंकरामप्रमाणें प्रजेचें पालन करित असे. तो स्वभावानें धार्मिक असून मोठा शूर, पराक्रमी व सुज्ञ होता. त्याच्या दरबारांत अष्ट प्रधान होते. त्यांत जाफरखान नामें मुख्य प्रधान होता. जलालू दीन, सर्व सेनेवर मुख्य असून, त्याच्या हाताखालीं मोठमोठे शूर असे निवडक सुमारें दोनशें सरदार होते. त्याचें अफाट राज्य असल्या कारणानें, सेनाहि बरीच होती आणि सर्व मांडलिक राजांस ह्याचा मोठा दरारा असे. अ-

सें असतां, त्याच्या पोटीं संतान नसल्या कारणानें, त्याचें मन फार दुःखित असे. कधीं कधीं त्यास असें वाटत असे कीं, सर्व राष्ट्राचा परित्याग करून हें आयुष्य ईश्वर प्रीत्यर्थ घालवावे. व आवलियाचे संगतींत काळ क्रमावा. आणि तेणेंकरून ह्या देहाचें तरी सार्थक करून घ्यावें. अफँजूलखान याणें त्याप्रमाणें करण्यास प्रारंभ केला. त्या शहरांत ज्या मशीदी, दरोगे, व निमाज पढण्याच्या जागा होत्या; त्यांमध्यें त्यानें सदावर्तें चालू केलीं. अंध, पंगु व गरीब, अशा लोकांस त्यांच्या इच्छेप्रमाणें तत्क्षणीं देऊन सुखी करावें. तसेंच बाहेर गांवीं म्हणजे जीं राज्यें त्याच्या अधिकाराखालीं होतीं; त्या सर्व ठिकाणीं, याचप्रमाणें योजना केली होती. तेणेंकरून त्याची प्रजा फार सुखानें नांदत असे. आणि दिवसें दिवस त्याचें राज्य मोठें वृद्धिगत झालें. कोणी बंडवालें, व चोर, असे जे लोक त्याचे राष्ट्रांत होते, त्यांच्याही वृत्तीस फेर पडून अशा लोकांपासून प्रजेस तिळमात्रहि भयनव्हतें.

कांहीं काळानंतर बादशाह अफँ जूलखानास ईश्वरप्रसादेंकरून पुत्र झाला. त्याकाळीं सर्व शहरांत व सर्व राष्ट्रांत महोत्साह चालू झाले.हत्तीवर साकर लादून देशोदेशीं पाठविली. तेणेंकरुन पुत्र झाल्याची बातमी राष्ट्रांत पसरली. कोट्यावधि द्रव्याचा धर्महीं केला. तो पुत्र केवळ ईश्वरी अंशाप्रमाणें भासे. तें इतका रूपवान् होता कीं त्याजवरून कोट्यावधि मदन ओंवाळून टाकावे. त्याचे नेत्र, व सर्व अवयव चित्राप्रमाणें रेखले होते. उत्पन्न कर्त्यानें आपली पूर्ण

मेहनत खर्च केली असें म्हणण्यास हरकत नाहीं.

असा सुपुत्र आपल्या वृद्धापकाळीं झालेला पाहून बादशाहास किती आनंद झाला असावा ! ज्यावेळीं तो मुलगा बारा दिवसांचा झाला, तेव्हां त्याचें नांव पिरोजशाहा असें ठेविलें.तें नांव त्याच्या रूपास यथार्थ होतें. जसजसा तो मोठा होऊं लागला तसतसें त्याचें स्वरूप शुक्लपक्षीय चंद्र कलेप्रमाणें वाढूं लागलें. त्या वृद्ध मातापितरांची त्यावर इतकी प्रिति असे कीं, त्यावांचून त्यांला एक क्षणभर देखील चैन पडत नसे. असें असतां जेव्हां तो पांच वर्षांचा झाला तेव्हां त्यास गुरुजीच्या स्वाधीन केलें. मुलगा रूपानें तर अति सुंदर असून, त्याचें चातुर्य व बुद्धि; केवळ त्याच्या स्वरुपाच्या कलाच होत. तो फार बुद्धिमान् असल्यानें थोड्क्या काळांत त्याणें बरीच विद्या संपादन केली. तेणेंकरून त्याच्या गुरुजीस परमानंद झाला. व बादशाहानेंही गुरुजीस मोठें बक्षीस दिलें. जेव्हां तो पंधरा वर्षांचा झाला तेव्हां धर्मशास्त्र, नीतिशास्त्र, वैद्यशास्त्र, अशा विद्या मुखोद्गत झाल्या. अशा रितीचा त्याचा अभ्यास पाहून बादशाहास फार आनंद वाटला आणि त्याच्या दरबारांत मोठ मोठे पंडित, मंत्री, वैद्य असे जरी महान् विद्वान् होते, तरी पिरोजशाहा प्रमाणें प्रश्नाचें उत्तर देण्यास; कोणीहि त्यांत समर्थ नव्हता. कारण याच्या अभ्यासाची रीति त्यांपेक्षां निराळी होती. त्या पंडितांस दरबारांत एखाद्या प्रश्नाचा उलगडा करणें झाल्यास पुस्तकाची गरज लागत असे. पिरोजशाहास तर त्याविषयीं कांहींच आयास पडत

नसे. त्यानें असें सांगावें कीं, ह्या शंकेचें समाधान अमुक पुस्तकाच्या अमुक पत्रांत केलें आहे त्यांत कांहीं फरक पडत नसे. असें जेव्हां त्या सर्व विद्वज्जनांच्या दृष्टोत्पत्तीस आलें तेव्हां त्या दरबारांत, पिरोजशाहाची मोठी कीर्ति होऊन; सर्व देशोदेशीं पसरली. इतका जरी तो विद्वान् हो ता, तथापि नित्यशः आपल्या महालीं; अभ्यासांत निमग्न असे. दरबारांत नित्यशः अर्धातास जाऊन पुनः परत आल्यावर, एकांतीं बसून; अभ्यास करीत असे. विद्याभ्यासांत तो इतका, निमग्न असे कीं, त्यास त्यावांचून दुसरें कांहींच दिसेना. जेव्हां तो आपल्या तारुण्यांत आला, तेव्हां त्याचें स्वरूप काय वर्णावें त्याची बुद्धि, चातुर्य, यांची तर सीमाच होती. सर्व देशोदेशींचे मांडलिक राजे, त्यास पाहाण्याच्या उद्देशानें स्वतः करभार घेऊन येत असत. आणि त्यास पाहतांच, त्यांच्या पोटांत मोह उत्पन्न होऊन असें वाटे कीं; कोणत्या तरी रीतीनें ह्याची मर्जी संपादन करावी. पिरोजशाहा स्वभावानें मोठा नम्र होता. त्याला मत्सर, क्रोध, हेशत्रु मुळींच ठाऊक नव्हते. जेव्हां तो वीसवर्षांचा झाला, तेव्हां अफजूलखान बादशाहानें त्याच्या लग्नाचा बेत करून; देशोदेशींच्या राजकन्येच्या तसबिरा आणविल्या. परंतु त्याच्य रूपाशीं तुलना करण्याजोगी एकही नाहीं असें पाहून बादशाहानें आपला मुख्य प्रधान जाफरखान यास सांगितलें कीं; ह्या तसबिरा तूं पिरोजशाहास नेऊन दाखीव. आणि मर्जीस कोणती उतरते हें विचार! म्हणजे आपल्या लग्नाचा विचार आहे असें त्याजला

समजून येईल. माझ्या मनांतील हेतु त्याचें लवकर लग्न झालें म्हणजे राज्य त्याच्या स्वाधीन करून आपण ईश्वरभजनीं तत्पर व्हावें आसा आहे; हेंहि त्यास कळीव. अशी राजाज्ञा होतांच त्या सर्व तसबिरा घेऊन पिरोजशाहाच्या महालांत प्रधान गेला. पिरोजशाहा आपल्या महालांत एकांतीं वाचित बसला आहे तों जाफरखानानें चोपदारास कळवितांच त्यानें आपले मुख्य प्रधान, भेटीची इच्छा धरून आले आहेत अशी पिरोजशाहास विनंती केली. पिरोजशाहानें प्रधानजीस आंत येण्याची परवानगी दिली. प्रधानानें जवळ येऊन मोठ्या अदबीनें पिरोजशाहास मुजराकेला. प्रधानजीचा योग्य सत्कार करून येण्याचें कारण पुसतांच; प्रधानजीनें त्या सर्व तसबिरा पुढेठेविल्या आणि सांगितलें कीं, बादशहाची इच्छा आपलें लग्न करून राज्याभिषेक करावा अशी आहे. तें ऐकून पिरोजशाहा कांहीं वेळ स्तब्ध राहिला. प्रधानजीनें पुनः विनंती केली कीं, आपल्या तीर्थरूपांचा दिवसानुदिवस वृद्धापकाळ होत आहे; त्यांनीं मोठ मोठे पराक्रम करून हें अफाट राज्य मिळविलें आणि ईश्वरानें त्यांच्या इच्छेनुरूप तुम्हा सारिखा पुत्र दिला. तेव्हां त्यांचा राज्याचाभार आपल्या शिरावर घेणें व त्यांच्या आज्ञेप्रमाणें चालणें हा पुत्रधर्मच आहे, आम्हीं आपणांस सांगावें असें नाहीं; आपण सुज्ञच आहां. हें ऐकून पिरोजशाहा खिन्न होत्साता म्हणाला. प्रधानजी, लग्न करण्याची मला इच्छा नाहीं, त्याशिवाय जो हुकूम करतील त्यास मी सिद्ध आहें.

आणि अतःपर लग्नाची गोष्ट सुद्धां माझ्यापाशीं काढूं नका. ह्या तसबिरा सर्व घेऊन जा, मी त्या अवलोकन करण्यासहि खुषी नाहीं. याप्रमाणें बादशाहास सांगावें. व असली खटपट घेऊन पुनः मजकडे येऊंनये; हें मी तुम्हांस निक्षून सांगतों. असें पिरोजशाहाचें रागीट बोलणें ऐकून, प्रधान मोठा विस्मित होऊन विचार करूं लागला कीं; पिरोजशाहास, क्रोध कसा हें ठाऊक देखील नसतां, ह्यावेळींच असें होण्याचें कारण काय ? आतां पुढें कमी जास्ती बोलण्याचा मार्ग अगदींच खुंटून गेला. ह्या तसबिरांतून एक सुद्धां अवलोकन नकरितां, लग्नच करावयाचें नाहीं म्हणतो; त्यापेक्षां एथें आपला इलाज कांहींच चालणार नाहीं. अशी त्याची खातरी होऊन, पिरोजशाहास पुनः मोठ्या अदबीनें मुजरा करून परवानगी घेतली, आणि त्या सर्व तसबिरा घेऊन बादशाहाकडे दरबारांत आला. प्रधानाचा मुखचंद्र उतरलेला पाहून, बादशाहास मोठा विस्मय झाला. तों प्रधानजीनें मोठ्या नम्रतेनें मुजरा करून झालेली हकीकत निवेदन केली. पिरोजशाहाच्या मनांत लग्न करावयाचें नाहीं, असें ऐकून बादशाहास मोठा राग आला. व तो तत्क्षणीं उठून बरोबर अष्ट प्रधान व पंडित घेऊन पिरोजशाहाच्या महालांत गेला. पिरोजशाहा, बादशाहा आल्याची बातमी समजतांच; सामोरा जाऊन पित्यास मुजरा करून मोठ्या प्रेमान त्याच्याजवळ बसला. आणि मोठ्या ममतेनें विचारूं लागला. ताता, आपण इतक्या त्वरेनें कां आलां,

आपण स्वतः येण्याचे श्रम घेतले, तेणेंकरून मला फार च दुःख वाटतें. पिरोजशाहाचें बोलणें ऐकून बादशाहाचा राग शांत झाला. आणि त्या तसबिरांतून ज्या सर्वोत्कृष्ट होत्या त्या दाखवूं लागला. आणि म्हणाला, पुत्रा, तुला यांतली कोणती स्त्री आवडते तें सांग. असा प्रश्न ऐकून, पिरोजशाहा खालीं मान करून रडूं लागला. बादशाहानें पुष्कळ रीतीनें त्यास विचारिलें परंतु कांहींच बोलत नाहीं. असें पाहून तो राणीच्या महालांत निघून गेला. बादशाहा आले असें बादशाहाजादी जुलाबक्स हीस कळतांच, सामोरी येऊन त्यास सन्मान पूर्वक मंचकावर बसवून, विनंती करिती झाली कीं, महाराज ही वेळ आपली दरबारची असतां,आपण उतावळीनें महालांत कां आलां ! आणि आपल्या मुखचंद्रावरून मी असें अनुमान करित्यें कीं, आपण कोणत्या तरी गोष्टीचा विचार करीत आहां. व तो इतका दुर्घट कोणता आहे. असा आज आपणांवर कोणता प्रसंग आला आहे. तो ह्या दासीस निवेदन करावा; म्हणजे माझेंहि मन आपला मुखचंद्र पाहतांच, जें घोंटाळलें आहे; तें स्थिर होईल. आणि ह्या दासीपासून काय होणें आहे. परंतु आपल्या दुःखाची किंवा सुखाची हिसेदारीण मीच आहें; तर कृपाक रून मला निवेदन करावें. असें स्त्रीचें बोलणें ऐकून चिंताग्रस्त तीस म्हणतो, प्रिये, काय सांगूं ! माझ्या मनांतील इच्छेस ईश्वरानुकूलता नसेल; तर माझा काय इलाज आहे. माझ्या मनांत होतें कीं पिरोजशाहाचें लग्न

करून त्यास गादीवर बसवावें; व आपण उभयतांनीं ईश्वर भजनांत आयुष्याचा काळक्रमून तो राज्य करील तें पाहून आनंद मानावा. पण काय करावें! पिरोजशाहा लग्नच करावयाचें नाहीं. असें स्पष्ट आपला मुख्य प्रधान जाफरखान याजवळ म्हणाला. नंतर मीही स्वतः त्याजवळ जाऊन राजकन्यांच्या तसबिरा ज्या काल रात्रीं तुला दाखविल्या होत्या त्यांतील एक तसबीर (जी सर्व तसबिरांमध्यें सर्वोत्कृष्ट राजा सुरत बिहार, याच्या कन्येची,) ती त्यास दाखवून माझ्या मनांतील उद्देश विदित केला कीं, तुझें लग्न करून राज्य स्वाधीन करितों; परंतु तो मला कांहींच उत्तर न देतां रडूं लागला. मी पराकाष्ठा केली पण अगदीं मौन धरून बसला; मजकडे पाहिलें सुद्धा नाहीं पहिल्यानें चांगला मला सामोरा येऊन जवळ बसोन, येण्याचें प्रयोजन विचारिलें, आणि मी ही गोष्ट काढतांच त्याणें मुख फिरवून खालीं मान घातली. त्याणे पुनः मजकडे वळून सुद्धा पाहिलें नाहीं. त्यानें इतकी नाखुषी दाखविली कीं, त्याची लग्न करण्याची इच्छा मुळींच नाहीं; असें स्पष्ट दिसून आलें. व त्यानें प्रधानजी जवळ झाच प्रमाणें मला जबाब हि पाठविला, तरी मी त्याजपाशीं जाऊन मला जितका प्रयत्न करणें होता तितका करून पाहिला; परंतु निष्फल झाला. त्यानें माझ्या भिडेस्तव उत्तर दिलें नाहीं, तत्रापि त्याजला लग्न करणें नाहीं असें निखालस समजलें. ईश्वरेच्छे पुढें कोणांचा इलाज नाहीं. वृद्धाप काळीं माझ्या पोटीं असा पुत्र असून,

त्याचें सुख मी पाहावें; असाईश्वरी संकेत नसल्यास काय होणार आहे.

बादशहा जादी जुलाबक्स इनें बादशाहाचें दुःखित भाषण ऐकून, विनंती केली. महाराज, दासीस अभय असेल तर, उपाय झाल्यास करून पाहीन तेव्हां बादशाहानें अभयवचन देतांच म्हणाली. आतां मी आपणास विनंती करितें, ही सुरत विहार राज कन्येची तसबीर, आपणास पसंतझालो परंतु माझ्या पिरोज शाहाच्या तळपायांची हि तुलना करूंशकणार नाहीं. तेव्हां अशा स्त्री बरोबर पिरोजशाह लग्न करण्यास सिद्ध होईल काय? याचा विचार आपण कांहींच केला नाहीं. स्वरूपाभिमान स्त्री प्रमाणें पुरुषाच्या ठायीं राहतो. आणि पिरोजशाहा केवळ सुरूप आहे इतकेंच नाहीं, सर्व गुण संपन्न आहे. त्याच्या पुढें ही तसबीर हिन्या पुढें गारगोटी म्हटलें तरी चालेल. मी खचित समजतें कीं, त्याच्या अनुरूप स्त्री मिळाल्यास; तो नकार करील असें नाहीं. मग आपणास कसें वाटत असेल तें असो. असें बादशाह जादीचें बोलणें ऐकून कांहीं वेळ स्तब्ध राहिला, आणि विचारकरून म्हणाला. प्रिये, तूं म्हणतेस हें सत्य आहे. पिरोजशाहाच्या स्वरूपाची तुलणा करण्यास, सृष्टींत कोणी स्त्री असेल असें मला वाटत नाहीं. कारण सर्व देशोदेशींच्या राजे रजवाड्यांच्या कन्यांच्या तसबिरा अजमासें दोनहजार आल्या आहेत. त्यांत एक पसंत निवडली पण तीहि त्याच्या योग्य नाहीं. काय क

रावें! तथापि त्याच्या अनुरूप स्त्री मिळण्यास मी पाहिजे तितका प्रयत्न करीन, परंतु तो लग्नच करावयाचें नाहीं म्हणतो यास कायकरावें याचा खुलासा झालापाहिजे. राणीनें विनंती केली कीं, महाराज, मला आज्ञा होईल तर मी पिरोजशाहाजवळ जाऊन त्याचा खरा उद्देश काय आहे हें काढून घेऊन सत्वर आपणास कळवितें. बादशाहा राणीस त्वरित जाण्याची परवानगी देऊन दरबारांत जाता झाला.

इकडे पिरोजशाहा, आपल्या महालांत चिंताक्रांत होत्साता, आपणाशींच म्हणतो. कीं, बादशाहास आपला खरा अभिप्राय समजाविला असतां, पुनः स्वतः मजजवळ येऊन त्या दुष्ट स्त्रियांच्या तसबिरा मजपुढें ठेविल्या; मला तर लग्न कर्तव्य नाहीं मग बादशाहा काय करतील तें करोत! असें बोलत आहे इतक्यांत भालदारानें मातोश्रीबाई भेटीस आल्या आहेत असें समजावितांच पिरोजशाहा पुढें जाऊन मातोश्रीस मुजरा करून जवळ बसला. आणि विचारूलागला. आई आज इतके श्रम घेऊन मुद्दाम मजकडेस येण्याचें कारण काय? तें या लेंकरास श्रुत व्हावें. मातोश्रीस पुत्रप्रेमा येऊन पिरोजशाहाच्या गळ्यास मिठी मारून त्यास मांडीवर बसविलें आणि मुखावरून हात फिरवून म्हणाली. पुत्रा पिरोजशाहा, तुझ्या अनुरूप तुला नवरी मिळेल; असा माझा पूर्ण आशीर्वाद आहे आणि बादशाहाहि याच योजनेंत आहेत. कारण आमचा वृद्धापकाळ झाला. आतां आमचे दिवस राज्य करण्याचे नाहींत. तूं राज्य क-

रावें आणि आम्हीं पाहावें. व आमच्या मागें अशीच कीर्ति तूं मिळवावी. तुझें लग्न होऊन नातू पाहावा एवढीच आमची इच्छा आहे. बादशाहा तर अगदींच दिवसानुदिवस अशक्त होत चालले आहेत. मोठ्या जुलमानें दरबारांत जातात, गेल्यावांचून अफाट राज्याचा बंदोबस्त राहणार नाहीं. बारावें वर्षापासून त्यांच्या शिरावर हें ओझें आहे, तें घेऊन त्यांस विश्रांती द्यावी हें तुला योग्य आहे. पिरोजशाहा म्हणाला मातोश्री तुम्ही जें काम मजवर सोंपवाल तें मी मनापासून करावें. आणि हा देह तुमच्याच कारणीं लागण्यास मी फार झटावें हें उचित आहे. परंतु लग्नाची गोष्ट मात्र मजजवळ काढूं नको. मला लग्न कर्तव्य नाहीं.हें मी मनापासून आई तुला सांगतों. इतका मात्र मजवर जुलूम करूं नका. याशिवाय तुम्ही जें सांगाल तें करण्यास सिद्ध आहें. पूर्वी प्रधानजी बादशाहाचा निरोप व तसबिरा घेऊन मजजवळ आले होते. तेव्हां त्यांसही हाच जबाब देऊन, बादशाहास विदित करण्यास सांगितलें. नंतर कांहीं वेळानें बादशाहा स्वतः आले. त्यावेळीं त्यांनींहि मला शिकस्त करून विचारिलें. मी कांहींच न बोलतां, माझ्या मनांत ही गोष्ट कर्तव्य नाहीं; अशी त्यांची खात्री केली व प्रधानजी बरोबर सांगितलेला जबाब कायम आहे असें त्यांस दर्शविलें. आणि आई तुलाही मी निखालस सांगतों कीं, आजपासून तूं ही गोष्ट मजजवळ काढूंनको.

पुत्राचें बोलणें ऐकून मातोश्रीस मोठा विस्मय

वाटला. आणि म्हणाली, बेटा, तुला लग्न न करण्याचें कारण काय आहे, हें जर मला सांगशील; तर मी तुला या गोष्टीविषयीं कधींच छळणार नाहीं. आणि तें योग्य कारण नसल्यास लग्न केलें पाहिजे. हें मातोश्रीचें वचन ऐकून, पिरोजशाहा आपल्या मनांत विच्यार करूं लागला कीं, जर आतां कांहीं जबाब न देतां उगाच राहिलों तरी वाईट, बरें माझ्या मनांत जीं योग्य कारणें ठसलीं आहेत; तीं उघड सांगावीं तरी वाईट. इतकें मनांत आणून आईस म्हणतो. मातोश्री आपण मला प्रश्न केलात तर मी आपणास विनय पूर्वक सांगतों त्याजवर लक्ष द्या. म्हणजे माझ्या प्रतिज्ञेविषयीं, आपली खात्री झाल्यावांचून राहणार नाहीं. पाहा स्त्रीपासून मोठमोठ्या अनर्थकारक गोष्टी घडतात, आणि तिच्या समागमें पुरुषांस त्या सोसवत नाहींत. ह्या विषयीं मी एक गोष्ट सांगतों ती कृपाकरून श्रवण करावी.

इतकी गोष्ट झाल्यावर भानुमती सुमतीस म्हणत्ये, सुमती, आतां रात्रही बरीच झाली आहे; पण उद्यां ही गोष्ट पूर्णपणें ऐकावी अशी माझी इच्छा आहे ? हें भानुमतीचें भाषण विदूरथानें ऐकून, सुमतीच्या हातापायांत बिड्या घालून; तीस एका खोलींत घालून बंद करून ठेविलें. आणि प्रधनास उदईक तिचा वध, भानुमतीच्या इच्छेस्तव तहकूब ठेविला आहे असें सांगून; संतप्त होत्साता वसुमतीच्या महालांत जाऊन शयन करिता झाला.

रात्र दुसरी

दुसरे दिवशीं रात्रीं, विदूरथ पुन्हा मधाना समवेत, भानुमतीच्या महालांत सुमतीच्या वधार्थ मोठा संतप्त होत्साता येऊन; सुमतीस खोलींतून बाहेर काढली. आणि तीच्याकडेस क्रोधयुक्त होऊन पहात आहे; तों सुमती प्रणाम करून म्हणाली. महाराज स्त्रीपुरुषांच्या स्नेहापरता दुसरा पदार्थ नाहीं. आणि एवढ्या करितांच केवळ हें कृत्य केलें असें आपणास समजूं नये. तेव्हां भानुमती म्हणाली पिरोजशाहानें त्याच्या आईस कोणती गोष्ट सांगितली ती सांग. तेव्हां सुमती म्हणाली, बाई मला महाराज सांगण्यास आज्ञा देतोल तर सांगेन. तेव्हां भानुमतीच्या ईछेस्तव विदूरथ राजानें तीस सांग असें म्हटलें आणि सुमती सांगती जाहली.

राणारणशिंग आणि कलावती

उत्तर खंडांत चतुरशिंग नामें राजा होता. त्याचा पुत्र रणशिंग महा पराक्रमी होता. कांहीं काळा-

नंतर असें झालें कीं; त्या राजावर परचक्र आलें. त्या-
वेळीं राजा चतुरशिंगानें, प्रधान, सेनापति व मोठमोठे
सरदार होते त्यांसहवर्तमान, परचक्रावर लढाईस जा-
ण्याचा मनसुबा करण्या करितां दरबार भरिलेंहोतें.त्यांत
चतुरशिंगाचा मुलगा रणशिंग हाहि बसला होता. त्या-
वेळीं त्याचें वय वीस वर्षांचें होतें.त्याजकडे पाहून राजा
चतुरशिंग म्हणाला (नांव सोनाबाई हातीं कथलाचा
वाळा) ह्या म्हणी प्रमाणें मोठें नांव असून कायफळ. असें
ऐकतांच ते शब्द शराप्रमाणें रणशिंगाच्या काळजास
रुतले. रणशिंग म्हणजे, रणाच्या ठायीं जसें शिंग ग-
र्जना करितें, तसें माझ्यानें करवतें किंवा नाहीं ? हें
पाहाण्यास, इतक्या कठोर शब्दानें पित्यानें ताडण के-
लें असें मनांत समजून तत्काल प्रधानजीस, हुकूम दि-
ला कीं, ह्यावेळीं युद्धास जाण्याची सिद्धता करावी;
ह्या प्रमाणें सेनापतीस सर्व सैन्य तयार करण्यास सांगू-
न आपण आपल्या महालांत गेला. रणांगणीं जा-
ण्याचा पोशाग, चिलखत, कटार, ढाल, तलवार, पं-
चहत्यार बंद होऊन पागेमध्यें स्वतः जाऊन, आपल्या
परीक्षेनें अश्व पाहिला. त्याजवर हिरे जडित सर-
जाम चढवून, दरवाज्या जवळ उभा करावा असें मो-
तद्दारास सांगून, आपण आईच्या महालांत गेला, आ-
णि मातोश्रीपाशी युद्धास जाण्यास आज्ञा मागूं लाग-
ला. त्या वेळीं मातोश्रीस महत् संकट वाटलें, आणि
म्हणाली पुत्रा आपल्या राज्यांत मोठमोठे सरदार, से-
नापति, प्रधान आणि मोठमोठे शूर व पराक्रमी असे
धुरंधर वीर असतां, ह्या प्रसंगीं तुला महाराजांनीं लढा-

ईस जाण्यास आज्ञा दिली हें पाहून मला फार दुःख वाटतें, परंतु काय करूं? माझा कांहीं इलाज नाहीं. पुत्रा, ईश्वर तुझा जय करील असें ह्मणोनें पुत्रास आलिंगन देऊन, व मुख चुंबन करून, त्याच्या मस्तकीं विजयी तुरा खोंविला. रणशिंग आईस नमस्कार करून निघाला. तों दरबारांत राजा चतुरशिंग बसला होता, त्याजवळ येऊन पित्यास नमस्कार करून जाण्याची परवानगी मागितली. राजा चतुरशिंगासही मोठा गहिंवर येऊन, पुत्रास पोटाशीं धरून म्हणाला वत्सा, भिऊंनको, तुझ्या बरोबर माझें सर्व सैन्य आहे आणि प्रधान, सेनापती व मोठमोठे शूर जे माझ्या अधिकाराखालीं मांडलिक राजे आहेत, त्यांसह तूं खुशाल जावें. तों; दिल्ली दरवाज्या पुढें फौजेची अगदीं गर्दी होऊन गेली. ती इतकी कीं, त्या दिल्ली दरवाज्यापासून शिवबंदीच्या दरवाज्यापर्यंत; एक मनुष्य फिरकण्यास रस्ता नाहीं. तोफखाना, घोडे स्वार, सांडणी स्वार, हे तर शिवबंदीच्या दरवाज्याबाहेर होते. इतक्यांत सेनापतीनें येऊन, रणशिंगास विनंती केली कीं, सर्व सिद्धता झाली. तसेंच प्रधानजीनेंही येऊन कळविलें. नंतर समागमें चतुरशिंगही दिल्ली दरवाज्या पर्यंत मुलास हातीं धरून घोड्याजवळ आले, तों रणशिंगानें पित्याच्या चरणावर मस्तक ठेवून अश्वारूढ झाला. त्यावेळीं नगरांतील लोकांनीं पुष्पवृष्टीचा तर रस्त्यावर बिछानाच केला. त्या गावांतील, मोठमोठ्या सावकार लोकांच्या स्त्रीयांनीं रणशिंगास आरत्या ओंवाळिल्या. व सोन्या रुप्या-

च्या फुलांची वृष्टि केली. तशींच नानातऱ्हेचीं वाद्यें वाजूं लागलीं. रणशिंग पित्याच्या इच्छेनुरूप लढाई स जाण्यास सिद्ध झाला, तेणें करून त्याची कीर्ति लोक वाखाणूं लागले. त्या दिवशीं दोन कोश मजल जाऊन तळ दिला. रात्रीस जेवण झाल्यावर प्रधान, मुत्सुदी, सेनापति सहवर्तमान बसले आहेत. तों प्रधानजीनें विनंती केली कीं, उदयिक्‌ लढाईचा प्रसंग आहे, याजकरितां आपली इच्छा कोणत्या रीतीनें बेतबात ठेवण्याची असेल त्याप्रमाणें आम्हांस सूचना करावी.

राजा रणशिंग म्हणाला, प्रधानजी तुम्हीं कोणत्याही लढाईच्या प्रसंगांत पूर्वी ज्याप्रमाणें बंदोबस्त ठेविला असाल त्याप्रमाणेंच ठेवावा; विशेष कांहीं नाहीं. असें ऐकतांच प्रधानास मोठें धैर्य येऊन त्यानें एक शकुनगांठच बांधिली. दोन तास विश्रांति घेतल्या नंतर सर्वांनीं स्नानें करून सूर्योदय होतांच भोजन करून दळभार सिद्ध झाला. तेथून चार कोसांच्या अंतरावर रणभूमिका होती, तेथें परचक्राचीही सिद्धता होऊन राहिली होती. तों इतक्यांत रणशिंगानें परचक्रासमोर आपला दळभार उभा केला. त्याचप्रमाणें तोफखाना दोहों बाजूंस सिद्ध ठेवून मध्यें आपण स्वतः राहिला; घोडे स्वार आपल्या पाठीमागें ठेविले. पायदळ तोफखान्याच्या पुढल्या बाजूस ठेविलें. त्याजवर मोठमोठे सरदार नेमिले. व आपल्या तयारीचें निशाण उभें केलें.

परचक्राकडूनही सिद्धतेचें निशाण दिसूं लागलें. इतक्यांत दोहों बाजूंकडून रणवाद्यें वाजूं लागलीं.

दोहों बाजूंस तोफखान्याची गर्दी होऊन गेली ती अशी कीं आसपास कोश अर्धकोश कांहींच दिसेनासें झालें. असें पाहून रणशिंगानें घोडेस्वारांस एकदम शत्रूवर तुटून पडावें असा हुकूम करून दोहों हातांत तलवारी चढवून आपण पुढें घोडा फेंकला, आणि शत्रूच्या सैन्यावर जाऊन मोठी कत्तल उडविली ती अशी कीं, त्या दळभारानें रणभूमिका सोडून पळ काढिला; तरी रणशिंगानें त्याची पाठ सोडिली नाहीं, त्या सैन्या बराबर आपल्या दळभारापासून पंचवीस कोश गेला. त्याजबरावर त्याच्या सैन्यापैकीं एकहि मनुष्य नव्हतें, परंतु त्यानें आपल्या शत्रूकडून चौथाई व सरदेशमुखी हे हक्क ताम्रपत्रावर करून घेऊन माघारा फिरला. मागें येतानां तो रस्ता चुकून घोर अरण्यांत शिरला. पुढें सूर्यास्त होतांच, त्यानें एका झाडाखालीं वस्ती केली, आणि प्रातःकाल होतांच अश्वारूढ होऊन चालला, परंतु त्यास मार्ग मिळेना ह्मणून कांहींसा घाबरला आणि तसाच अरण्यांत भटकत पुढें चालत आहे, तों चांगलें उजाडलें, तेव्हां त्यास कांहींशी हुशारी आली, व आतां कोणत्या शहरचा तरी मार्ग मिळेल असें त्यास वाटलें. आणि कांहींसा पुढें येतांच त्यानें एक अति रमणीय आराम पाहिला. त्यांत अनेक तऱ्हेचीं सुंदर फुलझाडें लावलीं आहेत, तशींच कारंजीं सभोवतीं असून मध्यभागीं सुंदर मंदिर आहे, असें पाहून त्यास मोठा हर्ष झाला आणि त्या बागांत कोणीतरी मनुष्य असावें असें त्यास वाटलें. तों आंत जाऊन सर्व मंदिर आणि

बाग पाहिला.त्यांत अनेक जातीचे पशुपक्षी तशाच तऱ्हे तऱ्हेच्या उत्तम वस्तु हांड्या, झुंबर, आरसे लावले आहेत आणि सर्व प्रकारची तेथें सिद्धता आहे, परंतु कोणीएक मनुष्य नाहीं. असें पाहून त्यास मोठा चमत्कार व भय वाटूं लागलें. ह्मणून तो खालीं उतरून, आपल्या घोड्याची लगाम हातांत धरून, त्या बागेच्या दरवाज्या जवळ येऊन बसायाची जागा होती तेथें बसला. इतक्यांत त्या बागेच्या समोर एक तलाव होता, त्या तलावावर कोणी एक स्त्री मेण्यांत बसून दासीसहवर्तमान स्नानास आली. ती मेण्यांतून उतरून दासीसह तलावांत उतरली. त्यावेळीं तिची आणि रणशिंगाची नजरानजर झाली. ती स्त्री रूपानें सुंदर व तारुण्याच्या भरांत असल्या कारणानें अति रमणीय दिसे. तीस पाहतांच रणशिंग अगदींच उतावळा झाला. आणि आपणाशींच म्हणतो, ही स्त्री कोणी राजकन्या असावी, ह्यांत संशय नाहीं. इला पाहून माझी चित्तवृत्ति अगदीं वेड्याप्रमाणें झाली आहे. जरकरितां इचें लग्न झालें असलें तर आपली मनकामना तृप्त होणें कठीण आहे. परंतु याचा शोधतर करावा. लग्न झालें नसेल तर आपलें काम सहज होईल. ती स्त्री स्नान करीत असतां, वारंवार याकडेस पाहत असे, आणि तुजवर मी फिदा आहे. असें खुणामुद्रांनीं त्यास सुचिवलें. नंतर स्नान आटपून उंचीं वस्त्रें परिधान करून मेण्यांतून मार्गस्थ झाली. त्यावेळीं रणशिंगही आपल्या घोड्यावर बसून तिच्या मागें चालला. तों पुढें मोठें शहर पाहिलें. तीं त्या

शहरच्या राजाची स्नुषा होती. तिचें नाव कलावती, तिचा मेणा महालांत पोहोचला तों रणशिंगहि तिच्या मागोमाग मंदिरांत शिरला. इतक्यांत तिनें मागें वळून ह्याला उभा पाहतांच, तिनें मोठ्यानें सर्वांस जाहीर केलें कीं माझा भाऊ आला आहे. असें समजतांच तिच्या नवऱ्यानें रणशिंगाची मोठी बरदास्त ठेवली व तिनें स्वतः जाऊन स्वयंपाक तयार केला. दासीकडून रणशिंगास मोठ्या इतमामानें स्नान घालून भोजनास पात्र वाढलें. रणशिंगानें तिचें बोलणें ऐकल्यापासून, त्याच्या मनांतील कुकल्पना अगदीं गेली. व तिनें भाऊ असें म्हटल्यावर तो तीस बहिणीप्रमाणें मानून भोजनास बसला. ती स्वतः वाढूंलागली. भोजनाच्या शेवटीं दहींभात घेऊन वाढायास आली आणि म्हणाली मर्जी कशी काय आहे, असा प्रश्न करतांच रणशिंगानें म्हटलें तुमच्या आमच्या नात्याप्रमाणें आहे. असें ऐकतांच मोठ्या क्रोधानें म्हणाली, जर मी तसें नबोलत्यें तर तुझे येथें तुकडे उडाले असते, आणि तूं माझी गोष्ट मानीत नसलास तर आतांच दाखवित्यें. हातच्या कांकणास आरसा नको. तेव्हां रणशिंग मोठ्या घोंटाळ्यांत पडला. परंतु ती गोष्ट घडणार नाहीं, असें ह्मणतांच तिनें आरोळी फोडली. ती ऐकतांच सर्व लोक धांवून येतात; असें पाहून रणशिंगानें घाबरून कबूल आहें असें ह्मटलें. इतक्यांत तिनें दहीं भात त्याच्या पात्राबाहेर लोटला आणि आपण त्याचें डोकें धरून उभी राहिली; तों हजारो मनुष्य वाड्यांतून धांवून आले. तिचा

भतारही आला आणि काय आहे म्हणून विचारिलें; तों तिनें म्हटलें काय सांगूं, दादास वांती झाली ! आतां पाहातां काय ! त्यास नेऊन माझ्या बिछान्यावर निजवा मी हीच आल्यें. असें म्हणून आपण स्वयंपाकांतून बाहेर निघाली. रणशिंगास, त्या सर्व लोकानीं नेऊन तिच्या महालांत निजविलें. तों कलावतीनें त्यास जरा झोप घेऊंद्या असें म्हणून, नवऱ्यासुद्धां सर्वांस तेथून काढून लाविलें. नंतर उभयतांनीं यथेच्छविहार करून, त्याच रात्रीं रणशिंगानें तिला घोड्यावर घालून आपल्या शहरास नेलें.

पिरोजशाहा अशी गोष्ट सांगून आईस म्हणतो. आई पाहा ही स्त्री किती कपटी आहे, कीं तिनें हजारो मनुष्यांस फसविलें; आणि रणशिंग जर तिच्या म्हटल्याप्रमाणें कबूल न करता, तर त्याचाही घात करण्यास ती मागें न पाहती. तर ह्या दुष्ट स्त्रियांचा सहवास मजला नको व मी लग्न कधीं करणार नाहीं. असें पिरोजशाहाचें भाषण ऐकून आई म्हणाली, बेटा सर्व स्त्रिया सारख्याच असतात काय ? पिरोजशाहा म्हणाला स्त्री तेथून एकच, असें म्हणतांच आईस मोठा क्रोध येऊन ती आपल्या महालांत उठोन गेली. पिरोजशाहानें पाहिलें कीं, आपण बोललों त्याचा आईस फारच राग आला असावा आणि आतां काहीं तरी विपरीत होईल. पिरोजशाहा सर्व कलेमध्यें निपुण होता आणि तीर मारण्यांत तर पहिल्या गतीचा होता. त्यानें हत्यारबंद होऊन पागे मधील सर्वोत्कृष्ट अश्व घेऊन; त्या-

वर बसून मार्गस्थ झाला. त्यानें ही बातमी कोणास कळूंदिली नाहीं. राणीनें आपल्या महालांत जाऊन; बादशाहास पाचारण केलें. आणि पिरोजशाहाचें बोलणें सर्व निवेदन केलें. तें ऐकून बादशाहास मोठा राग आला आणि तत्क्षणीं प्रधानास बोलावून पिरोजशाहाच्या पायांत बिड्या घालून त्यास किल्ल्यावर बंदींत ठेवण्याविषयीं हुकूम दिला.

प्रधानजीनें तत्क्षणीं पिरोजशाहाच्या महालास वेढा घातला. आणि वर जाऊन पाहातो तों पिरोजशाहा कोठें नाहीं! तेव्हां प्रधानास मोठें आश्चर्य वाटून तें वर्तमान बादशाहास कळविलें. तें ऐकतांच बादशाहा व बादशाहाजादी पिरोजशाहाच्या महालांत धांवत आलीं, आणि पाहतात तों खरेंच, पिरोजशाहा कोठें नाहीं! चोहोंकडे शहरांत, बागबगीचे लालबाग, मोतीबाग, ऐनेमहाल, रंगमहाल, अशा सर्व ठिकाणीं शोध केला, परंतु पिरोजशाहा कोठें नाहीं. मग बादशहास कांहीं सुचेनासें झालें. आणि तो मोठ्या शोकांत पडला. याप्रमाणें आठचार दिवस त्याचा आसपास शोध केला परंतु कांहींच पत्ता लागेना, तेव्हां तर बादशाहा व बादशाहाजादी याउभयतांस फारच वाईट वाटलें. तसेंच गांवांत लोक जिकडे तिकडे पिरोजशाहाच्या वियोगाचें दुःख करीत, सर्वांनीं आपआपलीं काम काजें बंद केलीं. असें पाहून प्रधानजीनें विचार केला कीं, आतां बरी गोष्ट नाहीं. बादशाहाचा वृद्धापकाळ आहे, अशांत त्यास पुत्रशोक होऊन

र मरण पावला तर पुढें या राज्याची मोठी दशा होणार. असें विचार पूर्वक मनांत आणून बादशाहास भेटावयाच्या निमित्तानें महालाच्या द्वारीं गेला आणि चोपदाराकडून बादशाहास कळविलें कीं प्रधान आपले दर्शनाकरितां द्वारीं उभेआहेत. असें ऐकून बादशाहाची आंत येण्याची परवानगी होतांच; मोठ्या अदबीनें मुजरा करून प्रधान म्हणाला, महाराज, आपण कांहीं काळजी करूंनये ईश्वरानें त्यास आयुष्यमात्र द्यावें म्हणजे वर्ष साहा महिन्यांत त्याचा शोध करून आणवितों, अशा म्हातारपणांत जर असा शोक कराल तर तुम्ही पिरोजशाहास पाहण्यास राहाल असें मला वाटत नाहीं आपण पिरोजशाहाची तिळमात्र काळजी न करितां धैर्य धरावें. असें प्रधानाचें बोलणें ऐकून बादशाहा म्हणतो, प्रधानजी तूम्ही सांगतां खरें, परंतु तो एकटा गेला असून त्याच्या खाण्यापिण्याची व्यवस्था नाहीं; याकाळजींत मी आहें. तर तुमच्यानें जितकी मेहनत करवेल तितकी करून त्यास घेऊन यावें. प्रधानजीनें विनंती केली महाराज, उदयिक दरबार भरण्यास हुकूम व्हावा. म्हणजे ह्या विषयीं काय तजवीज करणें ती सर्वांच्या संमतानें ठरवून करूं. हें ऐकून बादशाहानें दरबार भरण्यास हुकूम दिला. नंरत बादशाहास मुजरा करून प्रधान आपल्या महालास जाता झाला.

दुसऱ्या दिवशीं प्रातःकालीं दरबार झालें, त्यांत सर्व अष्टप्रधान, पंडित, मोठमोठे शेट सावकार, महाजन आणि इतर लोक, यांचो दरबारवाड्यांत

मोठी गर्दी होऊन गेली. सर्व मांडलिक राजे, ज्यांस पिरोजशाहा गेल्याचें वर्तमान समजलें; तेही त्या दिवशीं दरबारास आले होते. आणि सर्वांस हीच उत्कंठा होती कीं, पिरोजशाहास शोधून आणण्यास बादशाहा आम्हांस हुकूम देतील; तर बरें. असें दरबार भरलें आहे, तों बादशाहाची स्वारी भालदार पुढें ललकारताहेत अशा इतमामानें येऊन सिंव्हासनारूढ होतांच एकच जयजयकाराचा ध्वनी उठला. तेणेंकरून बादशाहासही मोठें धैर्य आलें. आणि मनांत म्हणतो, पिरोजशाहा येण्याचे कांहीं सुलक्षणिक शकुन मला आज भासत आहेत. असो, ज्याणें मला या वृद्धावस्थेंत असा सुपुत्र दिला, तोच त्याची भेट करिवणार समर्थ प्रभु आहे. असा कांहींवेळ बादशाहा विचारांत आहे असें पाहून, प्रधान जाफरखान विनंती करिता झाला. महाराज, मी आपणास विनंती करितों त्याजवर कृपाकरून पूर्ण लक्ष द्यावें. माझ्या मनांत काल रात्रीपासून जेजे विचार आले, त्यांतून पिरोजशाहाच्या शोधार्थ एक विचार मी दृढ केला आहे. तो हाच कीं, आपल्या पदरीं मोठे शूर व पराक्रमी, असे सरदार पुष्कळ आहेत. आणि हल्लीं ते दरबारांत सर्व हजर आहेत. ह्यांतून वीस असामींनीं, पिरोजशाहास शोधून आणावें, आणि त्यांस असा हुकूम द्यावा कीं, दोनहजार घोडे स्वारांनिशीं, या वीस असामींनीं जाऊन पिरोजशाहाचा शोध करावा; तो असाकीं प्रत्येकाच्या तैनातीस दोनदोनशें घोडेस्वार द्यावे; आणि

प्रत्येकानें निरनिराळ्या दिशेस जंगल, झाडी, पर्वत, गुहा यांत शोध करावा. जसें मातींतून मोतीं शोधून काढतात' त्याप्रमाणें शोधकरावा. जेथेंजेथें शहरें लागतील, तेथील राजांस पिरोजशाहाची हकिकत कळवावी; म्हणजे ते आम्हांस पत्र लिहून पिरोजशाहाच्या शोधाचा कच्चा मजकूर कळवितील अशी तजवीज ठेवावी. पिरोजशाहा हस्तगत होईपर्यंत, परत निखालस येऊंनये.

अशी प्रधानाची विनंती ऐकून, बादशाहास परमानंद झाला. आणि तत्क्षणीं प्रधानास त्याच्या विनंतीप्रमाणें करण्यास आज्ञा दिली. नंतर प्रधानानें त्या-पैकीं वीस सरदारांस सत्कारपूर्वक कळविलें कीं, तुम्हीसर्व सिद्धता करून राहुट्या, तंबू, आणि जो खजिना लागेल तो घेऊन आजच्याआज मार्गस्थ व्हावें; असा बादशाहाचा हुकूम आहे. हें ऐकतांच त्यासरदार लोकांनीं, बादशाहास मुजरा करून तत्क्षणीं मार्गस्थ झाले. आणि जेव्हां ते शहराबाहेर आले त्यावेळीं; त्यांनीं आपआपल्या दिशा वांटून घेतल्या. प्रत्येकाच्या तैनातीस दोनशें घोडेस्वार, राहुटी, तंबू, खिसमतगार, स्वयंपाकी, वेगवेगळे होते.

इकडे पिरोजशाहा, अश्वारूढ होऊन निघाला तों; त्यानें घोर अरण्याचा मार्ग धरिला. त्याचा घोडा, चालणारा मोठा चपल असल्या कारणानें; थोड्या दिवसांत पुष्कळ लांब निघून गेला. पुढें त्याघोड्यास चालण्याचें अवसान नाहींसें झालें असें पाहून, पिरोजशाहानें घोड्यावरचा सरंजाम काढून; त्यास मोक-

ळें सोडून दिलें. आणि त्यावरील सामान त्यानें एका-
झाडावर बांधून ठेविलें. पिरोजशाहा अगदीं भुकेनें
व्याकुळ झाला होता, त्यानें तत्क्षणीं तिरक्रमठ्यानें ह-
रिण मारिलें. आणि चकमक झाडून विस्तवांत त्याचें
मांस भाजून खाल्लें, व कांहीं उरलें तें बांधून बरोबर
घे तलें. घोडा त्या जंगलांत गवत वाढलें होतें, तें खा-
तहोता; परंतु त्या घोड्याची नजर, पिरोजशाहा का-
य करीत आहे; त्याकडेस होती. जसा तो मार्ग क्रमा-
वयास लागला तसा तो घोडाही त्याच्या मागोमाग
चालला. आणि कोठें गवत, कोठें हरळी पाहिली, म्ह-
णजे त्यानें पुढें जाऊन खात असावें. आणि पिरोज-
शाहा, त्याजवळ आला म्हणजे पुढें चालावें. धनी-
वरनसतांही त्याघोड्यानें त्याची सोबत राखली. अ-
सें पाहून पिरोशाहास मोठा हर्ष वाटला. त्यानें जेथें
पाणी असेल तेथें त्याघोड्यास नेऊन पाजावें. व आ-
पण प्यावें. भूक लागली म्हणजे शिकार करून, नि-
र्वाह करी. आणि कोठेंकोठें त्यास फळझाडें लागलीं
म्हणजे तींही भक्षण करी. याप्रमाणें पिरोजशाहा त्या
घोर अरण्यांतून चालला आहे, तथापि घोड्याची सो-
बत असल्याकारणानें त्यास अगदीं भय वाटत नसे.
रात्र झाली म्हणजे, पिरोजशाहानें झाडावर बसावें. आ-
णि त्याच झाडाखालीं त्या घोड्यानें असावें. असें
त्यानें साहा महिने त्या जंगलाचें मार्ग क्रमण केलें.
पुढें त्यास मोठें मैदान लागलें, तेथें झाडझुडूप कांहींच
नांहीं. जेथें पाहावें तेथें मैदानच मैदान, या शिवाय
कांहींच दृष्टीस पडेना. पिरोजशाहा उन्हाच्या त्रा-

सानें अगदीं थकून गेला. विश्रांति घेण्यास कोठें छाया मिळत नाहीं, असें पाहून मोठा संकटांत पडला; तों अस्तमान होण्याचा समय झाला. तेव्हां ऊनहि कमी झालें, आणि हवाही चांगली वाहूंलागली. तेव्हां त्यानें एका घोड्यावर बसून, कांहीं शिकार केलेलें मांस जवळ होतें तें खाल्लें, परंतु पाणी कोठें नाहीं आणि घोड्यासही कोठें गवत नांहीं. पिरोजशाहानें विचार केला कीं, आतां जर आपण ऐथेंच वस्ती केली;तर उद्यां ह्या मैदानांतून चालतांनां आपली मोठी दुर्दशा होईल. असा विचार करून त्यानें सर्व रात्र चालण्याचा निश्चय केला. घोडा ताहानेनें व भुकेनें अगदीं थकून गेला असें पाहून, त्यास फार वाईट वाटलें. आणि ह्या मुक्या प्राण्यास आपणाबरोबर दुःख सोसण्यास; ईश्वरानें कां बरें बुद्धी दिली? असें त्याच्या मनांत येऊन त्यास म्हणतो. जा, तूं अरण्यांत यथेच्छ खाणें खाऊन राहा. असें म्हणोन, चाबुकाचा एक फटका त्या घोड्यास मारिला; तो मारतांच घोडा पाठीमागें त्या जंगलाकडे धांवला हें पाहून पिरोजशाहास परमानंद झाला. व तो पुढें एकटा मार्ग क्रमीत चालला, आणि सर्व रात्र चालून आगदीं थकून गेला! पुढें मार्ग चालण्यास त्यास अवसान राहिलें नाहीं. पिरोजशाहा, मनांत मोठा पश्चात्ताप पावून म्हणतो. मी केवढा वेडेपणा केला कीं, ह्या संकटांत येऊन पडलों! आतां मी जिवंत घरीं जाईन असें वाटत नाहीं. घरीं जाणें तर कोठून, पण ह्या अरण्यांतून येखाद्या शहरांत जरी जाणें घडतें तरी बरें होतें. पिरोजशाहा मनाचा मो-

ठा गंभीर आणि धैर्यवान् असल्या कारणानें, त्यानें पु
नः अवसान धरिलें. इतक्यांत रात्र संपत आली, आ
णि थोडें उजाडल्या सारखें झालें. तेव्हां त्यास पुढें मो
ठा पर्वत नजरेस पडला. तो पाहतांच त्यास वाटलें
कीं, ह्या पर्वताच्या आसमंतात कांहीं वस्ती असावी.
असें समजून, त्यानें शेष राहिलेली शिकार खाऊन पा
णी पिण्याकरतां; मोठ्या त्वरेनें त्या पर्वताजवळ ये
ऊन दाखल झाला. तों पुढें त्यानें एक मोठें सरोवर,
संगमनेरी दगडानें बांधलेलें असून; रमणीय असें पा
हिलें. त्याच्या आसमंतात, केळी, नारळी, पेरू, अ
शीं फळझाडें होतीं. असें पाहून त्यास मोठा आनंद
झाला. आणि पाणी पिण्याच्या इछेनें, तो लागलाच
तलावांत उतरला. आणि पाहातो तों त्या तळ्यातलें
पाणी उष्ण, स्नान करण्या सारिखें होतें. त्यास फार
तृषा लागली होती म्हणून, एक ओंजळभर पाणी पिव
वेना तरी प्याला. नंतर कांहीं फळें खाल्लीं आणि पु
नः त्या तलावावर आला. तेव्हां त्यास असें वाटलें
कीं, आज आपल्यास उष्णोदक अनायासें सांपडलें;
त्या पेक्षां स्नान करावें. असाविचार करून, त्यानें आ
पला पोषाक काढून किनाऱ्यावर ठेविला. आणि त्या
तलावांत बुडी मारून वरआला, आणि पाहातो तों
पुरुषाची आकृति नाहींशी होऊन; आगदीं स्त्रीसारखी
स्त्रीझाली. असें पाहून मोठा विस्मय करूं लागला.
आणि आपला पोशाक पाहतो तों कोठें दिसतनाहीं.
तेणेंकरून त्यासफार दुःख होऊन, मनांत ह्मणतो, हे ई
श्वरा आतां चांगली तजवीज झाली. पुरुष होतों तो

स्त्रीझालों. बरें, वस्त्रतरीं आसावें, तेंहिनाहीं. आतां कायकरावें. मी म्हणतहोतों कीं, मला लग्न करणें नाहीं; तर ईश्वरानें मलाच स्त्री केली. आतां मला भ्रतार करणें प्राप्त झालेंना! परंतु जसा मी स्त्री करण्याचा नकार केला होता, तसाच भ्रतारहि करणार नाहीं. जें होणें असेल तें होईल. असें आपणाशींच म्हणत नग्न उभा आहे. (आतां पिरोजशाहाला स्त्रीत्व आहे हें वाचणारानें ध्यानांत ठेवावें.) इतक्यांत एक मोठा भयंकर राक्षस, हातांत पाण्याकरितां मोठा तांब्याचा रांजण घेऊन; येतांना तिनें पाहिला. त्यास पाहातांच, पिरोजशाहा अगदीं गर्भगलित झाला. आणि म्हणतो, आतां आपला मृत्यु समीप आला. कायकरूं! माझा पोषाक व हत्यारें जर असतीं, तर ह्या चांडाळास मी एका क्षणांत पालथा घातला असता; परंतु तें कांहीं नाहीं. आणि मीतर स्त्री रूपी नग्न उभा आहें, आतां काय घडेल तें कळत नाहीं. असें बोलत आहे. इतक्यांत राक्षस येऊन त्या स्त्रीचें फारच सुंदर रूप पाहून मोठा खुषी झाला. आणि तत्क्षणीं तीस उचलून; आपल्या खांद्यावर बसवून पुढें चालला तों तेथें दुसरें तळें होतें, त्या तळ्यावर आपला पोषाक, व हत्यारें सर्व ठेविलेल्या जागीं आहेत असें पाहून; पिरोजशाहा मनांत म्हणतो. मी ह्याच तळावांत स्नानास बुडी मारून, त्या तलावांतून निघालों; तों स्त्री झालों. तस्मात् त्या तलावांत बुडी मारून ह्या तलावांतून निघेन तर पूर्ववत् पुरुष होईन; ह्यांत संशय नाहीं. परंतु ह्या चांडाळा-

च्या हातून सुटेन तेव्हांना ! तों पुढें जातांना त्यानें तिसरा तलाव पाहिला. तेथें त्या राक्षसानें आपला रांजण भरून दुसऱ्या खांद्यावर घेतला, आणि तेथून माघारा फिरला, तों येतांना पिरोजशाहानें, बराबर तिन्ही तलाव येका हारीनेंच आहेत असें पाहिलें. त्या दोहों तलावाचें पाणी उष्ण होतें. आणि जेथें राक्षसानें पाणी भरलें त्या तलावाचें उदक थंड व अति सर्वोत्कृष्ट होतें. त्या पर्वतावर चढण्याची कोणाचीच प्राज्ञा नव्हती, असा उंच व विक्राळ होता. त्याच्या मध्यभागीं ह्या राक्षसाचा मोठा महाल होता. आणि तेथूनच पर्वताच्या पलीकडे जाण्याचा मार्ग होता. तेथें जाऊन राक्षसानें त्या स्त्रीस खालीं उतरून, पाण्याचा घडा खालीं ठेविला. आणि मोठी उंची शालू आणि स्त्रीचे सर्व अलंकार तिजपुढें आणून ठेविले. पिरोजशाहा अगदीं नग्न असल्या कारणानें, त्यास तो शालू नेसणें अगत्य पडलें. तसेंच त्यानें सर्व अलंकारही घातले. मग पिरोजशाहाचें स्वरूप काय वर्णावें ! तो राक्षस तर त्या स्त्रीस पाहतांच अगदीं मोहित होऊन गेला. तेव्हां पिरोजशाहा आपणाशीं म्हणतो ह्या चांडाळानें मजशीं दुष्ट वासना धरली आहे. परंतु मी ह्यास कधीं हात लाऊं देणार नाहीं. ईश्वरानें मला ह्याचा ग्रास नेमिलें असलें, तरी चिंता नाहीं. असें म्हणोन स्तब्ध उभा राहिला. असें पाहून राक्षस विनंती करितो. हे स्त्रिये, पाहा तुला मी हीं अलंकार वस्त्रें दिलीं, कारण कीं त्वां माझी स्त्री व्हावेंस असें म्हणतांच, पिरोजशाहानें डोळे लाल करून; त्याजकडे

पाहिलें. तेव्हां त्यास असें वाटलें कीं, ही आपणावर खुषी नाहीं; असें समजून त्यास फार राग आला. परंतु तिला खाऊन टाकावें असें त्याचें मनांत येईना. तो आपल्या मनांत म्हणूंलागला कीं, ही मानवी स्त्री आहे, आणि आपण निशाचर आहों, तर ही एकाएकीं आपणास वश होणार नाहीं. तस्मात् कांहीं दिवस इच्या मर्जी माफक चालावें, मग पुढें पाहतां येईल. असा विचार करून, त्या राक्षसानें तत्काल बिड्या आणून तिच्या हातांत व पायांत घातल्या. आणि तीस कैद केल्याप्रमाणें ठेविलें. त्यानें जेव्हां आपला भक्ष घेऊन घरीं यावें, तेव्हां तीस भोकळी करून खावयास द्यावें. आणि पूर्वीप्रमाणें विनंती करावी. तिनें नाखुषी दाखविली म्हणजे पुनः बिड्या घालून ठेवावें. अशा रीतीनें, पिरोजशाहा त्या राक्षसाच्या घरीं बंदींत राहिला. त्या राक्षसाने तीस कांहीं मांस व फळें नित्य खावयास द्यावीं. असे बहुत दिवस झाल्यामुळें, पिरोजशाहा अगदीं कंटाळून गेला. आणि मनांत म्हणाला कीं, असें जिवंत राहावें त्यापेक्षा मरण आलें बरें. तर ह्यास कांहीं युक्ति योजून काढली पाहिजे. असें म्हणून तो कांही विचारांत आहे. इतक्यांत राक्षसानें, तिजपुढें कांहीं भाजलेलें मांस व फळें आणून ठेविलीं. आणि म्हणाला, हे स्त्रिये, तुजकरितां मी इतके श्रम घेतों तत्रापि तूं मला कबूल करीत नाहींस ? असें म्हणतांच पिरोजशाहानें किंचित् हास्य वदन करून, त्याजकडे पाहिलें. पाहतांच त्या राक्षसास इतका आनंद

झाला कीं, तो तीस आलिंगन देण्यासच प्रवृत्त झाला. तेव्हां ती म्हणाली. अरे असुरा, मी मानवी असून, मला तुमचें निशाचरांचें खाणें मांस; हें नित्यशः आणून खावयास देतोस; तेणेंकरून मी फारदिवस जिवंत राहीन असें वाटत नाहीं. मला सुमारें एक वर्ष झालें. आजपर्यंत माझा भक्ष मला मिळत नाहीं. तेणेंकरून मीं भुकेनें पीडित आहें. आतां मला तांदूळ अथवा कणीक आणून देशील, तर माझे प्राण वांचतील. असें तिचें बोलणें ऐकून, राक्षसानें लागलेंच उड्डाण करून, दोन तासांत चार उंटें घेऊन आला. त्यांजवर सर्व सामग्री होती. तांदूळ, डाळ, कणीक, तूप इत्यादि, सर्व पदार्थ भरलेले होते. ते त्यानें तिच्या स्वाधीन केले, आणि म्हणाला. आतां तर तुला सुख वाटेल कीं नाहीं ? तेव्हां ती म्हणाली, सुख तर खरें, परंतु हें सिद्ध करण्यास मला मोकळी केलीस तर, मी स्वयंपाक करून भोजन करीन; नाहीं तर ह्याचा काय उपयोग! असें म्हणतांच त्या राक्षसानें, तिच्या हातपायांतल्या बिड्या काढिल्या. पिरोजशाहानें, त्या राक्षसाकरवीं दगड आणवून, चूल बनिवली. तेथें कांहीं रुप्याचींमात्र लहान लहान भांडीं होतीं, त्यांत त्यानें भात, डाळ, आणि कांहीं फळभाजीकरून भोजन केलें. ह्यामाणें पिरोजशाहाची अन्नपाण्याविषयीं तजवीज जाहली, परंतु तेथून त्यास आपली सुटकाकरून घेण्यास; कांहीं उपाय सुचेना.

पूर्वी एजीबशाहा म्हणून, पोर्तुगाल देशचा

बादशाहा होता. त्यास पुत्र नव्हता, परंतु वृद्धापकाळीं एक कन्या झाली. ती तेजाची कवळे मूसच आटून ओतली आहे. असा भास होत असे. तिच्या रूपाकडे पाहिलें तर, नेत्र अगदीं दिपून जावे ! अशी सौंदर्याची खाणच होती. तिचें नांव आईबापांनीं मोठ्या प्रीतीनें; गुलछबू असें ठेविलें होतें. दिवसानुदिवस वाढत चालली तेव्हां; तीस विद्या शिकविली. ती लिहिण्यावाचण्यांत चांगली हुशार झाली, आणि बहुतेक इतिहास वाचूं लागली. याकारणानें, ती मोठी चतुर झाली. कांहीं दिवसानीं ती आपल्या वयांत आली, तेव्हां तिच्या अनुरूप पति मिळावा म्हणून; बापानें पराकाष्ठेचा प्रयत्न केला. पुष्कळ राज पुत्रांच्या, तसबिरा आणविल्या; परंतु त्यांत जामात करण्यालायक, एकहि तसबिर नाहीं ! असें पाहून मोठा उदास झाला. आणि आपणाशींच म्हणाला,माझ्या पोटीं पुत्र नाहीं सर्व माझ्या राष्ट्राची मालकीण कायती ही कन्या आहे; आणि इच्या योग्य भ्रतारतर कोठें आढळतनाहीं. माझ्या मनांत होतें कीं,इचें लग्न करून हें राज्य जामात्यास द्यावें,म्हणजे मी सुखी झालों. तर यास काय उपाय करावा!तिच्यायोग्य पुरुष नसल्यास, ती स्वीकारणार नाहीं. आणि तिच्या मर्जीविरुद्ध करणें हें आपणास योग्य नाहीं. तर ह्याची तजवीज काय ती तिलाच विचारावी, आणि ती काय उत्तर देते तें पाहूं ! असें म्हणून, बादशाहा आपल्या महालांत गेला. तेथें बादशाहाजादी कौलदबू इला, बादशाहा आल्याची बातमी समजतांच; पुढें जाऊ-

न बादशाहाचा हात धरून खासनीं बसवून आपण-ही बसली. नंतर बादशाहा म्हणतो. प्राणप्रिये माझ्या मनांत जो विचार आहे, त्याची तजवीज कशी-करावी; आणि तो कोणत्या रीतीनें तडीस जाईल ह्या-चिंतेंत मी आहें. बादशाहाजादी कलिंदबू, म्हणाली, आपण ज्या विचारांत अगदीं निमग्नहोऊन गेलेतअ-हां, तो मला समजल्यावांचून चैनपडणार नाहीं; तर कृपाकरून सांगावें. असें राणीचें वाक्य ऐकून, एजीब शाहाम्हणाला. प्रिये, आपली कन्या गुलछबू आतां उपवर झाली, म्हणून तिचें लग्न करून हें रा-ज्य तिच्या नवऱ्यास द्यावें, अशी माझी इच्छा आहे परंतु कायकरूं तिच्या रूपाप्रमाणें नवराकोठेंच आ-ढळत नाहीं. ह्या विचारांत, मी मोठा घोंटाळून गे-लोंआहें. असें बादशाहाचें बोलणें ऐकून राणीम्ह-णाली, महाराज हें मोठें संकटआलें आहे खरें; आप-णास जसा कांहीं विचार सुचत नाहीं, तसाच मला-ही कांहीं सुचत नाहीं; तर ह्याचा विचार मुलीसच विचारावा असें मलावाटतें. बादशाम्हणाला, होय मलाही तीचयुक्ति सुचली आहे; तर येथेंच गुलछबूस बोलावून आणावें असा विचार करून, एक दासी गुल-छबूस बोलवावयास पाठविली. दासीनें गुलछबूच्या महालांत जाऊन गुलछबूस सांगितलें कीं आईसाहेबांनीं आतांच आपणास पाचारण केलें आहे. त्या वेळीं गुलछबू आपल्या महालांत, सर्व शृंगार करून आर-शांत आपलें स्वरूप पाहात, आपणाशींच म्हणत्ये.

मला भ्रतार मजपेक्षां स्वरूपवान मिळेल तरच तो मला प्रिय होईल. असें मनांत म्हणून तत्क्षणीं निघून आईच्य महालांत गेली. तों आपलीं उभयतां माता पितरें तेथे बसलीं आहेत असें पाहून, मनांत मोठी हर्षयुक्त हो ऊन; पित्याच्या मांडीवर जाऊन बसली. त्या वृद्ध मातापितरांस, गुलछबूला पाहून मोठा आनंद होतअसे आणि पोटीं पुत्र नसल्याचें दुःखही त्यांस कांहींच वाटतनसे. बादशाहानें गुलछबूस मांडीवर बसवून, तिला आपला उद्देश कळविण्यास राणीस खुणविलें. तेव्हां कलिंदबू कन्येस म्हणाली, बेटा आतां आमच्या मनांत तुझें लग्न करावें असें आहे आणि तुझ्या रूपास योग्य असा भ्रतार मिळावा, या विषयीं बादशाहानें जितकी मेहेनत घ्यावयाची तितकी घेतली. परंतु तुझ्या स्व रूपासयोग्य असा कोठें आढळत नाहीं, पुढें कायकरावें तें सुचतही नाहीं, तर तुझ्या मनांत कसें येतें हें मला सांग. असें आईचें बोलणें ऐकून, गुलछबू म्हणाली आई, मला लग्नच करावयाचें नाहीं. तुम्ही उभयतांनीं, उगीच ह्या गोष्टीची काळजी करूंनये. माझ्या भाग्यीं ईश्वरानें जर पुरुष नेमलाच असेल तर मला भ्रतार होईल, आपण ह्या गोष्टीची काळजी कशास करितां? बादशाहा मुलीचें वाक्य ऐकून म्हणाला. बेटा माझा वृद्धपकाळ आहे, या देहाचा कांहीं भरवसा नाहीं. म्हणून आपल्या डोळ्यां देखत तुझें लग्न करूंन, हें राज्य तुझे स्वाधीन केलें म्हणजे मी कृतकृत्य झालों, असें मला वाटतें. गुलछबू म्हणाली, ताता, तुम्ही म्हणतां तें सर्व नीट आहे, परंतु मी खचित सांगत्यें कीं मला लग्न-

च करावयाचें नाहीं. आणि ह्याविषयीं आपण कांहींच मनांत आणूंनका. असें मुलीचें वाक्य ऐकून बादशाहाजादी म्हणाली, मुली असें हट्टाचें बोलणें बोलूंनये. लग्न केल्या वांचून तुझें कसें होईल! ह्याचा विचार, अद्यापि लाहान आहेस म्हणून तुला कळतनाहीं; तरी आमचें सांगणें तुला शिरसावंद्य केलेंच पाहिजे. गुलछबू ह्मणाली, बरेंतर तुमच्या इच्छेविरुद्ध, मी चालणार नाहीं. असें म्हणून त्या वृद्ध मातापितरांस नमन करून, आपल्या महालांत जाण्याची परवानगी घेऊन जाती झाली. आणि आपणाशींच विचार करीत आहे कीं, माझे आईबाप माझ्या लग्ना विषयीं फार उत्सुक झाले आहेत आणि माझ्या योग्यतर भ्रतार नाहीं. आणि जर ईश्वरानें ह्या पृथ्वीतलांत उत्पन्न केला असेल तर मिळेलच, परंतु कोणत्या तरी राजपुत्रा बरोबर लग्न करण्या पेक्षां देहपात झाला तरी बरा. असा विचार करून, तिनें मरदानी पोषाक केला; आणि रात्रौ अश्व शाळेंत जाऊन, एक उत्तम जलद चालणार सुरेख असा घोडा आणून त्याजवर जवाहिराचा सरंजाम करून पंचहत्यार बंद होत्साती त्या घोडयावर बसून; प्रयाण करिती झाली. पाहांट होतांच तिच्या दासीनीं येऊन गुलछबू महालांत नाहीं असें तिच्या आईस कळविलें असतां मोठा हाहाकार झाला, आणि जिकडे तिकडे मनुष्यें गुलछबूस शोधावयास लागलीं; परंतु तिचा शोध कोणास लागेना! असें पाहून बादशाहा मोठा दुःखित तेऊन म्हणतो, काय म्यां दुष्टानें, तिजवर हा दुः-

खकारक प्रसंग आणिला ! तिच्या इच्छेप्रमाणें भ्रतार मिळेपर्यंत तुझें लग्न करीत नाहीं, असें जर तीस कळवितों, तर ती गेली नसती. असें मनांत येऊन, त्यास व बादशाहाजादीस जें दुःख झालें तें वर्णन करवत नाहीं. त्यांस अन्न गोड लागेना, गुलछबूस अन्न कोण देईल व ती काय करील, असा रात्रं दिवस त्या उभयतां मातापितरांनीं मोठा आक्राश मांडिला. त्या शहरांतील सर्व लोकही दुःख करूं लागले, बादशाहानें आपले मोठमोठे सरदार तिच्या शोधार्थ पाठविले. अशा रीतीनें तिचा शोध चालविला.

गुलछबू घोड्यावर बसून त्याराञ्री सुमारें शंभर कोस गेली, आणि प्रातःकाल होतांच तिला समजलें कीं मी मोठ्या अरण्यांतून चालत आहें. तों पुढें तिनें पाण्याचा ओहोळ पाहिला. त्या ओढ्याजवळ येऊन ती खालीं उतरली. आणि मुख मार्जनकरून, त्या घोड्यास यथेच्छ चरूं दिलें. आपणही त्या जंगलांत खावयास फळें पहातपहात फिरत आहे, तों तिनें हरिण पाहिलें. त्यास तीरानें मारून कांहीं खाल्लें व कांहीं राहिलेलें मांस बांधून ठेविलें आणि त्या घोड्यास पाणी पाजून वरबसून पुढें चालती झाली. ह्याप्रमाणें ती मार्ग क्रमीत असतां, सहा महिने तिनें नुस्तें मांस व कांहीं फळें खाऊन निर्वाह चालविला होता. एके दिवशीं मार्गानें चालत असतां, पुढें एक निबिड झाडी पाहिली. तेव्हां तिला असें वाटलें कीं, ह्या झाडींत कांहीं खेडे गांव असून मनुष्याची वस्ती असेल तर कोरें तरी अन्न मिळेल

शा आशेनें घोडा जलद चालवून त्या झाडीजवळ येऊन ती पोंचली; आणि आंत शिरण्याचा मार्ग पाहूं लागली. तों मार्ग कांहीं त्या बाजूस नव्हता, म्हणून प्रदक्षिणा करून, पुढल्या बाजूस येतांना; तीस अगदीं सायंकाळ झाला. सरासरी त्या झाडीचा घेर चार कोसांचा असावा, असें तिनें अनुमान केलें; परंतु कोणी मनुष्यांचा शब्द तीस ऐकूं आला नाहीं. उन्हानें फार त्रासून घोडाही थकून गेला, तों तिनें त्या झाडीच्या आंत जाण्याचा मार्ग पाहिला. आणि जवळ गेली तों मोठा तळाव दृष्टीस पडला. आणि त्याच्या सभोंवती दाट झाडी होती. त्या मोठ्या तलावाकडे पाहून किंचित् भयभीत झाली. व मनांत म्हणत्ये, आपण थोडें पाणी पिऊन ह्या झाडीच्या बाजूस वस्ती करावी. कारण आतां दिवस जाईल! नंतर घोड्यास एका झाडाशीं बांधून तळ्याच्या किनाऱ्यास गेली तों ती पाय निसरून एकदम आंत गेली.

त्या तलावांत एक भुजंग राहत होता, तो इतका मोठा होता कीं, त्यातलावास त्यानें आपल्या अंगाचा सुमारें चारकोस वेढा देऊंन आणि शिल्लक आंत राहत असे. तो रात्रीस मात्र वेढा काढून अरण्यांत जाऊन, आपल्या मस्तकांतला मणी काढून; त्याच्या प्रकाशानें बाराकोश चरावयास जात असे. जेव्हां गुलछबू त्या तलावाच्या कांठीं आली, तेव्हां तिचा पाय त्याच्या पाठीवर पडतांच; त्यानें उचलून आंतफेंकली. गुलछबू आंतपडतांच तळीं गेली, तों तिनें मोठा एकरत्नखचित महाल पाहिला; आणि

त्या महालाच्या दरवाज्यां जवळ, भुजंग महाराजांची स्वारी बसलीआहे; तो माहाल वगैरे पाहून पहिल्यानें तीस कांहींसा आनंद वाटला परंतु मग त्या कालरूपी भुजंगास पाहून तिच्यासर्वांगास कंप सुटला. आणि मनांत म्हणाली, आतां येथें मी वांचणें कठीण; हा एका फूत्कारानें माझें भस्मकरील. असें म्हणत तेथें उभी आहे, तों त्या भुजंगानें फडा उचलून, तीस बोलाविल्याप्रमाणें दर्शविलें. नंतर मोठ्या नम्रतेनें नमनकरून, ईश्वरावर भरंवसा ठेवून ती त्याजवळ जाऊन उभी राहिली. तेव्हां त्या भुजंगास परमानंद झाला. तो डोलूंलागला, आणि तिच्या अंगावरून आपली फडा फिरवूं लागला. त्यावेळीं तिच्या मनांत जी त्याजविषयीं धास्ती होती,ती उडूनगेली; परंतु त्या-तळ्यांतून बाहेर निघण्याची मात्र तिच्या अंतःकरणांत मोठी धास्तीहोती. नंतर भुजंगानें तीस हातींधरून महालांत नेलें आणि सर्व पदार्थ दाखविले. तेथेंकांहींच कमीनव्हतें तेथें मिष्टान्न होतें आणि त्या महालाच्या मागल्या बाजूस एकअतिरमणीय बाग होती. त्यांत अनेकप्रकारचीं फळें तिनें पाहिलीं,आणि हा भुजंग आपणास एथेंचराहण्यास सांगतो; असेंतीस त्याच्या खुशामती वरून दिसून आलें. तीस कांहीं सुचेनासें होऊन तिनें जमिनीवर अंग टाकिलें. त्यावेळीं तो भुजंग अगदीं घाबरल्यासारखा होऊन, मनांत विचार करीत तिच्याजवळ येऊन म्हणतो, ह्या स्त्रीस कायबरें झालेंअसावें; मला भ्यालीतर नाहींना ! भ्याली म्हणावें, तर पहिल्यानें ती निर्भयपणें माझ्या जवळ

आली. तर इला कांहीं शरीरविकार असेल, असें अनुमान करून तो तिच्याजवळ बसला. इतक्यांत गुलछबू मनांत डोळेझाकून म्हणते, हे ईश्वरा, आतां ह्या संकटांतून तुजवांचून कोण सोडवील. मी आईबापांच्या मर्जीप्रमाणें चालल्यें असत्ये तर ह्या दुःखसागरांत आज कां पडल्यें असत्ये. मला भ्रतार केव्हां मिळेल आणि तो एथें कशाला येईल, असें मनांत म्हणत असतां तिच्या नेत्रांवाटे अश्रुपात होऊंलागले. भुजंगानें तें पाहून तीस उठवून बसविलें आणि तिचें त्यानें पुष्कळ रीतीनें समाधान केल्यासारिखें दाखविलें. गुलछबू नेत्रउघडून त्याजकडे मोठ्या ममतेनें पाहूंलागली. त्याभुजंगासही फार गर्हिवर आल्यासारिखा तीस दिसला; इतक्यांत त्यास वाचाफुटली. आणि म्हणाला, मुली तूं भिऊंनको. तेव्हां ती त्यास म्हणाली, हे भुजंगराज आजपासून तूं माझाबाप आणि मी तुझी कन्या असें जन्मभर म्हणवीन; आणि तुझ्याजवळच राहीन. माझाबाप तर दूर राहिला, त्याचीमाझी भेट आतां कशानें होते. आणि माझ्या रूपाप्रमाणें भ्रतार मिळावा, असा त्याचा उद्देश आतां कसा सिद्धीस जातो, असें म्हणून मोठ्यानें रडूंलागली. तेव्हां तो भुजंग तीस आश्वासन देऊन म्हणाला. हे मुली तूं रडूंनको, तुला कांहीं भिण्याचें कारण नाहीं. तुझ्या स्वरूपाप्रमाणें भ्रतार मिळेल, व तुलाबापाच्या घरीं पोंहोंचवून देईन; तूं कांहीं काळजी करूंनको आजपासून तुला भ्रतार पाहण्यासाठीं, मीच विडाउचलतों आणि जोंपर्यंत त्याचा शोधलागे तोंपर्यंत तूं माझ्या घरीं

खुशाल राहावें. हे शब्द ऐकतांच तीस परमानंद झाला. आणि तत्काळ त्यास साष्टांगनमस्कार करून म्हणाली, बाबा मी तुमची कन्या आहें, मजवर जे तुमचे मोठे उपकार झाले ते बालबुद्धीनें किती वर्णनकरूं. आतां आपण जें मला अभयवचन दिलें आहे याची मात्र काळजी असूंद्यावी हेंच माझें मागणें आहे. असें तिचें भाषण श्रवण करून तो तीस आलिंगन देऊन ह्मणतो, मुली तूं कांहीं चिंता करूंनको तुझे सर्व मनोरथ पूर्ण होतील. आतां तूं स्वयंपाक करून मला वाढ आणि तूंही भोजनकर. असें त्याचें वाक्य ऐकतांच, पुनः त्यास नमस्कार करून; स्वयंपाक करावयास गेली.

गुलछबूस मोठा आनंद होऊन मनांत ह्मणत आहे, हे परमेश्वरा, मीतर मोठ्या संकटांत पडल्यें असें मला वाटत होतें परतुं मला आज ह्या भुजंगाचा मोठाच लाभ झाला. कारण माझ्या बापानें, पुष्कळ राजपुत्रांच्या तसबिरा आणविल्या; आणि माझ्या रूपाप्रमाणें भ्रतार मला मिळावा हा त्याचा उद्देश होता. परंतु कोठेंच जेव्हां आढळे- ना, तेव्हां त्याचा ना इलाज होऊन गेला. अशा संकट काळीं, हा भुजंग आपणच प्रकट होऊन; माझे मनोरथ पूर्ण करण्यास प्रवृत्त झाला आहे, तेव्हां त्वां हा धर्मपिताच दिला असें समजतें. आतां माझे मनोरथपूर्ण होण्यास कांहींच अडचण नाहीं. असें मनांत ह्मणून स्वयंपाक तयार करून, चंदनीपाट रांगोळ्या घालून; पात्र वाढलें आणि भुजंगाजवळ जाऊन विनंती केली, महाराज भोजनास चलावें. असें ऐकतां-

च तो चंदनीपाटावर बसून, भोजन करूंलागला. त्याचें भोजन झाल्या नंतर गुलछबूनें आपलें पात्र वाढून घेतलें; आणि भोजन करून बाहेर आली. भुजंगानें तीस सांगितलें कीं, बाई एथें कांहीं धास्ती नाहीं, मी रात्रीं फिरावयास जात असतों आणि दिवसास घरींच असतों. मी गेल्यावर त्वां आपलें काम काज आटपून, आयनेमहालांत जाऊन; स्वस्थ पहांट होई पर्यंत शयन करावें. माझ्या घरांत दीप लावावयास नकोत बाहेर अंधकार पडला म्हणजे; ह्या हिरेजडित भिंतीचाच उजेड पडेल. आतां मी जातों, तूं कांहीं मनांत भीति बाळगूं नको. ह्या तळ्यांत कोणी येण्यास समर्थ नाहीं. असें म्हणून, भुजंग आपल्या रोजच्या प्रमाणे; वनांत क्रीडा करण्यास जाता झाला. आणि गुलछबू आयनेमहालांत जाऊन, स्वस्थमानसें करून शयन करिती झाली. तेथें तिला सर्व, गोष्टी जरी अनुकूल होत्या, तथापि आराम वाटत नसे. तिणें स्वयंपाक करावा, भांडीं घांसावीं, वगैरे सर्व प्रपंच करणें हें तिला जन्मापासून ठाऊक नव्हतें; तें अशा संकटांत माहित झालें. (गहनाकर्मणोगतिः). कर्माची गती गहन आहे. कर्मापुढें कोणाचाच इलाज नाहीं. आणि ती आपल्या मनाचें, अशाच रीतीनें शांतवन करीत असे. त्या भुजंगास आपला पिता असें समजोन, ती सार्वकाळ त्याच्या गळ्यास मिठी मारून; त्याजवळ बोलत असे. आणि तो भुजंगही तिच्याशीं गोष्टी सांगत असे. तिनें आपल्या आईबापांची सर्व कांहीं हकीकत त्यास सांगितली, आणि

आपला त्यांजपासून वियोग कोणत्या कारणानें झाला हेंही विदित केलें. त्यावेळीं त्यास फार गहिवर येऊन म्हणाला, बेटा, तूं कांहीं काळजी करूं नको. तुझे आईबाप आजपासून एक वर्षाच्या आंत तुला भेटतील. तूं स्वस्थ चित्तें करून राहा. एक वर्षपर्यंत घरची आठवणसुद्धां काढूं नको. नाहीं पेक्षां फार काळजी लागून, अगदीं वाळून जाशील. बेटा, तुला माझ्या एथें कांहीं कमी असल्यास मला सांग; म्हणजे जो पदार्थ तुला पाहिजे तो मी आणून देईन. तूं घरची किंवा भर्त्याची काळजी करूंनको; भर्ताही तुला लौकरच प्राप्त होईल. असें त्याचें वाक्य ऐकतांच गुलछबूस अवर्णनीय आनंद झाला. आणि त्यास दोन्हीं हातांनीं आलिंगन देऊन म्हणाली, ताता, तुमचें वाक्य केवळ ब्रह्मवाक्यच आहे. असें मी खचित समजत्यें; आणि मला ईश्वरानें ऐथें आणिलें आणि आपली भेट झाली ह्याचविषयीं मी ईश्वराची फार उपकारी आहें. मी त्याची वारंवार प्रार्थना करून, आपणांस चिरकाल आयुष्य चिंतीत आहें. ताता मला आज्ञा होईल तर, कांहीं आपणास विचारावयाचें आहे. भुजंग म्हणाला, बेटा, जें तुझ्या मनांत विचारावयाचें असेल तें विचार. भिऊं नको, अजून तुला माझा विश्वास नाहीं काय ? ताता, असें नाहीं, मला तुमचा पूर्ण विश्वास आहे, परंतु संकोचामुळे बोलवेना. आज्ञा झाली आतां विचारतें. मी येथें पुरुषाच्या वेषानें आल्यें असतां, आपण मला स्त्री असें कशावरून जाणिलें ? तें सां-

गावें. हें ऐकून, तो कांहीं वेळ उगाच राहिला. आणि म्हणाला बेटा, तुला सांगतों श्रवण कर; परंतु ह्या प्रश्नाच्या उत्तरानें तूं दुःखित होशील त्यापेक्षां न सांगावें हें बरें, असें मला वाटतें. हें ऐकून गुलछबू कांहीं विचारांत पडली, आणि म्हणाली, ताता, मलातर दुःखाचें कारण कांहींच दिसत नाहीं, जें असेल तें स्पष्ट सांगावें. तेव्हां तो म्हणाला, मुली, तूं दुःख करणार नांहींस, असें पूर्ण वचन मला देशील; तर तुला माझी हकीकत सर्व निवेदन करीन. तेव्हां गुलछबू म्हणाली, ताता, तुमच्या शरीरास इजा होण्या सारिखें असेलतर मात्र मला कांही सांगूं नका. त्या खेरीज आणखी कांहीं असल्यास, मीं दुःख मानणार नाहीं. असें ऐकून भुजंग ह्मणाला, बेटा माझ्या जीवास धक्का बसणार नाहीं. आणि त्या गोष्टीनें तूंही दुःख करशील असें मला वाटत नाहीं. परंतु सर्व स्त्रियांचीं मनें सारखींच नसतांत; आणि त्यांस चांगली गोष्ट असली तरी, ती वाईट वाटते. आणि वाईट ती चांगली वाटते. म्हणून मी तुला असा प्रश्न केला. आतां नीट चित्त देऊन ऐक, मी तुला सर्व हकीकत सांगतों. ३.

मी इंद्रसभेचा गंधर्व आहे, आणि त्या सभेंत माझ्या सारिखा गायन विद्येमध्ये कोणीच हुशार नव्हता. इंद्राच्या वारांगना देखील माझ्या समोर गायन करण्यास लाजत असत, तेणें करून मला मोठा गर्व झाला. एके दिवशीं इंद्र, सभेंत असतां मी एका वारांगनेची गायनांत थट्टा केली. तेव्हां इंद्रानें

मला भुजंग हो असा शाप दिला. त्यावेळीं मी इंद्रा पाशीं क्षमा मागितली, तेव्हां त्यानें सांगितलें कीं, कोणी बादशाहाची कन्या तुझ्या घरीं एकवर्ष राहील; आणि तिला जो भ्रतार होईल तो तुझा वध करील. नंतर तूं आपला पूर्व देह धारण करून, आपल्या पूर्वीच्या पदास येशील. असा मला उच्छाप दिला तेव्हां मी भुजंग होऊन पडलों. त्यास आतां एक वर्ष राहिलें आहे. एक सहस्र वर्षें पर्यंत ह्या तलावांत मी राहिलों; आतां हें शेवटलें वर्ष आहे. आतां तुला जाणण्याचें कारण, आज सहस्र वर्षें होत आलो, परंतु ह्या अरण्यांत एक पक्षी किंवा जनावर नव्हतें. मला भक्ष शोधण्यास एथून बाराकोश जावें लागतें, अशा अरण्यांत तुज सारिखा रूपवान पुरुष ह्यातळ्यावर येऊन माझ्या अंगावर पाय देऊन पाणी पिईल काय ? मला पाय लावण्याची मनुष्याची काय शक्ति ! परंतु तुझा पाय लागतांच ही इंद्राज्ञेनें बादशाहाची कन्या असें समजलो. आतां ह्या देहापासून तुझा भर्ता मला मुक्त करील. त्याची वाट मी चकोराप्रमाणें पाहत आहें. ईश्वरी संकेताप्रमाणें होईलच होईल, तूं काळजी करूंनको. आणि ह्यावरूनच मीं तुला एक वर्षाची मुदत सांगितली आहे. असें त्याचें भाषण ऐकून गुलछबूस परमानंद होऊन; तिच्या नेत्रांतून आनंदाश्रु वाहूं लागले. आणि तिने त्यास मिठी मारून म्हटलें, ताता, मी तुमच्या अंगावर पाय दिला, तो जाणून दिला नाहीं. असें तुम्हीं खचित जाणा, आणि तुमचें अंग, ह्या तलावा सभोंवते

आहे; हेंहि मला ठाऊक नाहीं. माहित असतें तर, मी कधींच पाणी प्यावयाला पुढें सरल्यें नसत्यें. हें ऐकून भुजंग म्हणाला. बेटा, ह्या ईश्वरी संकेताच्या गोष्टी, कोणासहि कळावयाच्या नांहीं. आतां सर्व तुला मी सांगितलें म्हणून तूं समजलोस, आणि मीच तुला आंत ओढलें हें कोठें तुला ठाऊक आहे. ती म्हणाली नांहीं, मी पाय निसटून आंत पडल्यें असें अनुमान केलें; परंतु जेव्हां मी तुम्हांस या महालाच्या द्वारांत पाहिलें तेव्हां माझे पंचप्राण अगदीं व्याकुळ होऊन गेले. आतां सर्व नीट आहे. ताता, तुम्ही ही ह्या दुःखकारक देहांतून मुक्तव्हाल, हें ऐकून मला फार बरें वाटलें. आतां स्वयंपाक करण्याची वेळ झाली. मी जाऊन स्वयंपाकाची सिद्धता करितें; असें म्हणून त्याचो आज्ञा घेऊन निघून गेली.

इकडे पिरोजशाहा स्त्री होऊन, त्या राक्षसाच्या महालांत दुःख करीत आहे. आणि अगदीं त्रासून गेला. तेथून सुटका होण्यास इलाज कांहींच नाहीं, तेणेंकरून पिरोजशाहा दिवसानुदिवस निराश होऊन; त्याचें शरीर अगदीं शुष्क होतचाललें. एकेदिवशीं तो प्रचंड राक्षस तिच्या समोर येऊन, अगदीं कामातुर होऊन उभा राहिला. आणि ह्मणाला, हे प्रिये, आतां तूं मला भोग देत नाहींस तर तुला खाऊन टाकितों. आज एक वर्ष झालें, मी तुझ्या खुशीप्रमाणें वागलों तथापि अजून तूं मला वश होत नाहींस? तर तुला उगीच महालांत ठेवून काय उपयोग, आणि तु-

जकरितां खाणें शोधून आणून, तुझी इतकी ताबेदारी करण्यांत मला कोणता फायदा ! आतां तूं माझी इच्छा तृप्त न करशील, तर तुला पेटींत घालून ह्या पर्वताच्या शिखरावरून, कडेलोट करीन. असें त्याचें भाषण ऐकून पिरोजशाहानें रडण्यास आरंभ केला: इतकें ऐकून भानुमती म्हणाली, तुझी गोष्ट ऐकावी असें वाटतें पण आतां झोंपेची वेळ होऊन रात्र ही बरीच झाली म्हणून उद्यां ऐकूं. तेव्हां विदूरथ राजा, पूनः पूर्ववत् सुमतीस खोलींत अटकावून जाता झाला.

रात्र तिसरी

दुसऱ्या दिवशीं रात्रौ, विदूरथ प्रधाना समवेत येऊन खोली उघडून; सुमतीस म्हणतो. हे दुष्टे, तुला मी भानुमती प्रमाणें मानीत असतां त्वां अघटित कृत्य करावें काय ? असें ऐकून, सुमतीनें हात जोडून विनंती केली, कीं महाराज, मी जें कृत्य केलें, तें केवळ माझ्या हिताकरितां केलें असें आपण समजूं नये. भानुमती म्हणते, सुमती, मला पिरोजशाहाचें वर्तमान पुढें कसें झालें तें सांग. तेव्हां सुमती म्हणाली, महाराज आज्ञा करतील तर सांगतें तेव्हां विदूरथानें आज्ञा देतांच सुमती सांगूं लागली.

जेव्हां तो राक्षस, पिरोजशाहा स्त्री जाहालेली तिजवर आसक्त होऊन; भोग मागूं लागला. तेव्हां पिरोजशाहास शंभर वर्षे भरलीं असें पूर्ण समजलें. तो आईबापांची आठवण करून रडूंलागला; तथापि तो राक्षस तेथून जात नाहीं. असें पाहून ती राक्षसास म्हणाली, दुष्टा, मला जर दुर्वासनेनें हात लावशील, तर तूं तत्क्षणीं भस्म होशील. तुला माझा जीव घेणें असेल तर इच्छेस येईल त्याप्रमाणें कर, परंतु आजपासून असा प्रश्न करूं नको. हें तिचें बोलणें ऐकतांच, तिला एका पेटींत घालून तीं पेटी आपल्या डोकीवर घेऊन दुसऱ्या बाजूच्या मार्गानें; त्या पर्वताच्या अगदीं शिखरावर चढला. आणि ती पेटी खालीं उतरून तिचें झांकण उघडलें. तों पिरोजशाहा, जो डोळे गच्च मिटून तींत पडला होता; तो झाणें पेटी उघडतांच डोळे उघडून पाहूं लागला. तों, पिरोजशाहास आकाश केवळ हाताजवळ आहे असें वाटलें. तेव्हां, आपण पर्वताच्या शिखरावर आलों असें समजून ईश्वराची प्रार्थना करितो, ईश्वरा तुझ्यावांचून, मला दुसरा कोणी तारक नाहीं तस्मात् दीनाचें रक्षण कर. असें ह्मणोन, त्यानें तोंड खालीं करून, पेटीच्या दोंहों बाजूंस दोन कोइंडे होते त्यांस हात धरून; गुढघे टेंकून ईश्वरावर भरवसा ठेवून राहिला. त्या राक्षसानें पुनः तीस सांगितलें तूं कोणीकडे आहेस आतां तुझी काय व्यवस्था होणार, याजवर लक्ष दे. पिरोजशाहा आपल्या मनांत म्हणतो. काय करूं जर माझीं हात्यरें मजजवळ असतीं तर ह्या चांडाळाचा एका क्षणांत मा-

ण घेतला असता; परंतु तूर्त हाच माझा प्राण घेणार, असें मनांत म्हणून राक्षसास म्हणतो. हे दुष्टा, तुला काय करणें तें कर, असें पूर्वीच सांगितलें असतां तूं वारंवार असले दुष्ट शब्द कां बोलतोस? असें तिचें वाक्य ऐकतांच त्या राक्षसानें, ती पेटी पर्वताच्या शिखरावरून, लात मारून लोटून दिली. आणि आपण गेल्या मार्गानें परत फिरला.

एजीबशाहा बादशाहानें, गुलछबूच्या शोधार्थ सर्व गांवोगांवीं, आणि देशोदेशीं, मोठमोठाले सरदार, स्वार, पाठविले होते. त्यांत एक सरदार तीनशें स्वारांनिशीं, गुलछबूचा शोध करीत करीत, सरासरी सात महिने घोर जंगलें धुंडत होता. परंतु तिचा शोध लागेना! एकेदिवशीं त्यास पुढें मोठा पर्वत लागला, तो फारच उंच असल्यामुळें मोठा भयंकर दिसे. त्यास पाहून त्या सरदारानें, आपले स्वारांस वरचढवून एखादें शहर त्याच्या बाजूवर आहे किंवा काय असें पाहण्यास सांगितलें; परंतु त्याजवर चढण्याची मनुष्याची प्राज्ञा नव्हती. जरी त्या बाजूनें तो पर्वत जरा पसरट होता, तथापि अतिशय उंच असल्या कारणानें, प्रवेश होईना; तेव्हां फिरतां फिरतां त्यांस त्या पर्वताचा मध्यभागीं कडा तुटला आहे असें दिसलें, आणि तेथून मार्ग असेल असा विचार करून त्या खिंडींत शिरले. तों सरदारानें मोठा एक महाल पाहिला. तेव्हां त्यास मोठें भय वाटलें! तेथें कांहीं मनुष्यांची हाडें पडलीं होतीं तीं पाहून; त्यां सर्वांनीं अनुमान केलें कीं हा महाल राक्षसाचा असावा. आणि तो तसाच उंचहि अ-

सून मोठा विस्तीर्ण होता. परंतु दैवयोगानें राक्षस त्यावेळींच पिरोजशाहा स्त्रीस पेटींत घालून त्या पर्वतावर गेला होता, म्हणून त्यांस खिडकींतून दुसऱ्या बाजूस येण्यास मार्ग मिळाला.

इकडे तो राक्षस पेटी लोटून देऊन आपण परत फिरला. त्या पेटीचें झांकण खालीं होऊन तळ वरच्या बाजूस झाला, ते व्हां तो पर्वत उंच असल्या कारणानें, त्या पेटींत हवा भरून मोठी जड झाली; आणि ती पेटीहि फार मोठी होती,तेणेंकरून जशी एखादी जड वस्तू,कपीस लावून उतरावी; तशी ती पर्वता खालीं जे पूर्वी तीन तलाव सांगितले आहेत, त्यांतील. शेवटच्या तलावांत उत्तरतांच पिरोजशाहा तळीं गेला, तो मधल्या तळावांतून निघाला. आणि पाहतो तों आपण पूर्ववत् पुरुष झालों. त्यानें आपला पोषाक व हत्यारें त्याच तलावाच्या बाजूवर ठेविलीं होतीं, तींही तशींच तेथें होतीं. इतक्यांत तो इकडे तिकडे पाहून मनांत विचार करीतआहे तों गुलछबूचा सरदार, तीनशें स्वारांनिशीं त्या बाजूनें येत असतां; त्यानें पिरोजशाहा स्त्रीस पाहिलें. तेव्हां ती गुलछबूच असें सर्वांनीं अनुमान करून तिच्या जवळ जाऊन, तीस गुलछबू साहेब अशा संज्ञनें मोठ्या अदबीनें मुजरा करून;मेणा पुढेंकेला. आणि विनंती केली कीं, बाईसाहेब, आपण वृद्ध मातापितरांस सोडून, अशा घोरअरण्यांत कांबसलां ! आज सात महिने मी तीनशें स्वारांनिशीं, आपल्या शोधार्थ फिरत आहें; तर आज दैवयोगानें गांठ पडली. आतां उठा, अशी त्या सरदाराची विनंती ऐकून, पिरोजशाहा-

नें कल्पना केली कीं, कोणी गुलछबू नांवाची स्त्री माझ्याच स्वरूपा सारखी असेल, तर ह्या सरदारास आपण पिरोजशाहा असें समजूं देऊंनये आणि याजपाशीं तिच्या खुणा विचारून आपण तिचा शोध करूं. असें मनांत आणून तो त्या सरदारास आपली हकीकत सांगू लागला. कीं मी आज एक वर्ष एका राक्षसाच्या बंदींत पडलें होतें, आणि तो मला आपली स्त्री व्हावयास सांगतहोता; तें न ऐकिल्या मुळें आज त्यानें मला ह्या पर्वताच्या शिखरा वरून; पेटींत घालून लोटून दिलें. ईश्वरानें मला आज अशा अनर्थ कारक संकटांतून वांचविलें. हें एकतांच त्या सरदारानें तीस वस्त्रें देऊन मेण्यांत बसवून, गोष्टी करीत आल्यामार्गानेंच परत जात आहेत. तों तो राक्षस पेटीच्या शोधार्थ येतआहे असें पाहिलें. तेव्हां सर्वांच्या अंगास कंप सुटला. परंतु हिम्मत धरून, त्याजवर तीनशें स्वारांनीं गोळ्या घातल्या. त्या वेळीं तो राक्षस फार चवताळून, एकदम त्यांच्या अंगावर येऊन एक एक घोड्यासुद्धां स्वार उचलून खात चालला. पिरोजशाहानें आपला पोषाक व हत्यारें सर्व मेण्यांत बरोबर घेतलीं होतीं. त्या राक्षसानें शंभर स्वार खाऊन टांकिले असें पाहून, तो सरदार घाबरून गेला. तेव्हां पिरोजशाहा ज्यास गुलछबू असें नाव माम्झालें तो त्या सरदारापाशीं, तिच्या बाहण्यानेंच वागून ह्मणतो. हाच तो राक्षस, ह्याच्याच घरीं एक वर्ष मी होतें. आतां आपण कांहीं काळजी करूंनका. ह्याचा वधकरितें पाहा! असें म्हणून त्या पिरोज गुलछबूनें आपला

तिरकमटा काढून, त्यास एक अति तीक्ष्ण तीर योजून; त्याचा कंठ भेदला. तो तीर सुमारें एक वीतभर त्याच्या कंठांत शिरला. त्या राक्षसानें तो उपटून काढला, तों मोठें छिद्रपडून रक्ताचा प्रवाह चालला. त्या वेळीं तो त्यास बांधण्यास वस्त्र पाहत आहे, तों पिरोज गुलछबूनें दुसरा तीर त्याच्या नाभीपासून उभा मारला तेणेंकरून त्याचें पोट सुमारें चार हात फाटून शंभर घोडेस्वार खाल्ले होते, ते सर्व आंतड्या सुद्धां एकदम बाहेर पडले, तेव्हां त्या राक्षसानें तत्काळ भूमीवर देहें टांकून प्राणसोडला. असें पाहून ते दोनशें स्वार आणि सरदार, पिरोज गुलछबूची मोठी वाहवा करीत, त्या मार्गानें चालले. तों तो माहालही तिनें त्या सरदारास नेऊन दाखविला. आणि कांहीं अमूल्यरत्नें तेथें होतीं तीं बरोबर घेण्यास त्यास हुकूम केला, त्या प्रमाणें घेऊन मार्गस्थ झाले.

पिरोजशाहा विचार करूं लागला कीं, मी तर पुरूष आहें आणि ह्या लोकांस स्त्री असें खचित वाटून ते मला गुलछबू म्हणतात, ह्यास काय उपाय करावा! ह्यांच्या बरोबर नजावें तर, आपणास मोठा टपका येतो. तो असा कीं, त्यांचे शंभर स्वार मज करितां मरण पावले; असें असतां, त्यांस सोडून जावें, हें नीट नाहीं. तर ह्यांच्या बादशाहाजवळ जाऊन, सर्व हकीकत समजल्यावर, जर गुलछबू माझ्या रूपाप्रमाणेंच असली तर ते मला खचित समजतील; आणि कांहीं कमी जास्ती असल्यास तेंहि समजेल. नंतर आपण त्या बादशाहास आ-

पली हकीकत सांगून, तिच्या शोधार्थ त्याची परवानगी घेऊन निघूं. असा विचार करून त्यानें पुरुष आहे असें समजूं दिलें नाहीं. कांहीं दिवसांनीं ते आपल्या गांवीं येऊन दाखल झाले. तों सर्व शहरभर गुलछबू आली असा एकच बोलवा झाला. तों एजीबशाहा आपल्या महालांत चिंतेंत बसला असतां, त्यानें जेव्हां हें आनंद कारक वर्तमान ऐकिलें; तेव्हां तो घोड्यावर बसून पुढेंच निघाला, तों तो शहरांत येऊन पोंचली. त्यानें घरीं आल्यावर गुलछबू ज्या महालांत असे त्यामहालांत, त्या सरदारानें मेणा दाखल केला. इतक्यांत गुलछबूची आई आणि दुसऱ्या स्त्रियांचा समाज जमला. तों बादशाहाही तेथें आले आणि त्यामेण्याचा दरवाजा उघडून पहिल्यानें त्या म्हाताऱ्यानें मुलीस पोटाशीं धरून, अतिशय दुःख केलें. तेव्हां पिरोजशाहा म्हणतो गुलछबू माझ्या सारखीच आहे असें यावरून वाटतें. बरें पुढें कसें काय होतें तें पाहूं असें म्हणून एक शब्द न बोलतां गुलछबूच्या महालांत गेला. तेथें तिची वाट पाहात आई बसली आहे. ती कलिंदबू मुली कडे पाहून म्हणाली. बेटा, गुलछबू काय ही तुझी अवस्था झाली, आणि आम्हास सोडून तुला जावयलें तरी कसें ! असें म्हणत आहे तों पिरोजशाहा मनांत म्हणतो एकूण गुलछबू माझ्या लायक स्त्री आहे, पण कोणजाणे तिची काय अवस्था झाली असेल. असा तो विचारांत पडून त्याच्या नेत्रांतून अश्रू वाहूं लागले. तें गुलछबूच्या आईनें पाहिलें ते-

व्हां तीस पोटाशीं धरून म्हणाली, बेटा रडूं नको, तुला आम्ही रागें भरणार नाहीं आणि तुझी मर्जी वाटेल तेव्हां तुझें लग्न सांगशील त्यापुरुषाशीं करून देऊं. परंतु आतां मात्र आम्हांस टांकून जाऊंनको. हे शब्द ऐकतांच पिरोजशाहास अतिशय रडूं आलें आणि मनांत म्हणतो, एकूण गुलछबूची माझ्याच प्रमाणें गत झाली आहे, तीस अनुरूप भर्ता नमिळाल्या कारणानें ती निघून गेली; असें ह्या बोलण्यांवरून स्पष्ट दिसतें. आतां विलंब नकरतां तिच्या शोधार्थ गेलें पाहिजे, एथें अन्नहि घेणें जरूर नाहीं. असा विचार करीत आहे तों तो सरदार, बादशाहास सर्व हकीकत विदित करण्यास; येऊन दाखल झाला. आणि बादशाहास मोठ्या अदबीनें सलाम करून, अरण्यांतील सर्व वृत्तांत निवेदन केला.

हें ऐकतांच प्रथम उभयतांस दुःखहोऊन गुलछबूच्या शूरपणाविषयीं त्यांसमोठाच विस्मय वाटला. बादशाहाजादी मुलीस विच्यारिते, मुली तूं तर मोठी धीट झालीस. अशा घोर अरण्यांत आज आठमहिने कां वासकेलास ? तेव्हां तो सरदार म्हणाला. आईसाहेब, बाई म्हणतात कीं एकवर्ष तर त्या राक्षसाच्या घरीं होतें आणि तेथून येण्यास आम्हांस दोन महिने लागले. तर हें कसें ? बाईसाहेबांस जाऊन आज बराबर आठमहिने झाले, असें मला वाटतें. तेव्हां प्रधान म्हणाला, हो खरेंच बराबर आठमहिने झाले. तेव्हां पिरोजशाहा बादशाहास आणि बादशाहाजादीस प्रणाम करून म्हणाला. मला गुलछबू असें तु-

म्हीं पूर्णपणें ओळखिलें काय ? असें ऐकतांच, बादशाहा, बादशाहाजादी व इतर, म्हणजे मधान इत्यादि, जीं तेथें होतीं तीं सर्वजणें मोठा विस्मयकरूं लागलीं. तेव्हां बादशाहाजादी म्हणाली बेटा तूं माझी गुलछबूच आहेस, असें ऐकतांच पिरोजशाहा, सद्गदित होऊन म्हणाला, मामी मी तुमचा जामात आहें. कारण गुलछबू माझीस्त्री होण्यास योग्य आहे, असें म्हणून त्यानें आपली सविस्तर हकीकत कळविली; आणि गुलछबूच्या शोधार्थ जाण्यास त्यांजपाशीं आज्ञामागूं लागला. बादशाहास म्हणाला, मामा मला एथपर्यंत गुलछबूच्या वेषानें येण्याचें कारण हेंचकीं; माझ्या साह्या करितां तुमचे शंभरस्वार मरण पावले. तस्मात् ह्या लोकांस मी तेथेंच ओळखदेऊन जावें हें योग्यदिसलें नाहीं. आणि दुसरें कारण हेंकीं माझ्या रूपाप्रमाणें स्त्री मला मिळावी, असामाझा खरा उद्देश आहे; म्हणून तुमचेपाशीं सोयरीक करावी. अशादोन कारणास्तव, जशी वर्षपर्यंत खरोखर स्त्री होऊन त्या राक्षसाच्या एथें होतों; त्याप्रमाणें हे दोन महिने मीं तोच वेषधारण केला. आतां तुम्हासर्वांदेखत मी आपला पोषाग करितों. असें म्हणून त्यानें जो आपला पोषाक त्या तलावावरून बरोबर घेतला होता, तो केला. तेव्हां तो खचित पिरोजशाहा असें सर्वांस वाटलें. तों पर्यंत सर्वांस त्याच्या बोलण्याचा खरेपणा वाटतनव्हता. गुलछबूच असें बादशाहास आणि बादशाहाजादीस खचित वाटलें होतें. तो पिरोजशाहा अफँजुलखांन बादशाहाचा मुलगा, असें जे-

व्हां समजलें, तेव्हां त्यांस गुलछबू आल्याचा जो आनंद झाला होता तो मावळला. एजीबशाहानें पिरोजशाहाचा हात धरून बसविलें, आणि त्याच्यागळ्यांत हात घालून म्हणाला. महाराज, माझी गुलछबू जर अशा प्रसंगीं एथें असती तर ती खचित तुम्हाला भ्रतार करिती आणि आम्ही जन्मभर सुखी झालों असतों. गुलछबू आली असे पुनः; शब्द केव्हां कानीं पडतील ! जेव्हां हे शब्द ऐकिले, तेव्हां आम्हांस किती आनंद झाला; तो सांगवत नाहीं. तुमचें अलँकाफ शहर आम्हीं पूर्वी कधींच ऐकिलें नव्हतें, आणि तें कोठें आहे हेंहि ठाऊक नाहीं ! ठाऊक असतें तर तुमचा शोध केला असता; आणि तुमचें लग्न करून दिलेंअसतें, परंतु आमच्या नशिबीं असें सुखनाहीं; त्यास काय उपाय ! असें म्हणून एजीबशाहा फारदुःखी झाला.

पिरोजशाहा म्हणाला, मामा आतां तुम्ही सुखी व्हाल; कांहीं काळजी करूं नका. गुलछबू मजकरतांच स्त्री ईश्वरानें नमिली आहे तर, तिचा माझा संयोग होईल. तिच्या शोधार्थ जाण्यास आतां मला आज्ञा द्यावी. असें म्हणून पिरोजशाहा जाण्याच्या उद्देशानें, मोठ्या त्वरेनें उठला. तेव्हां, एजीबशाहा उठोन; त्यास पोटाशीं धरून म्हणाला. आतां आपण आल्यासारखे दोनदिवस, माझ्याघरीं रहावें; तेणेंकरून मला कांहींसें बरें वाटेल. असें म्हणून मोठ्या आग्रहानें पिरोजशाहास ठेवून घेतलें. तथापि पिरोजशाहानें, तेवढाच दिवस राहण्याचें कबूल केलें. एजीबशाहानें त्याचा मोठा सत्कार करून, मेजवांनी

केली. आणि नवा रत्नखचित पोषाक दिला. सर्वरात्र मोठ्या आनंदांत घालवून मातःकाळ होतांच पिरोजशाहानें स्नानादि नित्यकर्म करून नवा पोषाक केला. इतक्यांत एजीबशाहा गुलछबूच्या महालांत तो निजला होता, तेथें येऊन त्यास समागमें घेऊन दरबारांत गेला. तेदिवशीं दरबार गच्च भरलें होतें, आणि गुलछबू आली असें सर्वशहरांत समजलें होतें म्हणून मोठ्या शेटसावकारांची बादशाहास मोठ्या आनंदानें भेटावयास एकच गर्दी जमूनगेली होती. त्या दरबारांत पिरोजशाहास एजीबशाहानें, आपल्या जवळ सिंहासनावर बसविलें. त्या वेळीं त्या दरबारांत, त्याचा मोठा सत्कार होऊन; त्याच्या तेजाकडेस कोणाच्यानें पाहवेना आणि बादशहा एजीबशाहचे जामात म्हणून, पिरोजशाहास सर्वांनीं मुजरे केले. पंडित, शास्त्री, असे जे महान्महान् विद्वान् त्या दरबारांत होते, त्यांनीं आपल्या विद्येच्या कुशलत्वानें प्रश्न केले. त्यांस पिरोजशाहानें यथायोग्य उत्तरें दिलीं.नंतर त्या पंडित जनांची त्याच्या विद्वत्ते विषयीं खात्री होऊन गेली. आणि त्याची प्रशंसा सर्वविद्वानानीं केली. तशीच त्याच्या शौर्याची त्या सभेंत सरदार लोकांनीं, त्यांच्या नजरे पुढें झालेल्या शौर्य कर्माची मोठीच तारीफ केली. असें बादशाहा एजीबशाहानें, पाहून, पिरोजशाहास म्हणाला. कीं आपला पराक्रम आणि विद्वत्ता हीं पाहून मला मोठा हर्ष झाला. आतां हें सर्व राज्य मी आपल्या स्वाधीन करितों. आपण, स्वस्थ मानसें करून रा-

हावें. आणि मुरादशाहा जो सरदार आपल्या बरोबर होता, त्यास गुलछबूच्या शोधार्थ पाठवून; तिजला आणून तुमचें लग्न करून देतों. असें पिरोज़शाहा; बादशाहाचें वचन एकून; खुषीझाला. आणि ऐजीबशाहास हातीं धरून, ह्मणाला मामा आपण बोललां ठीक आहे; परंतु गुलछबूचा शोध माझ्या वांचून इतरांच्यानें होणार नाहीं. आतां मला आज्ञा द्यावी काल आपल्या ह्मणण्या प्रमाणें मला राहणें अगत्य पडलें. आतां आपण मला, एक दिवसही राहण्याचा आग्रह करूनये. कारण ती मोठ्या संकटांत पडली असेल. त्यांत तीस एकेक दिवस युगा प्रमाणें, भासत असेल. ह्मणून भोजन झालें ह्मणजे, आम्ही निघणार. असें पिरोजशाहाचें बोलणें ऐकून, बादशाहा कांहींवेळ उगाच राहून मुरादशाहा सरदारास दोनहजार घोडेस्वारानिशीं पिरोजशाहा बरोबर जाण्यास आज्ञा केली, तेव्हां पिरोजशाहाची, त्याच्या ममते विषयीं खात्री झाली. आणि ह्मणाला मामा मजबराबर कोणीं नको. मी एकटाच जाणार, ईश्वरावर भरंवसा ठेवून, माझें काम जितकें जलदी होईल; तितकें बराबर दुसरा असल्यानें होणार नाहीं. ह्मणून तुह्मी कांहीं दुसरा विचार, मला सांगूनका. आतां मला जाण्यास आज्ञा द्या. असा ह्याचा निग्रह पाहून, त्या सर्वांनीं त्यास मागान संभाळून जावें; अशा भाषणानीं भीति दर्शविली. आणि दरबार बरखास्त करून, भोजनास सर्व जाते झाले. पिरोजशाहा भोजन करून आपला पोषाक करून

ढाल, तलवार, तिरकंमटा, पंचहत्यार बंद होऊन महालांत आहे, तों एजीबशाहा येऊन दाखल झाला. पिरोजशाहा तयारींत आहे असें पाहून, त्याच्याने त्रांस अश्रु आले, आणि कंठ सद्गदित होऊन, त्यास आलिंगन देऊन म्हणाला. आतां मला केव्हां भेटाल; असें म्हणून फार दुःखित झाला; तों कालिंद बूहि तेथें आली. व त्यास आलिंगन देऊन म्हणाली, माझ्या सुखाचें मूळ तुम्हीच आहां. माझी कन्या तुम्हास पाहून फार आनंदित होईल. पण ती कोठें आहे। माझ्या भारब्धीं आणखी किती दिवस दुःख आहे हें समजत नाहीं. असें म्हणून तिनेंही फार विलाप केला. पिरोजशाहा त्या उभयतांचें समाधान करून, मी लवकर गुलछबूस घेऊन येतों, असें सागून निघाला; तों वाड्यांत सर्व लोकांची गर्दी होऊन गेली. दाहाहजार स्वारांनिशीं मोठमोठे सरदार तयार होऊन, उभे आहेत. तसेच प्रधान, सेनापति, पंडित, व मोठे शेट सावकार जे दरबारांत जमले होते; ते सर्व पिरोजशाहास पोंचविण्यास आले. चोपदारभालदार मिळून असा समाज जमला कीं, तो समाजच पाहण्यांस सर्व शहरच्या लोकांची भारीगर्दी झाली. बादशाहानें पिरोजशाहास दिलेला पोषाक करावा म्हणून आग्रह केला. परंतु जंगलांत, नव्या पोषाकाची कांहीं जरूरी नाहीं. असें निमित्त करून, तो घेतला नाहीं. त्याचा पोषाक जरी मळका होता तथापि सर्व रत्नखचीत असल्या कारणानें मोठा तेजस्वी दिसे. आधींच पिरोजशाहाचें तेज म्हणजे जसा भर दोनप्रहरचा सूर्य! आणि त्याचें

मराठी ग्रंथ संग्रह

तेज त्या हिऱ्यांवर पडलें, म्हणजे ते पूर्वापेक्षा दशपट तेजस्वी दिसत. अशा प्रकारें बादशाहा प्रधान, सर्व मंडळी समवेत चौकांत येऊन दाखल झाले, तों पुढें मोठा जलद, तेजस्वी घोडा सर्व रत्नखचित सरंजाम घालून, मध्यभागीं दरवाज्यांत उभा केला आहे. ए जीबशाहानें कांहीं वनस्पति त्याजपाशीं होती, ती पिरोजशाहास देऊन म्हणाला. जर करितां जंगलांत घोड्यास पाणी किंवा गवत मिळालें नाहीं तर, ह्या वनस्पतींतून जराशी त्यास खावयास द्यावी. म्हणजे पंधरा दिवस जरी कांहीं न मिळालें, तथापि त्यास भूकेतान्हे पासून; कांहीं इजा होणार नाहीं. ती वनस्पति घेऊन, एजीबशाहास वंदन करून; पिरोजशाहा घोड्यावर स्वार झाला. तमाम सर्व लोक आपापल्या वाहनावर बसून, बादशाहा प्रधानसमवेत; त्यास चार कोस पर्यंत पोहोंचवीत गेले. त्याणें त्यांस परत जाण्यास पुष्कळ वेळां सांगितलें. तरी ते चार कोसपर्यंत गेले. नंतर मोठ्या संकटानें, ते माघारे फिरले. बादशाहानें, त्यास पुत्र स्नेहा प्रमाणें आलिंगन देऊन संभाळून जावें म्हणून सांगितलें. आणि मागें पाहात असतां तो नजरेस पडे पर्यंत, बादशाहाची त्याजवरची दृष्टि इतर पदार्थांकडे गेली नाहीं. जेव्हां पिरोजशाहा दिसेनासा झाला, तेव्हां एजीबशाहा त्या सर्व लोकांस पाहून म्हणतो; अहाहा ! काय ईश्वरानें पुतळा उत्पन्न केलाआहे ! धन्य त्याचें आईबाप, त्यानें एक दिवस राहून मला फारच आनंद दिला. आणि आतां गेला, तेणें करून, मला फारच दुःख वाटतें. असें म्हणून

पुनः मागें पाहातो, परंतु तो बराच लांब गेल्या कारणानें दृष्टीस पडेना. नंतर ते सर्व लोक, बादशाहास शहरांत घेऊन आले.

बादशाहा महालांत जाऊन उदास वृत्तीनें बसला आहे, तों कलिंदबू बादशाहाजादी, तेथें आली. तीस पाहून बादशाहास मोठा गहिंवर येऊन, दुःख करूं लागला. आणि म्हणाला, असा जामात माझ्या नशिबी कोठचा ! कोण जाणे गुलछबूची काय अवस्था झाली आहे! असा त्या उभयतांनीं कांहींवेळ मोठ्या दुःखांत काढला. नंतर मधानानेयेऊन बादशाहास पिरोजशाहा विषयीं निर्भय असावें, अशा भरंवशाच्या गोष्टी सांगून; समाधान केलें. आणि पिरोजशाहाच्या शौर्यकर्मा विषयीं तर, त्यांची खात्रीच करून दिली. तो म्हणाला महाराज ज्या पुरुषानें, दोन तिरांनीं मोठ्या विशाल राक्षसास मारलें, त्यास काय भय असावयाचें आहे. तोच गुलछबूचा शोधकरील. इतरांची पुण्याई नाहीं. पिरोजशाहानें भाषण केलें तें सत्यआहे, तर आतां थोड्याच दिवसांत आपली कन्याघेऊन, पिरोजशाहा विजयी होऊन येतील. असें आपण निर्भयपणें समजावें. अशा तजविजीनें त्या मधानानें, बादशाहास हुशारी आणून आज्ञा घेतली.

इकडे पिरोजशाहा बादशाहास सोडून, निघाला तो सायंकाळपर्यंत बारा कोस गेला. पुढें रात्रझाली तेव्हां, त्यानें एकाझाडावर वस्ती केली. घोड्यास झाडास बांधून, त्यास, कांहीं दिवस आहे तोंच; गवत ज-

माकरून घातलें. सर्वरात्र झाडावर काढून, पहांट होतांच पुनःनिघाला. तो आंधारांत सडकचुकून जंगलाच्या मार्गानें, चालला. जेव्हां चांगलें उज्ञाडलें, तेव्हां त्यानें पाहिलें कीं आपण सडकसोडून मार्ग भलताच धरिला आहे. आतां कोठेंतरी जावयाचें, मार्गाचेंच कायकाम आहे. जो चालत आहों तोच आपला मार्ग; असें म्हणून पुढें चालताझाला. तों त्यास एक ओहोळ लागला. तेथें उतरून घोड्यास पाणीं पाजून हिरवें गार गवत उगवलें होतें, तेथें चरावयास लांब दोरी बांधून, त्यास चरूं दिलें. आणि आपल्यास खावयास गुलछबूच्या आईनें, आग्रहानें दोन लाडू शेल्याच्या पदरास बांधलेहोते, त्यांतून अर्धा लाडू खाऊन, पाणी पिऊन स्वस्थ दोनघटका झाडाच्या छायेंत बसला. दोनप्रहर टळतांच, घोडा आणून स्वारहोऊन निघाला; तों पुढें मोठें भयंकर अरण्य लागलें. तेथें त्यास हरण, ससे, सांबरें, अशांची पुष्कळ पारध सांपडली. त्यानें त्यांचें मांस भाजून, कांहीं खाऊन आणखीं बांधून घेतलें. ह्या प्रमाणें साहामहिने त्या जंगलांत चालत असतां,त्यानें एक बाग पाहिला. त्यास उत्तम प्रकारच्या संगमरनेरी पांढऱ्या गारांची सभोंवती भिंत घातलेली होती. तो बागपाहून,.पिरोजशाहास मोठें भयवाटलें. आणि आपणाशींच म्हणतो ह्या घोर जंगलांत अशा सुंदर दगडाची भिंत, आणि असा बाग आहे, तस्मात् ह्यांत कोणीतरी राहत असेल. असें त्याच्या मनांत येऊन, तो त्या बागेंत शिरला. आणि पाहतो तों नानातऱ्हेचीं फुलझाडें, आणि फलझाडें

लागलीं आहेत. मध्यें एक तलाव सुंदर लालगारीच्या दगडानें बांधलेला आहे. परंतु ती बाग जसें एखादें ओसाडघर दिसतें, तशी दिसूंलागली. त्यावरून त्यानें अजमास केला कीं एथें वस्तीनसावी. तळ्याचें पाणी शेवाळी सारखें झालेंहोतें. सर्व बगीच्यांत, झाडांचा सुकलेल्या पाल्याचा सर्व कचरा होऊन गेला होता. असें पाहातपाहात पुढें चालला आहे. तों त्यानें एक महाल त्या बागेंत आहे असें पाहिलें. तेव्हां त्यास वाटलें कीं,ह्या बंगल्यांत कोणीतरी मनुष्य असावें. तो महालही सर्व संगमरनेरी दगडानें मोठा सुंदर बांधलेला असून त्याजवर उत्तम चित्रें कोरलीं होतीं. असें त्यानें पाहून, घोड्यास एका झाडास बांधून;हातांत नग्न तलवार घेऊन त्या महालाच्या दरवाज्यापाशीं गेला. जातांच पुढें एक मोठा संगमरनेरी दगडाचा चवरंग असून त्याजवर एक वृध्द सांई बसलेला पाहिला. त्याच्या हातांत जप माळ होती, ती फिरवीत होता, त्यावरून पिरोजशाहानें जाणलें कीं, हा कोणी ईश्वरभक्त आहे. त्यानें एक तास उभें राहून त्याजकडे पाहिलें, परंतु तो डोळे उघडीत नाहीं; असें पाहून तो कांहींसा पुढें गेला. तथापि तो डोळे उघडीना ! पिरोजशाहा अगदीं त्याच्याजवळ जाऊन बसला. आणि पाहतो तों त्याच्या नेत्रांचा, एक केंस सुद्धां हालत नाहीं; मात्र त्याचीं बोटें हालत आहेत. आणि ती माळ फिरवीत आहे. पिरोजशाहा तेथून उठून, बाहेर आला. आणि विचार करून आपणाशीं म्हणतो, अशा सत्पुरूषाची भेट घेतल्यावांचून; येथून जाऊं नये. तर ये-

थेंच आज रहावें. असा निश्चय करून, त्यानें आपला घोडा चांगल्या जागीं बांधून; त्यास गवत घातलें. खोगीर त्या महालाच्या दरवाज्याजवळ; एका बाजूस ठेविला. आणि पुनः त्या सांईजवळ जाऊन बसला. जेव्हां रात्र झाली, तेव्हां तेथें एक मोठा दीप; पाषाणाचाच केलेला होता. तो आपोआप प्रकाशित झाला. असें पाहून पिरोजशाहास मोठें आश्चर्य वाटलें, आणि आपल्या मनांत मोठा हर्ष पावून म्हणतो; अशा सत्पुरूषाचा समागम मला मोठ्या भाग्यानें मिळाला. तर हा केव्हां नेत्र उघडील! असें म्हणून, तो त्याजपासून अगदीं हालेना; परंतु सर्व रात्र तशीच निघून गेली. जेव्हां प्रातःकाळ झाला, तेव्हां पिरोजशाहानें कांहीं झाडाच्या डाहाळ्या काढून; त्याची केरसुणी करून तो सर्व महाल झाडून, स्वच्छ केला. तसेंच त्या बागेंतही सर्व नीटनेटकें करून टांकिलें. आणि मुख मार्जन करून स्नान केलें. घोड्यास चारा घालून, पाणी पाजलें. आणि कांहीं फळें घेऊन,त्या सांईजवळ येऊन त्यापुढें त्यांतील कांहीं ठेवून, बाकी आपण खाल्लीं. अशा रीतीनें तो एक महिना पर्यंत, तेथेंच राहिला. एक महिन्यांत त्यानें तो बाग शिंपून, टवटवीत केला. आणि तळ्यांतील शेवाळ काढून, पाणी स्वच्छ केलें.

एके दिवशीं तो स्नान करून, नित्या प्रमाणें कांहीं फळें घेऊन त्या महालांत आला. तों साई नेत्र उघडून इतकें सुंदर मंदिर कोणीं केलें? असें मनांत म्हणत आहे, तों पिरोजशाहानें दरवाज्यांतून पाहिलें.

तसाच प्रणाम करून, त्याजवळ येऊनचरणावर मस्तक ठेविला. साईनें त्यास आशीर्वाद देऊन हातीं धरून, आपल्याजवळ बसविलें आणि अशा घोरजंगलांत त्यास येण्याचें कारण विचारिलें. तेव्हां पिरोजशाहानें, सर्व हकीकत त्यास निवेदन केली. पिरोजशाहाची हकीकत ऐकून, त्यास मोठा आनंद वाटला. आणि म्हणाला, बेटा आतां तूं आपल्या कार्यास जावें, मी साहा महिनें समाधिस्थ राहतों, आणि साहा महिने जागृत असतों. तुला एथें येऊन किती दिवस झाले ? पिरोजशाहा म्हणाला, साईं मला एक महिना झाला. आपण केव्हां जागृत व्हाल म्हणून, मी आपल्या जवळ, रात्रंदिवस बसलों होतों, परंतु आज माझें भाग्य उदयास आलें. साई म्हणाला, बेटा आतां तूं आपल्या कामास सुखरूप जावें. कारण एथें जंगलांत राहणें, हें आम्हासच योग्य आहे. तेव्हां पिरोजशाहा, विनंती करून म्हणाला, खुदावंत, माझ्या हातून कांहींतरी सेवा घडावी; असा माझा हेतू आहे. तर आपण मला एव्हांच रजा देऊंनये. साईनें त्यास जाण्या विषयीं, पुष्कळ वेळां सांगितलें, परंतु मोठ्या दुराग्रहानें तेथें आणखीं चार दिवस राहिला. आणि साईची सेवा करून, मोठ्या आनंदांत असावें, साई त्याचा हेतू पाहून प्रसन्न होऊन, त्यास एक खड्ग दिला. आणि तो जिवा पलीकडे बाळगावा,जर एखाद्या पर्वतावर टाकिला तरी त्याचें पिठ करून टाकील, व यापुढें इतर शस्त्रें तुच्छ आहेत, असें त्यास सांगितलें. पिरोजशाहानें तो खड्ग घेऊन, साईस नमस्कार केला. तेव्हां

मराठी ग्रंथ संग्रहालय

साईनें, (बेटा तेरा भला होवेगा) असा आशीर्वाद देऊन; त्याच्या मस्तकीं हात ठेविला. तेव्हां पिरोजशाहानें मोठ्या संकटानें, आपला घोडा सरंजाम घालून तयार केला. आणि सांईजवळ येऊन, त्याच्या वियोगाचें दुःख करूं लागला. साईं उठून त्यास हृदयीं धरून म्हणाला, बेटा तेरा काम होनेका वखत अबी आया है, इसवास्ते तेरेकूं मै रखणे सकता नहीं. अब तूं ज्याना, और, तूं जायेंगा तो शिदे हातसे जाना. असें सांगून पिरोजशाहास घोड्यावर बसवून, त्या बागेच्या बाहेरील दरवाज्या पर्यंत, त्यास घालवीत आला. पिरोजशाहा सांईस पुनः पुनः नमस्कार करून, त्यानें सांगितल्या प्रमाणें; उजव्या हातच्या मार्गानें चालला. पुढें जातां जातां,त्यास घोर जंगल लागलें.त्यांत कोठें पाणी नाहीं, व घोड्यास चाराही नाहीं, तेणेंकरून घोडा अगदीं थकून गेला. तेव्हां त्यास एजीबशाहानें दिलेल्या वनस्पतीची आठवण झाली, आणि त्यांतील कांहीं घोड्यास खावयास दिली. तेव्हां तो घोडा अगदीं नव्यादमाप्रमाणें चालूं लागला. असें पाहून पिरोजशाहास त्या वनस्पतीच्या गुणाचा मोठा चमत्कार वाटला. पुढें जातांजातां त्यास एका खडकांत पाणी सांपडलें, कांहीं फळेंहि मिळालीं. अशा रीतीनें तो मार्ग क्रमीत, ईश्वाराची प्रार्थना करीत चालला, तों तीन महिने पुर्ण झाले. तेव्हां त्यानें पुढें एक निबिड झाडी पाहिली. ती पाहून पिरोजशाहा म्हणतो, ह्या झाडीच्या आंत काय आसावें बरें. असें म्हणत ती झाडी फार दूरहोती तिकडे चालला.

इकडे गूलछबू, त्या तलावांत भूजंगाबरोबर गोष्टी करीत बसली असतां, तीस असें वाटलें कीं, आपण येथें येऊन आजबराबर एक वर्ष झालें, आणि भूजंग महाराजांनीं तर आपणांस एक वर्षाची मुदत सांगितली आहे; तर ती खरी असावी. असें जों मनांत म्हणत आहे, तों पिरोजशाहा त्या झाडीच्या नजीक येऊन दाखल झाला. त्यानें आंत शिरण्याचा मार्ग पाहिला, तेव्हां तो आपल्या घोड्यासुद्धां, त्यामार्गानें आंत शिरला. आणि पाहतो तों मोठा प्रचंड, तलाव आहे. पिरोजशाहा चकित होऊन घोड्यावर बसून चौफेर नजर करीत आहे, तों अकस्मात् त्याची नजर त्यातळावाच्या सभोंवती जी वरवड होती, त्यावर गेली. तीस निरेखून पाहिलें तेव्हां ती भूजंगाच्या अंगाप्रमाणें, दिसूं लागली. तेव्हां पिरोजशाहा, भय चकित होऊन; मनांत म्हणतो. ह्या तलावाचा घेर सुमारें चार कोशांहून जास्ती असेल; व सर्व तळ्याच्या सभोंवतीही वरवंड दिसती, तेव्हां ह्या भूजंगाच्या लांबीची तर गणतीच करवणार नाहीं. ह्याचें तोंड कोणत्या बाजूस असावें ! जर त्यानें एक श्वासाचा फूत्कार केला तर किती एक जीवांचा नाश होईल. असें म्हाणून तो घोड्यावरून खालीं उतरून, त्या वरवंडीच्या जवळ जाऊन; नीट न्याहाळून पाहिलें, तों तिची जाडी दाहा हत्तींच्या अंगा सारिखी असून, ती सर्व पाण्यांत असल्या कारणानें वरून सपाट दिसत असे, नंतर त्याणें विचार केला कीं, ह्या भूजंगापासून ह्या जंगलांतील प्राणि मात्रांस मोठा उपद्रव असावा

असें म्हणत असतां, त्यास त्या साईनें दिलेल्या खड्गाचें स्मरण होऊन मनांत म्हणतो आपणास साईनें खड्ग देतेवेळीं सांगितलें आहे कीं हा खड्ग पर्वतावर टाकिला तर पर्वताचेंही पीठ करील; तर ह्याचा चमत्कार पाहण्याची हीच संधी आलीआहे. भुजंगाच्या अंगास इतर शस्त्र किंवा तीर कांहीं उपयोगाचे नाहींत तस्मात् ह्या खड्गानें काय चमत्कार होतो तो पाहूं. असें म्हणून, त्यानें तो खड्ग, त्याच्या शरीरावर घातला. तों त्याचें अंग तत्काळ दुखंड झालें. त्या वेळीं भुजंगनाथ गुलछबू जवळ बोलत होता. तों अकस्मात् त्यास त्या खड्याचा वार लागतांच, त्यानें अर्धांग आंत ओढिलें. आणि गुलछबूस म्हणाला तुझा भ्रतार आला आहे. आतां मला जाण्यास त्वां आज्ञा द्यावी. हें ऐकतांच गुलछबूस मोठें संकट वाटलें, परंतु तो तसाच निघून त्या तळ्यावाच्या मध्यभागीं आपली फणा बाहेर काढताझाला. त्याचें अर्धांग आंतगेलें, आणि जें तूटून पडलें, तें त्या तळ्यांत अस्ताव्यस्त होऊन तरू लागलें. असें पिरोजशाहा पाहात आहे तों, त्या तलावाच्या मध्यमार्गी, भितीप्रमाणें अर्धकोश रूंद अशी त्याची फणापाहून; त्यावर खड्ग टाकावयास सिद्ध झाला. तेव्हां भुजंगास वाचा येऊन म्हणाला, पिरोजशाहा तूं मला मारण्यास सिद्ध आहेस, परंतु मी सांगतों तें ऐकून घे; नंतर मला तूं मारावें. असें ऐकतांच पिरोजशाहास मोठा विस्मय वाटला. आणि म्हणतो हा भुजंग असतां, ह्यास मनुष्यवाणी कशी प्राप्तझाली. तस्मात् हा कोणीशापरूपी भुजंग होऊन राहिला आहे.

असें म्हणत आहे तों, भुजंग म्हणाला, तुझी स्त्री गुलछबू माझ्याघरीं आहे. ती आज एक वर्ष तुझी मार्गप्रतीक्षा करीत आहे. तर तूं मला मारून, माझ्या मस्तकांतील दिव्यमणी आहे तो काढूनघे. आणि ह्या तलावास दाखीव. म्हणजे पाणी दुभंगून तुला आंत जाण्यास मार्गमिळेल. हेंच मला सांगावयाचें होतें. आतां विलंब करूंनको. सत्वर माझावध करून, गुलछबूस घेऊन जावें. असें ऐकतांच पिरोजशाहास मोठें दुःख वाटून त्या भुजंगास ह्मणतो. महाराज,मजपासून अपराध झाला तो क्षमा करावा. आपण स्वस्थ ह्या तलावांत क्रीडा करावी मी तुम्हास वार केला तेणेंकरून माझें अतःकरण फार दुखित झालें आहे, परंतु अपराध झाला तो समर्थांनीं क्षमाच केला पाहिजे. मला गुलछबूची कांहीं गरज नाहीं; आणि आपण मला दिली तर मी तीस स्वीकारीन. असें त्याचें भाषण ऐकून भुजंग म्हणाला, पिरोजशाहा, तूं अजून लहान आहेस, तुझी बुद्धि अजून पोक्त नाहीं. अरे, मला अर्धांच मारून टाकिलास तेणें करून, मी फार विव्हल झालों आहें; तर तूं आतां विलंब करूं नको. असें ऐकतांच पिरोजशाहानें तो खड्ग त्याच्या फणेवर झोकला, तेव्हां त्या फणेचे शतश तुकडे होऊन, त्यानें माण सोडला. पिरोजशाहानें असें पाहून आपला पोषाक काढून त्यांत उडी घातली आणि त्या छिन्न विछिन्न झालेल्या फणे जवळ जाऊन आपलें खड्ग घेतलें. त्या भुजंगानें सांगितल्या प्रमाणें, त्याच्या मस्तकांतील दिव्यमणी काढून घेऊन; पुनः तडीस आला. आणि पोषाक करून, तो

दिव्यमणी त्या तळावास दाखवितांच; तेणेंकरून पाणी दुभाग झालें. असें पाहून पिरोजशाहा आपला घोडा घेऊन आंत शिरला. तेव्हां त्यानें आंतून एक दिव्यविमान येत आहे, आणि त्यांत दिव्यपुरुष बसला आहे असें पाहिलें. तों पुढें जातांच गुलछबूहि तेथें आली, तीस पाहतांच पिरोजशाहास आनंद झाला तो सांगवत नाहीं. गुलछबूनें जेव्हां पिरोजशाहास पाहिलें तेव्हां तिचीहि अवस्था त्याचप्रमाणें झाली. असें त्या विमानारूढ पुरूषानें, दोघांस पाहून परमानंद युक्त होत्सातां पिरोजशाहास म्हणाला, ही गुलछबू माझ्याजवळ एक वर्ष आहे ही माझी कन्या आहे, ही मी तुला देतों. जो भुजंग तूं आतां मारिला तोच मी आहें असें म्हणून त्यानें गुलछबूचा आणि पिरोजशाहाचा हात धरून; गंधर्व विधीनें लग्न लावून आपण स्वर्ग लोकीं जाता झाला.

गुलछबू पिरोजशाहास घेऊन त्या महालांत आली, आणि तिनेंस्वयंपाक करून त्यास, मांगल्य स्नानघालून भोजनास वाढलें. पिरोजशाहाचें भोजन झाल्यानंतर तिनें भोजन केलें. उभयतां आनंदानें महालांत बोलत आहेत, गुलछबूनें आपली सर्वहकीकत पिरोजशाहास सांगितली. पिरोजशाहानेंही गुलछबूस सांगितली आणि तिच्या आईबापांचा समाचार तीस सांगितला. तें ऐकून गुलछबूस परमानंद झाला. पिरोजशाहास महत्संकटें पडलीं त्याचें मात्र तिला दुःख वाटलें. आणि त्याच्या गळ्यास मि-

ठीधालून म्हणाली, मजकरितां, तुम्हांस बहुत दुःखें सोसावीं लागलीं. पिरोजशाहा म्हणाला, जसा ईश्वरी संकेत असतो तसें घडतें. ह्यांत कोणी कोणास दुःख दिलें, असें जें म्हणतात तें मिथ्या आहे. जो ईश्वर सर्वसाक्षी, ह्या जगताचा उत्पत्ति कर्ताआहे, त्याच्या संकेतावांचून बरें वाईट कांहींच होत नाहीं. असें म्हणून गुलछबूस जवळ घेऊन, तिचें शांतवन केलें. त्याच्या मनांत एक मोठी दहशत उत्पन्नझाली, ती अशीकीं, आतां गुलछबूस घेऊन जाणेंआहे, आणि घोडा तर एकचआहे; त्यास काय उपाय करावा. ह्या विचारांत तो अगदीं गढून गेला. त्यास जाण्याची फार त्वरा होती, कारण त्यास सांई जवळून निघून तीनमहिने झाले. आणि आतां त्याजवळ जाण्यास कदाचित् जास्त महिने लागतील, आणि असें जाहल्यास सांईचे दर्शन होणार नाहीं; म्हणून त्यास जाण्याची त्वराहोती. परंतु त्यास कांहीं सुचेना, तेव्हां तो गुलछबूस म्हणाला, प्रिये, आतां तुझ्यागांवीं चलावें, कारण तुझ्या आईबापांनीं लवकर यावें असें फारवेळां, मोठ्या कळवळ्यानें सांगितलें आहे. आणि एथें ही आपलें कांहीं राहण्याचें प्रयोजन नाहीं, तस्मात् लवकर जावें हें मला बरें वाटतें. परंतु दोघांमिळून. एक घोडा आहे, ह्यास काय युक्ति करावी. एका घोड्यावर इतका लांब दोघांचा निर्वाह कसा होईल? असें ऐकून गुलछबू म्हणाली, ही मोठीच अडचण पडली आहे, तर कांहींवेळ तुम्हीबसा आणि कांहीं वेळ मी बसेंन; असें करून गेलें पाहिजे. असें तिचें भाषण

श्रवण करून, पिरोजशाहास परमानंद झाला, आणि तत्क्षणीं घोडा तयार केला. गुलछबू सहवर्तमान तो दिव्यमणी त्या तळावास दाखवितांच, पाणी दुभंगून बाहेर निघाला, आणि आल्यामार्गानें चालला.

पुढें जातांजातां त्यानें, एकविस्तीर्ण वटवृक्ष पाहिला. त्याच्या खालीं गर्दछाया पाहून, कांहीं वेळ विश्रांति घ्यावयास तेथें बसला. आणि गुलछबूस घोड्यावरून उतरून, घोड्याचें खोगीर काढून ठेविलें. तेथें जवळ पाणी होतें, तें आणून प्राशन केलें. कांहीं फळें आणून खाल्लीं. कांहीं वेळानें ऊन कमी झाल्यावर, घोड्यावर खोगीर चढवून गुलछबूस वर बसविलें. तेव्हां तीस फार दुःख वाटून म्हणाली, प्राणनाथ तुम्ही कितीदिवस असे पायांनीं चालाल बरें ! तर आपणही ह्या घोड्यावर बसावें. माझ्या बापाजवळ कांहीं वनस्पति आहे, ती जर असती तर बरें होतें. तेव्हां त्यास त्या वनस्पतीची आठवण झाली आणि म्हणाला, मला तुझ्याबापानें ती दिलेली आहे; परंतु तिचा काय उपयोग ! ती घोड्यास खावयास दिली म्हणजे, त्यास भूक ताहाने पासून मात्रइजा होणारनाहीं, असें एजीबशाहानें मला सांगितलें आहे. तें ऐकून गुलछबू म्हणाली कि, ती वनस्पति तुम्ही ह्या घोड्यास चारा, आणि तुम्हीहि वर बसा, मग तिचा चमत्कार काय आहे तो तुमच्या दृष्टीस पडेल. असें ऐकून पिरोजशाहानें, ती वनस्पति त्या घोड्यास चारली आणि गुलछबूस पुढें घेऊन आपणहि वर बसला. गुलछबूनें घोडाभरधांव काढिला तो सुमारें अस्तमान होईपर्यंत

त्या वनस्पतीच्या योगानें, घोड्यास कांहीं, श्रम न होतां वीसकोस जमीन चालून गेला. तेथें एक नदीचा ओहोळ होता, रात्रीचा समयजवळ आला असें पाहून त्यानीं तेथें त्या घोड्यास गवत घालून, सरंजाम काढून झाडाखालीं वस्ती केली. प्रातःकाळ होतांच त्यानें मुखमार्जन करून कांहीं शिकार मिळेल अशा हेतूनें, पिरोजशाहा चोहोंकडे पाहत आहे. तों एक हरिण त्याच्या दृष्टीस पडला. त्याची शिकार करून भाजून गुलछबू व आपण खाऊन पाणीप्याला. कांहीं राहिलेली शिकार बांधून घेतली. घोड्यास पाणीपाजून ती वनस्पती थोडी त्यास खावयास देऊन दोघेंहि स्वारझालीं. आणि सायंकाळ पर्यंत, पन्नास कोश जमीन निघून गेलीं. अशाप्रकारें त्या सांईजवळ दोन महिन्यांत येऊन दाखल झालीं. सांई पिरोजशाहास आणि संगातीं गुलछबूस पाहून परमानंद पावला. आणि त्या उभयतांस आलिंगन देऊन महालांत घेऊन गेला. पिरोजशाहानें तो बाग पाहिला तों, पुर्वापेक्षां मोठा सुरक्षित दिसूंलागला. आणि तन्हतन्हेचीं सुवासिक पुष्पेंफुललीं आहेत, तेणें करून आसमंतात सुगंध सुटला आहे. महालांतहि त्याप्रमाणें, गालिच्ये टाकले आहेत, आरसे, हांड्या, झुंबर, लागलेआहेत. तेणेंकरून त्या महालास अतिशयित शोभा आलीआहे. असें पाहून पिरोजशाहा सांईस विच्यारूं लागला. महाराज, मी पहिल्यानें येथें आलों, तेव्हां असें कांहींच पाहिलें नाहीं ! आणि आतां हें पाहून, मला आश्चर्य वाटतें ! तें ऐकून सां-

ई म्हणाला, बेटा माझी समाधिस्थ होण्याची वेळ आली म्हणजे, हें सर्व मी गुप्तठेवितों, आणि जागृत झालों म्हणजे, सर्व सामान बाहेर काढितों. तें ऐकून पिरोजशाहानें त्यास नमस्कार करून, भोजनाची तयारी करण्यास गुलछबूस आज्ञाकेली. तेव्हां सांई म्हणाला, बेटा सर्व सिद्धता आहे, तों इतक्यांत आंतून कांहीं दास आणि दासी सुगंधिक उटणें घेऊन आल्या, त्या दासां नीं पिरोजशाहास उटणें लावावयास विनंती केली. असें पाहून पिरोजशाहा साईकडे अवलोकन करून म्हणाला, साईंमाहाराज मी तुमचा दासानुदास आहें. तुमच्या घरीं मला मोठेपणानें कोणतेंहि कृत्य करण्यास योग्य नाहीं. असें त्याचें वाक्य ऐकून सांई म्हणाला बेटा तूं माझा पुत्र आहेस, व गुलछबू माझी कन्या आहे. तुम्हा उभयतांस मी आज मेजवानी केली आहे ही स्वीकारावी. तुम्हा उभयतां समागमें दासदासी घोडेस्वार पालखी देऊन तुमच्या शहरास पोंचवावें हेंच माझें काम आहे तर तुम्ही अनमान कोणत्याहि गोष्टीचे करूनये, असें मी तुम्हा उभयतांस सांगतों त्यास तुम्हीं अनुकूळ असावें. असें साईचें बोलणें ऐकून; पिरोजशाहास मोठा आनंद झाला. नंतर उभयतांनीं स्नान करून रत्नजडित ताटें भोजनास वाढून, साईसह भोजन केलें. तो दिवस आणि रात्र तेथें विश्रांति घेतली, दुसरे दिवशीं साईनें सांगितल्याप्रमाणें सिद्धता करून, पिरोजशाहास अमूल्य रत्नखचित पोषाक दिला. तसाच गुलछबूसहि वस्त्रें अलंकार देऊन, तीस पालखींत

बसविलें. समागमें शंभर दासी दिल्या. पिरोजशाहाच्या बरोबर शंभर दास, व दोनशें घोडेस्वार, तंबू, राहुटी, आणि सर्व सामग्री दिली. पिरोजशाहा त्यास नमन करून म्हणाला, ताता, आतां तुमची भेट केव्हां होईल ? साईं म्हणाला, बेटा आतां भेट इतकीच, कारण ईश्वरी संकेताप्रमाणें दुसरे ठिकाणी मी जाणार आहें. तुम्हांस मुलगा होईल त्याची माझी भेट होईल. हें ऐकून पिरोजशाहा म्हणाला हें कसें, तोंपर्यंत आमची भेट कां होणार नाहीं, त्यानें सांगितलें कीं, मी एथून फार लांब सुमारें दाहा हजार कोशांवर जाऊन राहणार आहें. जेथें मनुष्यास जाण्यास फार दुर्घट प्रयत्न लागतात. असें त्याचें बोलणें होऊन पिरोजशाहा त्यास नमन करून, घोड्यावर स्वार झाला. गुलछबूहि त्यास वंदन करून नेत्रास पाणी आणून, म्हणाली, ताता मला आज्ञा द्यावी. हें ऐकून साईं तीस आशीर्वाद देऊन, तिच्या मस्तकीं हस्त ठेवून, म्हणाला बेटा, बेफिकीर राहाना तेरा भला होईगा. असें म्हणून त्यानें तीस एक लहान सोन्याची तायती दिली, आणि ही तुझ्या बुचड्यांत राहूंदे म्हणजे तुला कांहीं संकट पडणार नाहीं असें म्हणून ती तायती तिच्या हवालीं केली. गुलछबूनें त्याच्या देखतांच आपल्या बुचड्यांत घालून ठेविली. आणि नमस्कार करून मार्गस्थ झाली.

साईनें जीं त्यांजबरोबर मनुष्यें दिलीं त्यांनीं सर्व मार्गांत त्या उभयतांची मोठी बडदास्त, खाण्यापि-

प्याची, तशीच सर्व गोष्टींची केली. आणि कांहीं दिवसांनीं, तीं पोर्तुगाल देशाच्या आसपास दाखल झालीं. तेव्हां कांहीं लोक त्यांस पाहून कोण आहेत असा शोध करूं लागले. तेव्हां गुलछबू आणि पिरोजशाहा आहेत असें समजतांच, गांवांत बातमी पोंहोंचली. तेव्हां एजीबशाहा मधाना समवेत सामोरा येऊन; पिरोजशाहास आलिंगन देऊन मुलीस भेटला, तेव्हां त्यास जो हर्ष झाला तो लिहितां पुर्वत नाहीं. अशा आनंदानें ते शहरांत येऊन महालांत दाखल झाले. गुलछबूचा मेणा तिच्या महालाकडे नेला. तेथें गुलछबूची आई कलिंदबू बादशाहाजादी, आपल्या दासी सहवर्तमान उभीआहे, तों गुलछबू मेण्यांतून उतरून महालांत आली. आणि आईस पाहतांच आनंदयुक्त होत्साती, येऊन तिच्या गळां पडली, तेव्हां त्या कलिंदबूच्या आनंदास पार नाहीं. अशा रीतीनें ती आईस आणि बापास भेटली, एजीबशाहानें त्यांच्या विवाहाचा उद्योग चालविला. मोठा विस्तीर्ण मंडप घातला. देशोदेशींच्या राजांस पत्रें लिहिलीं. आणि सर्व सामग्री सिद्ध करण्याची गर्दी उडून गेली. पिरोजशाहा गुलछबूच्या महालांत येऊन तिच्याबरोबर ज्या साईकडून दासी आल्या होत्या, त्यांस उत्तम वस्त्रें अलंकार देऊन, तसेच घोडेस्वार आणि सर्व दास त्या सर्वांस ह्याचप्रमाणें वस्त्रें अलंकार दिले. आणि सांईस विनंती पत्र देऊन त्यांची रवानगी केली.

एजीबशाहानें लग्नाचा समारंभ मोठ्या आनंदा

चालविला. सर्व देशोदेशींचे राजे करभार घेऊन दाखल झाले, तेणें करून त्या शहरास अतिशयित शोभा आली आहे. आणि त्या शहरांत घरोघर महोत्साहास, गुलछबू आल्या दिवसापासून सुरवात झाली आहे. एजीबशाहानें पिरोजशाहास विनंती करून, म्हणाला, आपण धन्य अहां, आपला मी मोठा ऋणी आहें; माझ्या सुखाचें मूळ तुम्हीच अहां तुम्ही होतेत म्हणून माझी कन्या माझ्या दृष्टीस पडली. तेव्हां पिरोजशाहानें सर्व हकीकत सांगितली, ती ऐकून एजीबशाहास परम दुःख वाटलें. पिरोजशाहानें फार मेहनत घेतली, म्हणून त्याचे मोठे उपकार मानूं लागला. पिरोजशाहास राहण्यास एक मोठा महाल दिला तेथें मंडप घातला; आणि सर्व सिद्धता केली. दोहों मंडपांची सिद्धता होऊन, लग्न सोंहाळ्यास आरंभ झाला. पिरोजशाहास आणि गुलछबूस हळदी लागल्या, त्या दिवशीं त्या शहरच्या बडे लोकांच्या स्त्रियांची हळदी विषयीं पिरोजशाहाच्या महालांत गर्दी उडाली होती. तशीच गुलछबूकडेसहि स्त्रियांचा मोठा समाज जमला होता. तिसऱ्या दिवशीं लग्न त्या दिवशीं, सर्व शहरांत गुढ्या उभारल्या होत्या. बडे लोकांनीं कोणी सोन्याचीं कोणी रुप्याचीं फुलें तयार केलीं होतीं. अवांतर लोकांनीं बाजारच्या फुलांच्या पांट्या भरून ठेविल्या होत्या. सुमारे पांच वाजतां नवरी कडून सर्व समाज जमून, नवऱ्यास मूळ निघालें. सर्व देशींचे राजे जमून, एकच गर्दी झाली, ह्या समाणें सर्व समाज पिरोजशाहाच्या महालांत, दा-

खल झाला. तेथेंहि तसाच समाज जमला होता प्रधान, सेनापति, मोठ मोठे मुत्सुदी, शेट सावकार मिळून एकच गर्दी झाली होती. नाना तऱ्हेचीं वाद्यें, शिंगें, तुताऱ्या, मिळून एकच ध्वनी होत असे. त्याचा प्रतीध्वनी सर्व शहरांत उमटून, एकच नाद होऊन गेला, कोट्यावधि हिलाल जळत होते अशा रीतीनें पिरोजशाहा रत्नखचित पोषाक केलेला सर्व समाजामध्यें उत्तम प्रकारें शोभत आहे. भरजरी हिरेजडित साज घालून घोडा सर्व समाजा समवेत, उभा आहे, तों पिरोजशाहा महालांतून निघाले, तेव्हां वाद्यांची आणि ताशांची गर्दी उडाली. पिरोजशाहा घोड्यावर बसले तेव्हां सर्व नागरिक नारी आपापल्या दरवाजांत, हातांत पंचारती घेऊन ओंवाळीत आहेत. कोणी सोन्याचीं कोणी रुप्याचीं फुलें उधळीत आहेत, अशा थाटानें मिरवत बादशाहाच्या महालांत येऊन, दाखल झाले. विधियुक्त जो कांहीं संस्कार होणें तो होऊन, गुलछबूचें आणि पिरोशाहाचें लग्न झालें. तेव्हां किल्ल्याच्या तटावरून शेकडों तोफांची सरबतिझाली. वारांगना नृत्य करूंलागल्या, सर्व स्त्रिया मंगल गीत गाऊं लागल्या. वाद्यें वाजूं लागलीं. एजीबशाहा आणि कलिंदबू, कन्यादानास बसलीं, तेव्हां एजीबशाहानें गुलछबू समवेत सर्व राज्य पिरोजशाहास आंदणदिलें. आणि संतोष पावून पिरोजशाहास जडावांचें कंकण तोंडे आणि तऱ्हतऱ्हेचे शिरपेंच जडावाची पोंची कंठ्या दिल्या. पांचव्या दिवशीं रात्रीस वरात पिरोजशाहाच्या महालांत आली. ह्या प्रमाणें

एक महिना लग्न सोहाळा होऊन, सर्व राजे आप आपल्या गांवी जाते झाले.

गुलछबू आणि पिरोजशाहा उभयतां मोठ्या आनंदांत काळक्रमण करीत आहेत. एके दिवशीं पिरोजशाहास, मातापित्यांची आठवण होऊन त्यास परम दुःख वाटलें. तो मनांत म्हणू लागला कीं, आईबापांनीं माझ्या लग्नाची किती हौस केलीहोती, आणि मी येथें येऊन लग्न केलें, त्यांत त्यांनां काय सुखझालें! तीं उभयतां रात्रं दिवस माझी काळजीच करीत असतील! अशा चिंतेत मोठा दुःखित होत्सातां बसला आहे, तों गुलछबू तेथें आली, आणि त्याचा मुखचंद्र पाहून अतिशय तीस दुःख वाटलें. कारण हा कधींच इतका दुःखी नव्हता, आणि आज असें होण्याचें कारण काय! असें मनांत म्हणून ती पिरोजशाहाच्या गळ्यांत हात घालून, त्याच्या मांडीवर बसली, आणि विनंती केली. महाराज, आज आपणास काय संकट पडलें आहे; आणि आपण कोणत्या दुःख कारक गोष्टीची आठवण करून दुःख करितां, हें कृपा करून मजला सांगावें. गुलछबूचें भाषण ऐकून पिरोजशाहा म्हणाला, प्रिये मला घरीं जाण्याची उतावळी आहे, कारण माझीं वृद्ध मातापितरें मजकरितां फार दुःखित असतील. आणि तीं सुरक्षित आहेत किंवा कसें हें मला कांहींच समजत नांहीं, तर मला उदयिक माझ्या राज्यांत जाण्यास, तूं बापास विचारून, त्यांची आज्ञा घे. गुलछबू म्हणाली उत्तम आहे. आपण उदयिक निघण्याची तयारी करूं, आपण कांहीं दुःख करूंनका. असें म्हणू-

न, ती आपल्या आईजवळ गेली. आणि पिरोजशाहा आपल्या आई बापांस भेटण्यास, फार उतावीळ झाला आहे असें कळविलें. त्यानें महत्संकटें भोगून, त्या वृद्ध माता पितरांस, पाहण्याच्या इच्छेनेंच आपला प्राण वांचविला असे पिरोजशाहा म्हणत आहेत; तर आमची उदयिक घरी जाण्याची सिद्धता झाली पाहिजे. कलिंदबू बादशाहाजादीनें, रात्रौ एजीबशाहा बादशाहास सांगीतलें कीं, आपल्या जामाताची इच्छा एकवेळ आई बापांस भेटून येण्याची आहे, आणि तो त्यांच्या भेटी करितां फार उतावळा झाला आहे, तस्मात् त्याची जाण्याची उदयिक तयारी करून द्यावी. मुलगीहि सासू सासऱ्यांस भेटावयाची इच्छा करीत आहे, असें ऐकून एजीबशाहा मोठ्या आनंदानें, प्रधानजीस उदयिक सर्व सिद्धता करण्यास सांगेन असें म्हणाला; आणि प्रातःकाळ होतांच त्यानें प्रधानास सर्व सिद्धता करावयास हुकूम दिला. प्रधानानें बादशाहाच्या हुकुमाप्रमाणें, एक हजार घोडेस्वार, दहा हती, दाहा मेणे, शंभर भोई, शंभर दासी, दोनशें दास, शंभर उंटें,त्यांजवर सर्व साहित्य, राहुटी, तंबू, अशा सर्व प्रकारची सिद्धता केली. गुलछबूनें पिरोजशाहास आपल्याजाण्याची सर्वसिद्धता आहे असें कळविलें. एजीबशाहानें त्या दिवशीं मोठी मेजवानी दिली. भोजन झाल्यानंतर गुलछबू आपल्या आईस भेटून, तिची आज्ञा घेतीझाली. एजीबशाहा मुलीस भेटून, मोठ्या आनंदानें, तीस आज्ञा देताझाला. त्याप्रमाणें पिरोजशाहा सासूसासऱ्यांस भेटून, त्यांची

आज्ञा घेताझाला. बादशाहा प्रधान सर्व बडेलोक त्यांस चारकोस पोहोंचवून परत फिरले. एजीबशाहानें पिरोजशाहास पुनः लवकर आपल्या भेटीची मार्गप्रतीक्षा करीत आहों असें दर्शविलें, आणि सर्वजण आपल्या गांवीं परत आले.

इकडे पिरोजशाहा गुलछबू सहवर्तमान कुचदरकुच जातांजातां, एकेदिवशीं दोनप्रहरच्यावेळीं, त्यांनीं एका अरण्याच्या ठाईं तळदिला. आणि जरा विश्रांति घ्यावी. ह्या हेतूनें, गुलछबूस पुढ्यांत घेऊन मेण्यांत निजला आहे; तों गुलछबूस झोंपलागली. आणि पिरोजशाहा पाहतो तों तिच्या बुचड्यांत त्यानें एक ताइती, पाहिली. ती ताइति त्या साईनें तीस दिलीहोती, हें वर्तमान पिरोजशाहास कांहींच माहीत नव्हतें. त्यानें ती ताइती हलकेच सोडून घेतली, आणि त्यांतकाय आहे तें पाहावें म्हणून; तिच्याजवळून उठून ती घेऊन मेण्यांतून बाहेर येऊन उघडून पाहावयाच्या बेतानें, अंमळ कांहीं अंतरावर दूर जाऊंलागला. तेव्हां त्यास कांहींच शुद्धिनाहीं असा होऊन तो फारचलांब निघून गेला. तो आपल्यामनांत म्हणत असे कीं, आतां एथें उघडून पाहूं, पण त्याच्यानें उभेंच राहवेना ! चालतच आहे. असें जरी त्यास अंतरांत समजत होते, तरी चालणें बंद करून उघडून पाहावयास त्यास कांहीं अवकाश घेववेना ! असें पाहून त्यानें ती ताइती चालतांचालतां उघडली. तींतून एक लहान कागदाचा तुकडा निघाला, तो पाहतांच त्याचा मोठा प्रकाश होऊन त्याच्या कंठास तो

कागद चिकटला. आणि त्या ताइतीचे दोन भाग उघडल्यावर त्याच्या दोहोंहातांत होते, त्यांचे दोनखिळे होऊन, त्याच्या दोहों कानांत, त्याच्या हातांतूनं निसटून शिरले. आणि पिरोजशाहा तात्काळ राघूझाला. पिरोजशाहा आपण पक्षी झालों असें पाहून परम दुःखित झाला. आणि आतां गुलछबूची व आपली गांठ पडणें कठीण असें त्यास वाटूं लागलें. तो राघू इतका सुंदर बनून गेला कीं, त्या राघूस दुसरी उपमा देण्यांस मिळणेंच नाहीं. तो हिरामणी नावाचा राघू असतों, त्यापेक्षांही कांहींसा मोठा होता. आणि त्याचा कंठ त्या ताइतींतले यंत्रानें फारच सुशोभित दिसे, पण तो कागद व ते खिळे अगदीं कोणासच दिसत नसत. पिरोजशाहा राघू जरी झाला, तरी तो गुलछबू करितां सर्व जंगल धुंडूं लागला; पण त्यास आलेला मार्गच मिळेनासा झाला.

इकडे गुलछबू जागी होऊन पाहात्ये तों पिरोजशाहा नाहीं, असें पाहून ती तशीच उठून बाहेर आली, आणि चौकशी करूंलागली, तेव्हां तो खचित कोठें नाहीं! असें जेव्हां तिनें पाहिलें, तेव्हां तिच्या मनांत हजार संशय येऊं लागले. आणि तीस त्या दिवशीं साईनें दिलेल्या ताइतीची आठवण होऊन पाहत्ये तों, ती ताइती बुचड्यांत नाहीं, तेव्हां तिनें अनुमान केलें कीं, पिरोजशाहा जवळ ती ताइती असावी आणि हा दुःखकारक प्रसंग येण्यास ती ताइतीच कारण,असें म्हणून त्या साईस हजारों तऱ्हेनें निर्भत्सूं लाग-

ली, आणि मोठा शोक करून त्या अरण्यांत तिनें पंधरा दिवस वस्ती केली, परंतु पिरोजशाहाचा पत्ता नाहीं ! नंतर ती अगदीं निराश होऊन परमेश्वरावर भरंवसा ठेवून; तेथून निघाली. निघतेवेळीं तिनें मरदानी पोषाक केला, आणि कांहीं मनुष्यें बरोबर घेऊन बाकीच्यांस, घरीं परत जाण्यास सांगितलें. जेव्हां तिनें मर्दानी पोषाक करून, आपल्या मनुष्यांत फिरूंलागली तेव्हां त्या सर्व मनुष्यांस पिरोजशाहाच आले असा भास झाला. आणि जसा हुकूम केला त्याप्रमाणें कांहीं मनुष्यें परत गेलीं आणि कांहीं बरोबर घेऊन, आलकाफँ शहरचा मार्ग शोधित चालली.

इकडे पिरोजशाहा राघू होऊन सर्व जंगलें फिरूंलागला. उंच आकाशांत फिरून, पृथ्वीचा चमत्कार पाहात असे. आणि परमेश्वराचें स्तवन करून कोठें फळें मिळत तीं खाऊन, पुनः गुलछबूच्या शोधार्थ फिरत असे. त्यास पाहण्याच्या हेतूनें, त्याजवळ पक्ष्यांचीही गर्दी होत होती, परंतु त्यास त्यांची भाषा नसल्या कारणानें, हा त्यांजमध्यें निमूटपणें बसत असे. ते सर्व पक्षी पुनः गेले म्हणजे, ह्यानें तेथून उडून दुसरीकडे जावें. असें असतां कोणेएकेदिवशीं, तो एका सरोवरावर येऊन पोहोंचला. तेथें कोणीएका राजाचें लश्कर उतरलें होतें, त्यास पाहून पिरोजशाहास तें आपलेच लोक उतरले आहेत असें वाटलें. पुढें येऊन तो एका वृक्षावर बसला, आणि सर्व मनुष्यांस निरखून पाहूंलागला; तेव्हां तीं मनुष्यें आपलीं नव्हत असें किंचित् वाटलें. तें लश्कर पिरनी देशाच्या रा-

जाचें होतें, त्याची कन्या आपल्या आजोळीं जात होती. तीस पोहोंचविण्यास तें सर्व लश्कर तिज बरोबर होतें, आणि तिचा आजाही तिच्या बरोबर होता. सायंकाळचा वेळ होतआला आहे तों, ती तंबूंतून आपल्या दासी सहवर्तमान फिरावयास निघाली असतां; पिरोजशाहाच्या दृष्टीस पडली. तेव्हां ती गुलछबूच आहे कीं काय असें त्यास वाटलें, आणि तोही तिजबरोबर निघाला. कांहींसा जवळ जाऊन पाहतो तों ती गुलछबू नव्हें ! अशी त्याची खात्री झाली, जेव्हां तिनें त्या राघूस पाहिलें, तेव्हां तो आपणा जवळ असावा असें तीस वाटलें आणि ती दासीस ह्मणाली, अहाहा ! कायगे हा राघू किती सुशोभित आहे, ह्यास आपण कसेंही करून धरूंया; असें म्हणून तो राघू बसला होता तेथें चाललया. एक त्या बाजूंनें एक ह्या बाजूनें अशातऱ्हेनें, त्यास वेढा घातला. पिरोजशाहानें विचार केला कीं, मला धरण्याच्या बेतानें आल्या आहेत; तस्मात् ह्यांच्या हातीं सांपडावें व ह्या कोणत्या तरी शहरास जातील, आणि तेथें गेल्यावर कोणी तरी मनुष्य मला वोळखून, कोणास कांहीं उपाय समजला तर, माझी ह्या देहापासून मुक्तता करील. आणि जर मी जंगलांतच राहिलों तर माझी मुक्तता होणें कठीण आहे. आतां इच्या समागमें जावें हेंच उत्तम आहे. असा विचार करून, आपण स्वतः; राजकन्येच्या हातावर जाऊन बसला. ती त्यास दोनीं हातांनीं पदरांत धरून, आपल्या डेऱ्यांत दासी सहवर्तमान घेऊन आली. त्यास पिंजरा नाहीं असें पाहून, तिनें एक रे-

शमाची दोरी घेऊन त्याच्या एकाप्रायांस बांधली. आणि आपल्या पलंगास बांधून ठेविला. तो त्या पलंगाच्या कठड्यावर बसून राहिला असें पाहून, तीस मोठा आनंद वाटला. आणि त्याजबरोबर कांहीं बोलू लागली. राघु, तुला काय पाहिजे ? पेरू देऊं, तूं खातोस काय ? असें म्हणून तीनें दासी जवळून पेरू आणविला. आणि तो त्याजपुढें केला, पिरोजशाहा त्या पेरूवर झडप न घालतां निवांत बसला. तेव्हां ती त्यास पुनः आपल्या हातावर घेऊन, कुरवाळूं लागली. आणि त्यानें पेरू खावा या हेतूनें तो कापून, लहान तुकडा त्यास देऊंलागली. तेव्हां तो म्हणाला मी पेरूखात नाहीं, कारण तो मला आवडत नाहीं, जर मला भात देशील तर थोडा खाईन असें जेव्हां तिनें स्पष्ट त्या राघूस बोलतांना ऐकिलें, तेव्हां तीस मोठा आनंद वाटून म्हणाली, राघू तुला फार चागलें बोलतां येतें, तुला कोणी शिकविलें तें मला सांग. राघू म्हणाला, मी ह्या अरण्यांत आज सुमारें, सहा महिने राहतों, माझा धनी मला घेऊन येथें आला होता, त्याची माझी चुकामुक झाली. आतां त्यास कोठें शोधूं ! त्यानेंच मला बोलावयास शिकविलें. राघू, तुझा धनी कोण ? त्याचें नाव तुला ठाऊक आहेना ? होय, त्याला पिरोजशाहा म्हणतात, तो आलकाफँ शहरच्या बादशाहाचा मुलगा आहे; त्याची स्त्री गुलछबू, पोर्तूगाल देशच्या बादशाहाची कन्या आहे; आतां त्या उभयतांची माझी भेट केव्हां होईल हीच काळजी मला आहे, तेणें करून मला कां-

हीं गोड लागत नाहीं. इतक्यांत जेवण तयार होऊन ती त्या राघूस घेऊन जेवावयास गेली, आणि त्यास आपल्या पुढ्यांत जेवायास घेतलें. कांहीं भात त्याच्या पुढें ठेविला, परंतु तो खात नाहीं असें पाहून ती म्हणाली, राघू तुला भात हवा होता तर आतां खात कां नाहीं ? तिचा आजाहि जवळच भोजन करीत होता, तो तिचें बोलणें ऐकून म्हणतो, कां तुझा राघू बोलतो काय ? हा कोठें सांपडला ! असा राघू मी कधींच पाहिला नव्हता, अहाहा किती सुंदर आहे ! आणि हा जर बोलत असला तर याची किम्मतच होणार नाहीं. तेव्हां ती म्हणाली, बाबा हा राघू फारच चागलें बोलतो, त्यानें आपली सर्व हकीकत मला सांगितली. मी त्यास पेरू देत होतें, तेव्हां मला तो आवडत नाहीं असें म्हणाला. आणि भात मागू लागला. आतां कां खात नाहीं ! असें त्या म्हाताऱ्यानें ऐकिलें तेव्हां त्यास मोठें आश्चर्य वाटलें, आणि म्हणाला, इतका जर तो बोलतो, तर त्यालाच विचार भात कां खात नाहीं. तेव्हां तिनें विचारिलें. राघू, तूं भात कां खात नाहींस ? पिरोजशाहा मोठा दुःखित होत्सातां मनांत म्हणतो, काय माझें प्रारब्ध इचें उच्छिष्ट मी खाऊं काय, असें म्हणून उगाच राहिला. तेव्हां पुनः ती व तो म्हातारा दोघेंही विचारूं लागलीं, तिच्या आजाचा हेतु कीं, हा कसें बोलतो तें ऐकावें. म्हणून सर्वांनीं जेवण खोळंबून त्यास विचारूं लागले. तेव्हां राघू म्हणाला, मी माझ्या धन्या शिवाय इतरांचें उच्छिष्ट खात नाहीं. मला

निराळें पात्र मांडा, म्हणजे मी खाईन. असें जेव्हां सर्वांनीं ऐकिलें, तेव्हां त्या राघूवर सर्वांची इतकी प्रीति बसली कीं, जो पदार्थ होई तो सर्वांच्या अगोदर त्यास द्यावा. निराळें रत्नखचित ताटांत त्यास रोज भोजन वाढावें. असें असतां ती आपल्या आजोळीं जाऊन पोहोंचली. तिच्या आजानें आपल्या नातीस, तिच्या राघू करितां एक सुवर्णाचा रत्नखचित पिंजरा तयार करविला. आणि तो पिंजरा तिनें आपल्या महालांत ठेविला. ह्याप्रमाणें पिरोजशाहा राघू होऊन त्या राजकन्येच्या महालांत राहिला. तो मनांत म्हणे कीं, मी स्त्री झालों होतों, तेव्हां त्याचा उपाय माझ्या लक्षांत आला, त्यामुळें पुर्ववत् पुरुष झालों. परंतु आतां कसें होईल ! ईश्वराची मर्जी असेल तसें होवो ! असें म्हणोन तो खुशाल त्या राजकन्ये बरोबर दिवस क्रमीत असे.

इकडे गुलछबू कांहीं दिवस, मार्ग चालून पुढें समुद्र लागला. तेव्हां जहाजांत बसून एका राजधानीस येती झाली. त्याशहराचें नाव पिरनी शहर असें होतें. तिनें आपलें नाव पिरोजशाहा असें केलें होतें, आणि तिच्या समागमें तिचीं मनुष्यें होतीं, तींही तेंच म्हणत असत. त्याशहरच्या राजाचें नांव फिराजमंद असें होतें. त्यास पिरोजशाहा आल्याची बातमी समजली, तेव्हां त्यानें आपल्या प्रधाना समवेत येऊन पिरोजशाहाचा योग्य सत्कार करून; त्यास शहरांत नेलें, आणि मोठी मेजवानी करून, नाच बैठक देऊन महालांत आणिलें. गुलछबू पिरो

जशाहाच्या वेषानें, तेथें राहिली, तों त्या फिराज-मंद राजानें, आपली कन्या मिरजाबेग नामें करून होती ती फार रूपवती होती, तरी गुलछबू इतकी नव्हती. ती आजोळीं गेलीआहे, व तिच्या समागमें पिरोजशाहा राघूहोऊन गेला आहे हें वर सांगितलेंच आहे तीस बोलवावयास पाठविलें, आणि तिच्या आजीस आणि आजासही समागमें घेऊन यावें, असें फिराजमंद राजानें लिहिलें होतें. तों कांहीं दिवसांनीं ती येऊन आपल्या शहरास दाखल झाली.

ईकडे गुलछबूनें पिरोजशाहाच्या वेषानें, कांहीं दिवस फिराजमंद राजाच्या घरीं राहून, आपल्या गांवीं म्हणजे आलकाफँ शहरास जाण्याची तयारी करण्यास, आपल्या मनुष्यांस सुचना केली. तेव्हां त्या फिराजमंद राजानें पिरोजशाहास विनंती करून म्हणाला; माझ्या गादीस कोणी वारस नाहीं. तेणें करून मी फार चिंताग्रस्त आहें. माझ्या पोटीं एक कन्या आहे, तो फार रूपवती आहे. तिच्या योग्य भ्रतार आपणच आहां, आम्हांस आपल्या शहराची माहिती नसल्या कारणानें, शोध लागला नाहीं. आणि थोडे दिवसा मागें, आपले सरदार लोक आपल्या शोधार्थ एथें आले होते; त्यांच्या मुखानें आपली योग्यता आम्हांस विदित झाली. आणि आपल्या योग्य स्त्री न मिळाळ्या कारणानें, आपण स्वदेश त्याग केला; हेंही आम्हांस समजलें. दैवयोगानें आम्हांस आपली भेटझाली आहे, तस्मात् माझी विनंती आपण मान्य करून हें राज्य आणि कन्यांआपण स्वीकारावी

असा माझा पूर्णहेतू आहे. गुलछबू फिराजमंद राजाची विनंती ऐकून, विचार करूं लागली. आणि मनांत म्हणते कीं, मी जातीनें स्त्री असतां, ह्याच्या मुलीशीं विवाह करणें ठीक नाहीं. आणि जर ह्यास नाहीं म्हणावें, तर आपण हल्लीं ह्याच्या राज्यांत आहों? न जाणों कदांचित् ह्याच्या मनांत, कांहीं आपल्या विषयीं विरूद्ध येऊन आपला कांहीं घात करूंशकेल. पिरोजशाहाचा तर कोठें ठिकाणा नाहीं, हें राज्य, आणि स्त्री, त्याज करितांच करणें आहे. असें मनांत म्हणून फिराजमंद राजास कांहींच जबाब देण्यास सुचेना. तेव्हां तिनें मोठ्या संकटानें, होय, ठीक आहे म्हणून सांगितलें.

फिराजमंद राजाची कन्या, मिरजाबेग, आजोळाहून नुकतीच येऊन दाखल झाली, तिनें पिरोजशाहा राघू झालेला आपणा बरोबर घेऊन आली होती. त्या राघूस सांगूं लागली, राघू, तुझे यजमान आमच्या घरीं आले आहेत. आणि, माझ्या लग्नाचीही योजना त्यांज बराबर झाली आहे; तर तुला कसें वाटतें. राघू म्हणाला, पिरोजशाहा तुमच्या घरीं कसा आला. आणि त्याची स्त्री गुलछबू, कोणीकडे आहे ह्याचा मला, तुमच्या म्हणण्या वरून मोठा भ्रम पडला आहे. आणि मी असें अनुमान करितों कीं, तुमचें बोलणें सर्व खोटें आहे. कारण पिरोजशाहाची स्त्री गुलछबू असतां, तो तीस सोडूंन दुसरी स्त्री करील असें मला वाटत नाहीं. ती फार रूपवती असून तिच्या रूपाची तुलना करण्यास भूतलांत कोण अन्य स्त्री आहे, असें

मला दिसत नाहीं. आणि पिरोजशाहाच्या रूपास तीच योग्य होय, तस्मात् तुम्ही बोलतां हें सर्व मला मिथ्या वाटतें. पिरोजशाहाच जर खचित आहे तर मी त्यास ओळखीन. मिरजाबेग म्हणाली, होय तेंच नाव खचित आहे; आणि माझ्या आईनें ही त्यांच्या रूपाची फारच तारीफ केली आहे. आणि उदयिक माझें लग्न होणार तर ते झालें म्हणजे, ते माझ्या महालांत येतील; तेव्हां तुझ्या नजरेस पडतील. आणि तुझी ओळख आहे तर, त्याना तूं सापडल्यानें मोठा आनंद होईल.

पिरोजशाहा मनांत म्हणतो, कायहो ! माझ्या नांवानें राहण्यास ह्या भूतळांत गुलछबू वांचून इतर कोण समर्थ आहे. आणि तीच जर आसेल तर स्वतः स्त्री असून स्त्रीसमागमें लग्न करण्यास सिद्ध कशी होईल ! आसा विचार करीत म्हणतो, आतां हातच्या कांकणास आरसा कशास पाहिजे. लग्न उदयिक झालें म्हणजे तो कोणता पिरोजशाहा आहे तो दिसेल; असें म्हणून उगाच राहिला.

फिराजमंद राजानें लग्नाची सर्व सिद्धता केली, सर्व देशोदेशींचे राजे लग्नास आले आहेत, तेणेंकरून त्या शहरास फारच शोभा आली आहे. आणि शहरांत घरोघरीं महोत्साह होत आहेत, अशा इतमामानें मिरजाबेग आणि गुलछबू, या उभयतांचें लग्न झालें. आणि गुलछबू मिरजाबेगच्या महालांत आली. त्या दिवशीं तीणें मिरजाबेग इच्याशीं कांहीं नबोलतां, निमटपणीं झोंपेचें मिष करून निजली. आणि मनां-

त मोठा पश्चात्ताप करीत आहे कीं, ही स्त्री आणि मीही स्त्री आहें तर; आतां माझी फजीती झाल्यावांचून राहत नाहीं. अशा काळजींत तीस रात्रभर झोंप तर नाहींच, परंतु झोंपेचें सोंग करून निजली होती. मिरजाबेगही तिच्या बाजूस निमूटपणें निजून राहिली. पहांट होतांच मिरजाबेग उठून आपल्या नित्य कर्मास गेली. तेथें गुलछबू निजली आहे, आणि तीस सर्व रात्र झोंप नसल्यामुळें, तिची प्रकृति बिघडल्या प्रमाणें होऊन गेली. तेव्हां तिनें विचार केला कीं, आतां फिराजमंद राजाची आज्ञा घेऊन आलकाफँ शहरास जावें. कारण आपली प्रकृति बरी नाहीं हें सर्वोत्कृष्ट निमित्त आहे. असें मनांत म्हणून तीस कांहींशी हुशारी वाटून, बिछान्यावरून उठण्याच्या बेतांत आहे; तों मिरजाबेग आपलें नित्य कर्म आटपून महालांत आली, तों गुलछबूही उठून बसली. असें पाहून हास्य बदन करून, जवळ येऊन उभी आहे तों; अकस्मात् त्या राघूकडे गुलछबूची नजर गेली, आणि पाहत्ये तों त्याच्या कंठास कागद आहे असें पाहून, ती उठून, पिंजऱ्या जवळ येऊन त्या राघूस निरेखून पाहात आहे, तों तिनें आणखी पाहिलें कीं, तिच्या ताइतीची दोन्ही पुडें त्याच्या दोहों कानांत आहेत. असें पाहून तीस फारच गहिंवर आला. आणि मनांत म्हणत्ये, माझी ताइती ह्या पक्ष्या जवळ कशी आली. असें म्हणत आहे तों, त्याराघूनें नेत्रांस अश्रु आणिले. असें जेव्हां तिनें पाहिलें तेव्हां गुलछबूही रडूं लागली. मिरजा बेग इनें तो चम-